वर्ष ३५, अंक १८७, ५ रुपये, शहर आवृत्ती, सहदैनिकासह पृष्ठे २०

FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS

Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06

पुणे, शुक्रवार, ७ ऑक्टोबर २०२२ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

७५ अमृत महोत्सव

पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

**अग्रलेख**

**‘रेवडी’राठोड!**

राजकीय पक्षांच्या प्रचारी आश्वासनांच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयास नकार देणाऱ्या निवडणूक आयोगाने आता हाच प्रश्न हाती घेणे अनाकलनीयच...



**क्रीडा**

**वर्चस्वपूर्ण कामगिरीचे लक्ष्य!**

Vencobb

एक्स् फार्म ब्रॉयलर चिकनचा दर

१०२ रु. प्रति किलो

किरकोळ विक्रीचा दर

जिवंत कोंबडी

१३० रु. प्रति किलो

ड्रेस्ड (स्किनसह) दर

१६१ रु. प्रति किलो

अंड्याचा किरकोळ विक्रीचा दर

६२ रु. प्रति डझन

भगिनी निवेदिता बँक देत आहे कमी व्याजदराच्या विविध कर्ज योजना

निवेदिता MSME कर्ज : ७.१५%*

निवेदिता प्रोफेशनल कर्ज : ७.४०%*

वाहनकर्ज योजना: ७.५०%*

सुखकर्ता गृहकर्ज: ७.१५%*

अटी व शर्ती लागू*

आजच आपल्या जवळच्या शाखेत संपर्क करा.

भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे

020 - 25447620/21

www.bhagininiveditabank.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| २९.५°से | २०.५°से |

**हवामानाचा अंदाज**

हलक्या पावसाची शक्यता.

**काय चाललंय काय!**

प्रशांत कुलकर्णी



एरवी मी आनंदी असतो! पण काही नेत्यांची भाषणं ऐकली म्हणजे आपली परिस्थिती किती वाईट आहे हे जाणून नैराश्य येतं!!

# राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा योजना स्थगित

## केंद्राकडून नव्याने मंजुरीची प्रतीक्षा

**चिन्मय पाटणकर, लोकसत्ता**




> परीक्षा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. प्रज्ञावान मुलांचा शोध घेण्यासाठी ही परीक्षा महत्त्वाची आहे. या परीक्षेच्या शिष्यवृत्तीची रक्कमही बऱ्यापैकी असल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी थोडीफार मदतही होते. मुदतीच्या कारणास्तव योजना स्थगित होत असेल, तर ते योग्य नाही. प्रज्ञावान विद्यार्थी ही देशाची खरी संपत्ती असते. त्यामुळे ही परीक्षा सुरू राहणे आवश्यक आहे.
>
> – डॉ. वसंत काळपांडे, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

### सर्वेक्षणामध्ये अनुकूलता

‘एनटीएस’बाबत २०२० मध्ये खासगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्यात आले होते. त्या सर्वेक्षणाचे निष्कर्षही ‘एनसीईआरटी’च्या संकेतस्थळावर देण्यात आले आहेत. प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात ‘एनटीएस’ बऱ्याच अंशी यशस्वी ठरल्याचे नमूद करत बहुतांश सहभागींनी ‘एनटीएस’ला चांगली किंवा उत्कृष्ट श्रेणी दिली. ‘एनटीएस’ सुरू राहिली पाहिजे, असे निष्कर्ष या सर्वेक्षणातून पुढे आले.

**पुणे :** देशभरातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी घेतली जाणारी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (एनटीएसई) योजना तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. ही योजना पुढे चालू ठेवण्यास केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने अद्याप नव्याने मंजुरी दिलेली नाही. त्यामुळे या परीक्षेच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत देशपातळीवर घेण्यात येते. या परीक्षेसाठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) ही संस्था समन्वयक संस्था (नोडल एजन्सी) म्हणून काम करते. दहावीच्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येते. राज्य आणि राष्ट्रीय अशा दोन स्तरांवर परीक्षा होऊन राष्ट्रीय पातळीवरील गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. त्यासाठी राज्यनिहाय कोटा निश्चित करण्यात येतो. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना अकरावी ते पीएच.डी.पर्यंत शिष्यवृत्ती मिळते. २०१४-१५ मध्ये या परीक्षेची शिष्यवृत्ती वाढवण्यात आली. अकरावी *(पान ४ वर)*




भारतामध्ये 5G सेवा सुरू!

# ‘धनुष्यबाण’ चिन्ह आमचेच!

## तातडीने निर्णय घेण्याची शिंदे गटाची निवडणूक आयोगाकडे मागणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

### पक्षचिन्ह गोठणार?

परिस्थितीजन्य पुरावा आणि तथ्याच्या आधारे निवडणूक आयोगाने चिन्हाबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अशी विनंती शिंदे गटाने निवडणूक आयोगाला केली आहे. चिन्ह गोठविण्याची मागणी या अर्जात करण्यात आलेली नाही. मात्र, धनुष्यबाण चिन्ह मिळणार नसल्यास ते गोठवावे, असे शिंदे गटाने सूचित केल्याचे मानले जाते.



### मुदत आज संपुष्टात

**नवी दिल्ली :** खरी शिवसेना कोणाची, याबाबत दावेदारीसाठी निवडणूक आयोगाने ठाकरे आणि शिंदे गटाला दिलेली मुदत शुक्रवारी संपुष्टात येत आहे. अंधेरी-पूर्व विधानसभा मतदारसंघामध्ये ३ नोव्हेंबर रोजी पोटनिवडणूक होत असून, १४ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. त्याआधी आयोग ‘धनुष्यबाणा’बाबत निर्णय देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. - **पान ४**

**मुंबई :** ‘‘शिवसेनेच्या बहुसंख्य लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेनेच्या मुख्य नेतेपदी, तसेच अध्यक्षपदी निवड केलेली असल्याने पक्षाचे धनुष्यबाण हे चिन्ह आम्हालाच मिळाले पाहिजे’’ असा अर्ज शिंदे गटाने निवडणूक आयोगाकडे केला आहे. उद्धव ठाकरे गटाकडे पुरेसे समर्थन नसतानाही हा गट बेकायदेशीरपणे अंधेरी पोटनिवडणुकीत धनुष्यबाण चिन्ह वापरण्याची शक्यता असल्याने या अर्जावर तातडीने निर्णय घेण्याची विनंती शिंदे गटाने केली आहे.

अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक जाहीर झाली असून, शुक्रवारपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होईल. निवडणूक अर्ज दाखल करण्याची मुदत ही १४ ऑक्टोबरपर्यंत आहे. ‘‘शिवसेनेच्या ५५ पैकी ४० आमदार, १८ पैकी १२ खासदारांचा आम्हाला पाठिंबा आहे. तसेच प्रतिनिधी सभा आणि राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत एकनाथ शिंदे यांची शिवसेनेचे ‘मुख्य नेता’ तसेच अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. १४४ पक्षाचे पदाधिकारी आणि ११ राज्यांच्या प्रमुखांनी शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. शिवसेनेचे बहुसंख्य लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांचा शिंदे यांना पाठिंबा आहे’’, असे या अर्जात नमूद करण्यात आले आहे. या दाव्याच्या पुष्टर्थ प्रतिज्ञापत्र तसेच अन्य कागदपत्रे दाखल करण्यात आली आहेत. तसेच अजूनही पुरावे तसेच कागदपत्रे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे शिंदे यांनी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या पत्रात नमूद केले आहे. ‘‘उद्धव ठाकरे गट हा पक्षाच्या लोकप्रतिनिधी अथवा पदाधिकाऱ्यांच्या पाठिंब्याचे पत्र वा प्रतिज्ञापत्र सादर करू शकलेला नाही’’, असा दावाही शिंदे गटाने केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक *(पान ४ वर)*

## भारताच्या अर्थव्यवस्थेची वाढ ६.५ टक्क्यांपर्यंत : जागतिक बँक

# अंदाजित विकासदरात एका टक्क्याने घट

**पीटीआय, वॉशिंग्टन**

**जागतिक बँकेने** २०२२-२३ या आर्थिक वर्षातील भारताच्या अर्थव्यवस्थेचा वाढीचा अंदाज बदलुन, तो ६.५ टक्क्यांपर्यंत खाली आणला आहे. जून २०२२ मध्ये व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा आता तो पूर्ण एका टक्क्याने कमी करण्यात आला आहे.

रशिया-युक्रेन युद्धामुळे जागतिक पातळीवरील वाढती अनिश्चितता, पुरवठा साखळीतील अडथळा आणि वाढत्या महागाईमुळे अर्थव्यवस्थेची गती अपेक्षेपेक्षा संथ राहण्याची शक्यता आहे. नियोजित आर्थिक सुधारणांमध्ये अपेक्षित गती दिसत नसल्याने जागतिक बँकेने गुरुवारी हा खालावलेला अंदाज जाहीर *(पान ४ वर)*

### २०२०मध्ये करोनामुळे देशात गरिबी वाढली

**वॉशिंग्टन :** भारतात २०२० मध्ये दारिद्र्यरेषेखालील नागरिकांची संख्या तब्बल ५.६ कोटींनी वाढल्याचे जागतिक बँकेने अहवालात म्हटले आहे. ‘गरिबी आणि सामायिक समृद्धी २०२२ : दुरुस्तीचा मार्ग’ या अहवालात दारिद्र्य निर्मूलनाच्या उपायांवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे.








UPSC / MPSC
दहावी व बारावीनंतर
IAS/IPS ची तयारी
फक्त लक्ष्य अ‍ॅकॅडमी मध्येच...

AJIT PADWAL
Director
Lakshya Academy
(Ex Journalist)
NEW FOUNDATION BATCH
FOR UNDERGRADUATE STUDENTS
8th OCT. 2022
TIME
6.00 pm to 8.00 pm
LAKSHYA ACADEMY
Aim, Think & Achieve
www.lakshyaiasacademy.com
UPSC / IAS / IPS / IFS / IRS MPSC / Dy. COLL. / DY. SP.
ब्रॉयुएट विद्यार्थ्यांसाठी रेग्युलर कोर्स
दहावी, बारावी पास विद्यार्थी व पालकांना पर्सनल कौन्सिलिंग केले जाईल.
अपॉइंटमेंटसाठी संपर्क: Dadar (W): 9619071345 | Branches: Mulund (W) | Thane (W): 9987579570 | Nerul (W) | Panvel: 9892908240 | Pune
Follow Us On: @Lakshya IAS Academy

# अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रकमेत वाढ

## योजनेची सुधारित मार्गदर्शक सूचना जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्याच्या अल्पसंख्याक विकास विभागातर्फे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी राबवल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेत शिष्यवृत्तीची रक्कम वाढविण्यात आली आहे. आता विद्यार्थ्यांना पन्नास हजार रुपयांपर्यंत शिष्यवृत्ती दिली जाणार असून, आधारसंलग्न बायोमेट्रिक प्रणालीद्वारे या विद्यार्थ्यांची किमान पन्नास टक्के उपस्थिती नोंदवणे बंधनकारक आहे.

राज्य शासनातर्फे राज्यातील अल्पसंख्याक समाजासाठी २००८-०९ पासून शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. २०२२-२३ पासून या योजनेची व्याप्ती आणि शिष्यवृत्तीची रक्कम वाढवण्यास शासनाने मान्यता दिली. तसेच शिष्यवृत्तीच्या सुधारित मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या. मान्यताप्राप्त वैद्यकीय, अर्धवैद्यकीय, तांत्रिक, व्यवसाय आणि उच्च व शिक्षण विभाग, कला संचालनालयाच्या अखत्यारितील मान्यताप्राप्त पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू आहे. दूरस्थ आणि पत्रव्यवहाराद्वारे होणारे अभ्यासक्रम योजनेसाठी पात्र राहणार नाहीत.

सुधारित योजनेअंतर्गत पात्र अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क आणि परीक्षा शुल्क किंवा पन्नास हजार रुपये, यातील जी रक्कम कमी असेल ती रक्कम, तर कला, वाणिज्य, विज्ञान या अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क आणि परीक्षा शुल्काची एकत्रित रक्कम किंवा पाच हजार रुपये यातील जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृत्ती म्हणून दिली जाईल. शिष्यवृत्तीची रक्कम ऑक्टोबरअखेर आणि फेब्रुवारीअखेरपर्यंत अशा दोन हप्त्यांत विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (डीबीटी) जमा केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# रोजगारक्षमता वाढीसाठी अभ्यासक्रमांची निर्मिती

## ‘यूजीसी’कडून महाविद्यालये, विद्यापीठांना निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पदवीधर विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढण्यासाठी देशभरातील विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांनी आघाडीच्या माहिती तंत्रज्ञान कंपन्यांशी चर्चा करून उद्योगकेंद्रित अभ्यासक्रमांची निर्मिती करावी. तसेच त्याला श्रेयांक देता येतील, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले.

यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. ‘नॅशनल स्कील क्वालिफिकेशन फ्रेमवर्क’ अंतर्गत (एनएसक्यूएफ) यूजीसीकडून कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम राबवण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

‘एनएसक्यूएफ’मध्ये ज्ञान, कौशल्य आणि कल यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे उद्योगांकडून श्रेयांकांसहित अभ्यासक्रमाची निर्मिती झाल्यास संबंधित अभ्यासक्रम ‘एनएसक्यूएफ’शी समकक्ष असणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण संस्थांनी उद्योग क्षेत्राशी, माहिती तंत्रज्ञान कंपन्यांशी संवाद साधून उद्योगकेंद्रित अभ्यासक्रमांची निर्मिती, प्रचारासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. या अभ्यासक्रमांसाठी श्रेयांक देता येऊ शकतात. याद्वारे पदवीधर विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढण्यात मदत होईल, असेही प्रा. जैन यांनी स्पष्ट केले.

# सेवायज्ञात दानसमीधा

समाजातील वंचित घटकांसाठी काम करणाऱ्या दहा संस्थांचा परिचय ‘लोकसत्ता’ने ‘सर्वकार्येषु सर्वदा’ उपक्रमात करून दिल्यानंतर मदतीसाठी हजारो हात पुढे आले. ‘लोकसत्ता’च्या विविध कार्यालयांत धनादेशांचा ओघ सुरू असून, ‘कॉसमॉस’ बँकेच्या सहकार्याने उपलब्ध असलेल्या ऑनलाइन देणगीच्या सुविधेचाही लाभ दानशूर घेत आहेत. एक हजार रुपये आणि त्याहून अधिक रक्कम देणाऱ्या देणगीदारांची नावे पुढीलप्रमाणे...

*उषा कुलकर्णी, कोपरखैरणे रु. २५००००, *क्षिप्रा जगदीश फडके, त्र्यंबकरोड, नाशिक रु. १०५०००, *अ‍ॅड. प्रणिता व्ही. खलप, कांदिवली (प), रु. १०००, * सांगितिका संदिप तळवडेकर, वाशी यांच्याकडून कै. अरविंद दाभोळकर यांच्या स्मरणार्थ रु. ५०००, *विक्रम शिरीष रोजेकर, नाशिक रु. १०००, *अनुप शिरीष रोजेकर, नाशिक रु. १०००, *माधुरी शिरीष रोजेकर, नाशिक रु. २०००, *शिरीष महादेव रोजेकर, नाशिक रु. ५०००, *अरविंद दत्तात्रय प्रधान, मुलुंड (प) रु. ४०००, *भावना अरविंद प्रधान, मुलुंड (प) रु. २०००, *विकास सावंत, नवी मुंबई रु. ११११, *रमेश सोनू गिरकर, नवी मुंबई रु. ५९००, *माया आर. तेलंग, ठाणे (प) रु. १००००, *ज्योत्स्ना जगदीश मुळ्ये, ठाणे (प), रु. ११०००, बळवंत दांडेकर, नौपाडा रु. १०००, *संजय सुधीर चांदे, ठाणे यांजकडून छोलू (श्वान) याच्या स्मरणार्थ रु. ११११, *अनिता अचल कुलकर्णी, ठाणे (प), रु. १५००, *अचलकुमार कल्याण कुलकर्णी, ठाणे (प), रु. १५००, *मिनाक्षी सुधाकर मेस्त्री, भांडुप

लोकसत्ता सर्वकार्येषु सर्वदा
बँकिंग पार्टनर
दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.

(पू) रु. ५००००, *सुरेखा दत्तात्रय ओवळेकर, ठाणे (प), रु. ३५०००, *सुरेखा विलास जोग, (प), रु. ३००००, *विद्या सुहास थावरे, अंबरनाथ रु. २८०००, *विजया मोने, ठाणे (प), रु. २५०००, *प्रतिमा ए. आंबेडकर, ठाणे (प), रु. २५०००, *सुहास एकनाथ थावरे, अंबरनाथ (पू), रु. २४०००, *अनुराधा बी. निंबाळकर, मुलुंड (पू), रु. १५०००, *मिलिंद वासुदेव शिक्रापूरकर, ठाणे रु. १४०००, *नरेंद्र पुंडलिक सावंत, ठाणे (प), रु. ११११११, *वासुदेव दत्तात्रय कानिटकर, कल्याण (प), यांजकडून श्रीमती लक्ष्मी गणेश कानिटकर यांच्या स्मरणार्थ रु. ११०००, *किशोर मधूसुदन मेहेंदळे, ठाणे यांजकडून एम. बी. मेहेंदळे यांच्या स्मरणार्थ रु. १००००, *अलका सुधाकर फडके, कळवा रु. १००००, *धनंजय सिताराम सावंत, ठाणे यांजकडून कै. सिताराम ज्ञानू सावंत आणि काशीबाई सिताराम सावंत यांच्या स्मरणार्थ रु. १००००, *किशोर रघुनाथ ओक, ठाणे रु. १००००, *अर्चना अशोक पाटणकर, ठाणे रु. १००००, *रमेश वसंत ढवणे, ठाणे रु. १००००, *वृंदा विजय अत्रे, ठाणे (प), रु. १००००, *डॉ. ज्योती विजय सावंत, ठाणे (प), रु. १००००, *निलिमा पी. कार्लेकर, ठाणे (प), रु. ७५००, *गंगाधर सुडकोजी खांबे, मुलुंड (पू), रु. ५०००, *सतीश यशवंत मोरे, डोंबिवली (प), रु. ५०००, *मंदाकिनी जी. भालेराव, ठाणे (पू), रु. ५०००, *वनिता तावडे, नवी मुंबई रु. ५०००, मृगन वसंत सावंत, ठाणे रु. ५०००, *दिपक के. सारंगधर, ठाणे (प), रु. ५०००, *उषा रमाकांत परब, मुलुंड (पू), रु. ४००० **(क्रमशः)**

# फळपीक विमा तीनपट महाग

## संत्री उत्पादक शेतकऱ्यांच्या संकटात भर

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

> **फळ पीक विमा योजना शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे की कंपनीच्या फायद्यासाठी, असा प्रश्न पडला असून संत्री उत्पादक शेतकरी संकटाचा नेहमी सामना करीत फळपिकांचे रक्षण करतो. परंतु, या दरम्यान विमा महागला. परंतु त्या तुलनेत शेतकऱ्यांनी विमा संरक्षण मिळणारी रक्कम कमी आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन विमा हप्ता कमी करावा.** - **रूपेश वाळके,** तालुका उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

**अमरावती :** राज्यात फळ पिकांच्या हवामान धोक्यांच्या निकषानुसार पुनर्रचित हवामान आधारित फळ पीक विमा योजना राबवण्यात येत आहे. मात्र, संत्री फळ पीक विमा अचानक तीन पटीने महागल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित आंबिया बहार फळ पीक विमा योजनेत अमरावती जिल्ह्यातील संत्री फळ पिकाला शेतकऱ्यांच्या वाट्यात हेक्टरी तीन पटीने वाढ केल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

संत्र्यावरील रोग, गळती, अत्यल्प भाव, अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे शेतकरी अगोदरच विवंचनेत असताना अचानक संत्री फळ पीक विमा महागला आहे. शेतकऱ्यांचा हिस्सा ४ हजार रुपये प्रतिहेक्टर होता, मात्र आता तोच फळ पीक विमा १२ हजार रुपये प्रतिहेक्टरी हिस्सा भरावा लागेल, असे परिपत्रकात नमूद केले आहे.

२०२०-२१ मध्ये संत्री विम्याची रक्कम प्रतिहेक्टरी ४ हजार रुपये होती. त्यावरील शेतकऱ्यांना विमा संरक्षित मिळणारी रक्कम ८० हजार रुपये इतकी होती. परंतु आता शासनाने याच विम्याची रक्कम तीनपट वाढवून प्रतिहेक्टरी रक्कम बारा हजार रुपये केली आहे. अशातच वाढवलेल्या विम्याच्या रक्कमेच्या तुलनेत संरक्षित रक्कम वाढवायला पाहिजे होती. परंतु उलट संरक्षित रक्कम न वाढवता ८० हजार रुपये हेक्टर कायम ठेवली आहे. त्यातही गारपीट विम्यासाठी जास्तीचा १३३३ रुपये हेक्टरी वेगळा विमा भरावा लागेल.

अमरावती जिल्ह्यात शेतकऱ्यांना १२ हजार रुपये, अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ४ हजार रुपये आणि नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २० हजार रुपये प्रति हेक्टरी शेतकरी पीक विमा हिस्सा लागू करण्यात आला आहे. त्यामुळे महागलेल्या विम्याचे नवीन संकट उभे झाले असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
1972-2022
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
प्रस्तुत

लोकसत्ता यशस्वी भव! ११३

टीजेएसबी
ग्रीन कार लोन
आजच आपली इ-कार घरी घेऊन या!

व्याजदर 8.00%* पासून
₹50 लाखांपर्यंत कर्ज
100% कर्ज उपलब्ध
*अटी लागू
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
1972-2022
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
50 Years Of Banking Excellence
www.tjsbbank.co.in
Toll Free : 1800 223 466 / 1800 266 3466

# इयत्ता दहावी, एस.एस.सी. बोर्ड - भूगोल

**विद्यार्थी मित्रांनो,**

भारत आणि ब्राझील या दोन देशांच्या संदर्भातील विविधांगी प्राकृतिक घटकांचा विचार केल्यावर आपण या देशांची मानवी घटकांच्या संदर्भात विचार करूया. प्रस्तुत लेखात आपण दोन्ही देशांच्या लोकसंख्या आणि मानवी वस्ती या घटकांचा अभ्यास करणार आहोत.

### प्रकरण – ६. लोकसंख्या

देशासाठी लोकसंख्या हे महत्त्वाचे संसाधन असून देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात लोकसंख्या व तिची गुणवत्ता हे घटक महत्त्वाचे असतात. जेव्हा आपण एखाद्या देशाच्या लोकसंख्येचा अभ्यास करतो. त्यावेळेस त्या देशाची लोकसंख्येची घनता, लोकसंख्येची रचना – लिंगगुणोत्तर आणि वय संरचना. लोकसंख्या वाढीचा दर, साक्षरतेचे प्रमाण या सर्व घटकांचा विचार करीत असतो. भारत आणि ब्राझील या दोन देशांच्या लोकसंख्येचा आपण पुढील तुलनात्मक मुद्द्यांच्या आधारे विचार करू.

| मुद्दे | भारत (२०११ च्या जनगणनेनुसार) | ब्राझील (२०१० च्या जनगणनेनुसार) |
|---|---|---|
| लोकसंख्या | ■ १२१ कोटी<br>■ लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक<br>■ जगाच्या एकूण क्षेत्रापैकी भारताने व्यापलेले भूक्षेत्र – २.४१ %<br>■ जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी भारतात लोकसंख्या – १७.५ % | ■ १९ कोटी<br>■ लोकसंख्येच्या बाबतीत ब्राझीलचा जगात पाचवा क्रमांक<br>■ जगाच्या एकूण क्षेत्रापैकी भारताने व्यापलेले भूक्षेत्र – ५.६ %<br>■ जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी भारतात लोकसंख्या – २.७८ % |
| लोकसंख्या घनता | ■ ३८२ व्यक्ती प्रति चौ.कि.मी.<br>■ जास्त लोकसंख्येची घनता असलेला प्रदेश– उत्तरेकडील मैदानी प्रदेश दिल्ली चेन्नई कोलकाता मुंबई पुणे बंगळुरू इत्यादी शहरे.<br>■ लोकसंख्येचे विरळ असलेला प्रदेश पर्वतीय , शुष्क वाळवंटी प्रदेश उदाहरणार्थ जम्मू काश्मीर, ईशान्येकडील राज्ये राजस्थानचे वाळवंट इत्यादी. | ■ २३ व्यक्ती प्रति चौ.कि.मी. ब्राझीलमध्ये लोकसंख्येचे वितरण असमान आहे.<br>■ जास्त लोकसंख्येचा प्रदेश–ब्राझीलची पूर्व किनारपट्टी आग्नेय भाग<br>■ विरळ लोकसंख्येचा प्रदेश – ब्राझीलचा मध्य व पश्चिम भाग, अ‍ॅमेझॉन नदीचे खोरे, ब्राझीलच्या उच्च भूमीच्या प्रदेशात मध्यम स्वरूपाची लोकसंख्या. |
| लिंग गुणोत्तर | ■ ब्राझीलमध्ये लिंग गुणोत्तर जास्त<br>■ २०११ पासून पुरुषांच्या संख्येपेक्षा स्त्रियांच्या संख्येत लक्षणीय वाढ. | ■ भारतात कित्येक दशके लिंगगुणोत्तरात आज चढ–उतार झालेला पाहायला मिळतो<br>■ १९९१ नंतर लिंग गुणोत्तरात थोडी वाढ. |
| वय रचना | ■ ब्राझीलची लोकसंख्या हळूहळू वृद्धत्वाकडे झुकत असल्याचे आढळते. | ■ भारतात कार्यशील मनुष्यबळ असलेला तरुण वयोगट जास्त आहे. |

### लोकसंख्या वाढीचा दर आणि आयुर्मान –

- भारतापेक्षा ब्राझीलमध्ये लोकसंख्या वाढीचे प्रमाण कमी झालेले आढळते.
- २००१ ते २०११ या कालावधीत भारताची लोकसंख्या १८.२ कोटींनी वाढली.
- १९७१ नंतर भारतातील लोकसंख्यावाढीचा दर स्थिरावला परंतु वर्तमानकाळात लोकसंख्यावाढीचा दर कमी होत असला तरी लोकसंख्या वाढत आहे.
- ब्राझीलमधील लोकसंख्यावाढीचा दर कमी होत असून पुढच्या दोन दशकांत ब्राझीलची लोकसंख्या वाढण्याची शक्यता कमी आहे.
- भारत आणि ब्राझील या दोन्ही देशाच्या सरासरी आयुर्मानात मात्र वाढ झालेली दिसते.

### ७ मानवी वस्ती

यापूर्वीच्या इयत्तांमध्ये आपण मानवी वस्ती यांचे केंद्रित वस्ती, विखुरलेली वस्ती, रेषाकृती वस्ती असे विविध प्रकार पाहिले. या प्रकरणात आपण भारत आणि ब्राझील या दोन्ही देशातील मानवी वस्त्यांचा आकृतिबंध आणि नागरीकरण यांचा अभ्यास करणार आहोत.

#### भारत

- वस्त्यांच्या आकृतिबंधात विविधता आढळते कारण– हवामानातील भिन्नता, पाण्याची उपलब्धता, जमिनीचा उतार व सुपीकता.
- केंद्रित वस्त्यांचे प्रदेश – उत्तर भारतीय मैदानी प्रदेश, पूर्व किनारपट्टी, नर्मदेचे खोरे, विंध्य पठार व शेतीखाली असणारे भारतातील इतर भाग.
- विरळ व विखुरलेल्या वस्त्यांचे प्रदेश – मध्य भारताचा वनाच्छादित भाग, राजस्थानचा पश्चिम व दक्षिण भाग, हिमालयाचा उतार व विखंडित तसेच उंच–सखल प्रदेश.

#### ब्राझील

- वस्त्यांच्या विकासाची कारणे– किनारपट्टीचे सम व दमट हवामान, मुबलक पाणीपुरवठा, साधनसंपत्तीची उपलब्धता इत्यादी.
- दाट लोकवस्तीचे प्रदेश ङ किनारी प्रदेश, सावो पावलोचा प्रदेश
- विरळ व विखुरलेल्या वस्त्यांचा प्रदेश– ईशान्य भागातील उच्चभूमीचा प्रदेश, अ‍ॅमेझॉन नदीचे खोरे,

#### नागरीकरणाचे स्वरूप


| | भारत | ब्राझील |
|---|---|---|
| वेग | नागरीकरणाचा वेग कमी | विकसनशील देशांपैकी अधिक नागरीकरण झालेला देश |
| स्वरूप | नागरीकरणाचा कल ३१.२% | सुमारे ८६ % लोकसंख्या शहरी भागात. |
| प्रदेशनिहाय नागरीकरण | गोवा – सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य<br>दिल्ली– सर्वाधिक नागरीकरण झालेला केंद्रशासित प्रदेश | प्रामुख्याने दक्षिण आणि आग्नेय भागात सावो पावलो या महानगरात आणि औद्येगिक प्रदेशात नागरीकरणाची सर्वाधिक वाढ. |
| जास्त नागरीकरण | तामिळनाडू, महाराष्ट्र, गुजरात, केरळ | सावो पावलो या महानगरात आणि औद्योगिक प्रदेशात नागरीकरणाची सर्वाधिक वाढ. गोइआस, रिओ द जनेरिओ |
| कमी नागरीकरण | हिमाचल प्रदेश, जम्मू–काश्मीर, उत्तराखंड, बिहार, राजस्तान | देशाचा पश्चिम भाग, उच्चभूमीचा प्रदेश, अ‍ॅमेझॉन नदीचे खोरे, |

#### भूगोलातील कृती – कौशल्ये

प्रस्तुत लेखात आपण भूगोलाच्या कृतिपत्रिकेतील कौशल्यावर आधारित कृती क्रमांक ४ आणि ६ मधील नकाशा वाचन व आलेख वाचन या प्रश्नांचा विचार करूया. आलेख व नकाशा वाचन करताना त्यांचे नीट निरीक्षण करून उत्तरे शोधा. या प्रश्नांची उत्तरे लिहिताना पूर्ण वाक्यात लिहावीत. भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील लोकसंख्या व मानवी वस्ती ही प्रकरणे आलेख व नकाशा वाचनाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत.


1. आलेख वाचन करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

साक्षरता प्रमाण :



1. दिलेला आलेख कोणत्या प्रकारचा आहे?
2. २०११ साली ब्राझीलमध्ये साक्षरतेचे प्रमाण किती होते?
3. भारतात ६१% साक्षरतेचे प्रमाण कोणत्या वर्षी होते?
4. कोणत्या देशात साक्षरतेचे प्रमाण सर्वात जास्त आहे?
5. कोणत्या दशकात भारतात साक्षरता वाढ सर्वात जास्त झालेली आढळते?
6. भारत आणि ब्राझीलच्या साक्षरता प्रमाणाचे थोडक्यात विश्लेषण करा.

2. नकाशा वाचन करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा .




१. ब्राझीलच्या दक्षिणेस कोणता गवताळ प्रदेश आहे ?
२. अ‍ॅमेझॉन नदीच्या मुखाशी कोणते बेट आहे?
३. ब्राझीलमधील सर्वोच्च शिखर कोणते?
४. अजस्र कडा ब्राझीलच्या कोणत्या दिशेला आहे?
५. ब्राझीलच्या पश्चिम दिशेला कोणता महासागर आहे?

#### स्वाध्याय

**प्र.१. खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा. चुकीची विधाने दुरुस्त करून लिहा.**

१. भारतापेक्षा ब्राझीलमध्ये साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे.
२. ब्राझीलच्या पश्चिम भागात दाट लोकवस्ती आहे.
३. ब्राझीलमधील सुरुवातीच्या वस्त्या युरोपमधून आलेल्या वसाहतवाद्यांनी निर्माण केल्या.
४. भारतात उत्तरेच्या तुलनेत दक्षिणेकडे नागरीकरण जास्त झालेले आढळते.

**प्र. २. फरक स्पष्ट करा.**

१. गंगा नदीच्या खोऱ्यातील मानवी वस्त्या व अ‍ॅमेझॉन नदीच्या खोऱ्यातील मानवी वस्त्या
२. भारतातील लोकसंख्या वितरण व ब्राझीलमधील लोकसंख्या वितरण
३. भारतातील लिंगगुणोत्तर व ब्राझीलमधील लिंगगुणोत्तर

**प्र. ३. भौगोलिक कारणे लिहा.**

१. लोकसंख्या हे महत्त्वाचे संसाधन आहे.
२. गंगेच्या खोऱ्यात लोकसंख्येचे वितरण दाट आहे.
३. ईशान्य ब्राझीलमध्ये वस्त्या विरळ आहेत.

**लेखक – राहुल बळवंत प्रभू,** सहाय्यक शिक्षक, प्राचार्य जनार्दन लक्ष्मण शिर्सेकर शिक्षण संस्थेचे, महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व), मुंबई.
**समन्वयक – जगदीश इंदलकर,** मुख्याध्यापक (लायन एम.पी. भूता सायन सार्वजनिक स्कूल, सायन, मुंबई)

**उद्याचा विषय : विज्ञान व तंत्रज्ञान भाग २**

## शिंदे गटाच्या मेळाव्याचे लोकलमध्ये बेकायदा थेट प्रक्षेपण

**मुंबई:** दसरा मेळाव्याची उत्सुकता शिगेला पोहोचली असतानाच पश्चिम रेल्वेवरील लोकल गाड्यांमध्ये जाहिरातीसाठी असलेल्या टिव्हीवरही शिंदे गटाच्या दसरा मेळाव्याचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. विना परवानगी लोकल गाड्यांमध्ये करण्यात आलेल्या या थेट प्रक्षेपणामुळे पश्चिम रेल्वे प्रशासनाने कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

पश्चिम रेल्वेच्या लोकल डब्यात जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी बसवण्यात आलेल्या एलईडी टिव्हीवरही शिंदे गटाच्या दसरा मेळाव्याचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. यासंदर्भात पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी सुमीत ठाकूर यांनी, राजकीय स्वरुपाची जाहिरात प्रदर्शित करता येऊ शकत नाही आणि त्यासाठी परवानगीही रेल्वेने दिलेली नाही, असे स्पष्ट केले.

## 'ध्वनी आणि प्रकाश'चे काम वेळेत पूर्ण करा : लोढा

**मुंबई :** पर्यटन विभाग, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन आणि मुंबई महानगरपालिकेने गेट वे ऑफ इंडिया येथील 'ध्वनी आणि प्रकाश' शोचे काम नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी गुरुवारी दिले. गेट वे ऑफ इंडिया येथे ध्वनी आणि प्रकाश शो करण्याच्या दृष्टीने पर्यटन विभागाने आयओसीएल आणि मुंबई महानगरपालिकेबरोबर नुकताच सामंजस्य करार केला असून या कामाचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी पर्यटन विभागाचे सचिव सौरभ विजय, पर्यटन संचालक बी. एन. पाटील आदी उपस्थित होते.

## 'धनुष्यबाण' चिन्ह आमचेच!

*(पान १ वरून)* चिन्हाबाबत निर्णय घेण्यास निवडणूक आयोगाला परवानगी दिली आहे. ठाकरे गटाला पक्षाचे पुरेसे समर्थन नसतानाही धनुष्यबाण हे चिन्ह ३ नोव्हेंबरला होणाऱ्या अंधेरी पोटनिवडणुकीत वापरण्याची शक्यता आहे. त्यामुळे अंधेरी पोटनिवडणूक लक्षात घेता धनुष्यबाण या चिन्हाबाबत निवडणूक आयोगाने तातडीने सुनावणी घेऊन धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला द्यावे, अशी विनंती या गटाने निवडणूक आयोगाला केली आहे. शिंदे गटाच्या अर्जानुसार येत्या तीन-चार दिवसांत निवडणूक आयोग सुनावणी घेण्याची शक्यता आहे.

## राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा योजना स्थगित

**(पान १ वरून)** आणि बारावीसाठी एक हजार दोनशे पन्नास रुपये दर महिना, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर पदवी स्तरासाठी दोन हजार रुपये दर महिना आणि पीएच.डी.साठी 'यूजीसी'च्या निकषांनुसार शिष्यवृत्तीची रक्कम देण्याचे निश्चित करण्यात आले. 'एनटीएस' परीक्षा योजना स्थगितीबाबतचे परिपत्रक 'एनसीईआरटी'ने संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. या योजनेसाठी ३१ मार्च २०२१ पर्यंतची मान्यता देण्यात आली होती. सध्याच्या स्वरूपानुसार ही योजना पुढे राबवण्यासाठी अद्याप मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे पुढील आदेशापर्यंत योजना स्थगित करण्यात येत असल्याचे त्यात नमूद करण्यात आले आहे.

# मुदत आज संपुष्टात

## विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या निर्णयाबाबत उत्सुकता

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** शिवसेना नेमकी कोणाची, यावर निर्णय घेण्यासाठी ठाकरे व शिंदे गटाला दिलेली मुदत शुक्रवारी संपुष्टात येत असल्याने केंद्रीय निवडणूक आयोग 'धनुष्य-बाणा'चा हक्क कोणत्या गटाकडे सुपूर्द करणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

अंधेरी-पूर्व विधानसभा मतदारसंघामध्ये ३ नोव्हेंबर रोजी पोटनिवडणूक होत असून १४ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. त्यापूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून निकालाची अपेक्षा आहे.

निवडणूक आयोगाने दोन्ही गटांना ७ ऑक्टोबरपर्यंत कागदपत्रे सादर करण्यास सांगितली होती. त्यामुळे शुक्रवारी ठाकरे गटाच्या वतीने कोणती कागदपत्रे आयोगाला दिली जातात आणि आयोगासमोर कोणता युक्तिवाद केला जातो, हेही महत्त्वाचे मानले जात आहे.

खरी शिवसेना आमचीच असून शिवसेनेच्या निवडणूक चिन्हावर आमचाच अधिकार असल्याचा दावा शिंदे गटाने केला आहे. मात्र हा दावा करण्यासाठी शिंदे गटाच्या वतीने कोणती कागदपत्रे आयोगाला सादर केली, याची माहिती दिली जावी. त्यानंतर आम्हीही आवश्यक कागदपत्रे सादर करू, अशी विनंती ठाकरे गटाने आयोगाला केली आहे. ठाकरे गटाच्या वतीने शुक्रवारी आयोगासमोर हाच मुद्दा उपस्थित केला जाऊ शकतो. ठाकरे गटाच्या विनंतीवर आयोग कोणता निर्णय घेतो, यावरही शुक्रवारी ठरू शकेल. ठाकरे गटाची विनंती मान्य केली तर शिंदे गटाच्या कागदपत्रांचा अभ्यास करून ठाकरे गट कागदपत्रे व पुरावे सादर करेल. त्यासाठी ठाकरे गटाकडून मुदत मागून घेतली जाण्याची शक्यता आहे.

ठाकरे गटाची विनंती आयोगाने मान्य केली नाही तर मात्र ठाकरे गटाला शुक्रवारी कागदपत्रे सादर करावी लागेल आणि दोन्ही गटांच्या कागदपत्रांची छाननी करून निवडणूक आयोग निकाल देऊ शकेल.

### कागदपत्रांवर अवलंबून

शिवसेनेमध्ये जूनमध्ये झालेल्या बंडखोरीनंतर शिंदे गटाने केंद्रीय निवडणूक आयोगाकडे दावा घेत निवडणूक चिन्हावर दावा केला होता आणि तातडीने सुनावणी घेऊन धनुष्य-बाणाच्या हक्कावर निर्णय घेण्याची मागणी केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयामधील प्रलंबित खटल्यांचा निकाल लागेपर्यंत निवडणूक आयोगासमोर सुनावणी न घेण्याची



विनंती ठाकरे गटाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात केली होती. हा विनंती अर्ज सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यांच्या घटनापीठाने फेटाळून लावला आणि खरी शिवसेना कोणाची याचा निर्णय घेण्याची मुभा केंद्रीय निवडणूक आयोगाला दिली. त्यामुळे शुक्रवारी आयोगासमोर ठाकरे गटाकडून कोणती कागदपत्रे दिली जातात आणि कोणता युक्तिवाद केला जातो, यावर निकाल अवलंबून असेल. शिंदे गटाने यापूर्वीच आयोगाकडे कागदपत्रे सादर केली आहेत.

# भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या खऱ्या शिवसेनेचा भगवा फडकेल

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे वक्तव्य

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** खरी शिवसेना ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची असल्याचे कालच्या दसऱ्या मेळाव्यामध्ये दिसले आहे. राज्यामध्ये आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये भगवाच फडकणार असून, तो भगवा हा भाजप आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्या खऱ्या शिवसेनेचा असेल, असे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. 'शिमग्यावर बोलायचे नसते,' असे सांगत त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या दसऱ्या मेळाव्यावर टीका केली.

कृषी विभागाच्या वतीने बालेवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या नैसर्गिक शेती राज्यस्तरीय परिषदेनंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

फडणवीस म्हणाले,'दसरा मेळाव्यामध्ये शिंदे यांच्या खऱ्या शिवसेनेसाठी गर्दी झाली होती. मुख्यमंत्री शिंदे हे सरकारच्या विकासाच्या मुद्द्यावर बोलले. राज्याच्या कानाकोपऱ्यातून लोक शिंदे यांच्या दसरा मेळाव्याला आले होते. त्यामुळे खरी शिवसेना ही शिंदे यांचीच आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत भगवाच फडकणार असून, तो भगवा भाजप आणि शिंदे यांच्या खऱ्या शिवसेनेचा असेल.'

उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना फडणवीस म्हणाले, की मी दोन्हीही भाषणे ऐकली नाहीत. मी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमासाठी नागपूरमध्ये होतो. बातम्यांमधून जे दिसले ते पाहता, उद्धव ठाकरे गटाचा शिवाजी पार्कवर झालेला दसरा मेळावा हा मेळावा नसून, शिमगा होता. त्या शिमग्यावर बोलण्याची गरज नाही. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाही कधी मुख्यमंत्र्यांसारखे भाषण करू शकले नाहीत. ते कायम पक्षप्रमुख या नात्यानेच भाषण करतात.

ठाकरे हे मूळ विचारधारा सोडून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर गेले. मुंबईतील बॉम्बस्फोटाशी संबंध असलेल्यांबरोबर बसणे त्यांनी मान्य केले. त्यामुळेच त्यांच्यावर ही वेळ आली आहे, असेही फडणवीस म्हणाले.

### 'उद्धव ठाकरेंनी स्क्रिप्ट रायटर बदलावा'



पत्रकारांशी बोलताना फडणवीस यांनी शिंदे गटाचा बचाव करताना उद्धव ठाकरे गटाच्या मेळाव्याला फारसे महत्त्व न देण्याचा प्रयत्न केला. भाजपचे 'स्क्रिप्ट' मुख्यमंत्री शिंदे यांनी वाचून दाखविले, अशी टीका होत आहे. त्याबाबत एका प्रश्नाला उत्तर देताना फडणवीस म्हणाले, की आमच्या स्क्रिप्टचा विचार करण्यापेक्षा उद्धव ठाकरेंनी आपला स्क्रिप्ट रायटर बदलावा.

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी लवकरच सेंद्रिय शेतीची लोकचळवळ

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** शेतकरी आत्महत्या रोखणे व सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी राज्यात डॉ. पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीला लोकचळवळीचे स्वरूप देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी राष्ट्रीय नैसर्गिक शेती आणि डिजिटल शेती कार्यशाळेत दिली.

नवी दिल्लीत झालेल्या या राष्ट्रीय कार्यशाळेत दूरचित्रसंवादाच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहभागी झाले होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, कृषिमंत्री नरेंद्र सिंह तोमर, रसायन व खत मंत्री मनसुख मांडविया आणि विविध राज्यांचे मुख्यमंत्री यावेळी उपस्थित होते. राज्यात सुमारे सध्या ५.२७ लाख हेक्टर क्षेत्रात प्रमाणित सेंद्रिय शेती केली जाते. तर १० लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली येत असून केंद्राच्या कृषी विकास योजना आणि भारतीय नैसर्गिक शेती प्रणाली योजनेच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन दिले जात असल्याची माहिती शिंदे यांनी यावेळी दिली. रासायनिक औषधे आणि खतांचा वापर कमी व्हावा यासाठी विज्ञानाधारित सेंद्रिय शेतीसाठी राज्यात प्रयत्न सुरू आहेत. रासायनिक खते आणि औषधांशिवाय जमिनीचे संवर्धन करण्यासाठी राज्य शासन नैसर्गिक शेती पद्धतीचा वापर वाढविण्याबाबत शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले जात आहे. यामुळे कमी खर्च आणि अधिक फायदेशीर शेती होण्यास मदत होईल. त्याचा लहान शेतकऱ्यांना लाभ होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्यात आतापर्यंत १६२८ शेतकरी गटातील ६१ हजार शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना माफक दरात नैसर्गिक आणि सेंद्रिय शेती करण्यासाठी मदत करण्यासाठी स्वतंत्र संस्था स्थापन करण्याची घोषणाही शिंदे यांनी यावेळी केली. डॉ.पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती अभियानाची स्थापना करण्यात आली असून त्या माध्यमातून शेतकरी आत्महत्याग्रस्त भागात सेंद्रिय शेतीवर भर देण्यात येत आहे, असेही शिंदे यांनी सांगितले.

नैसर्गिक आणि डिजिटल शेती संदर्भात प्रशिक्षणाची गरज असून यासाठी तज्ज्ञ प्रशिक्षक तयार करण्याचा कार्यक्रम सुरू करण्यात येईल.तसेच कृषी व्यवसायास प्रोत्साहन देणे आणि कृषी उत्पादनांची मूल्य साखळी विकसित करण्यासाठी बाळासाहेब ठाकरे स्मार्ट प्रकल्प आणि एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या मदतीने मॅग्नेट प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून नैसर्गिक शेतीवरही भर देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.


### डिजिटल शेतीसाठी प्रयत्न

राज्यात डिजिटल शेतीसाठी प्रयत्न करण्यात येत असून आतापर्यंत दोन कोटी २० लाख ४५ हजार शेतकऱ्यांचे भूमी अभिलेख माहितीचे डिजिटलायझेशन पूर्ण झाले आहे. ई-पीक पाहणी उपक्रमातून एक कोटी हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावरील पिकांची माहिती मिळत आहे. प्रधानमंत्री शेतकरी विमा योजनेच्या ऑनलाइन पोर्टलवर एक कोटी १२ लाख शेतकऱ्यांची माहिती उपलब्ध आहे. जमिनीच्या नोंदीनुसार या माहितीमध्ये दुरुस्ती करण्याची प्रक्रिया सुरू असून ही माहिती इतर योजनांच्या अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# समृद्धी महामार्ग दिवाळीपूर्वी सेवेत?

## पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गातील नागपूर ते शिर्डी अशा पहिल्या टप्प्याचे दिवाळीपूर्वी उद्घाटन करण्याचे नियोजन राज्य सरकारचे असल्याची माहिती समोर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार पंतप्रधानांची वेळ घेण्यासाठी सरकारकडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत.

दुसरीकडे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळही (एमएसआरडीसी) तयारीला लागल्याची माहिती आहे. महत्त्वाचे म्हणजे उद्घाटनासाठी १६ वा २३ ऑक्टोबर अशा दोन तारखा ठरविण्यात आल्या आहेत. पंतप्रधानांकडून वेळ निश्चित झाल्यानंतर यासंबंधी अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. दरम्यान १६ ऑक्टोबरला उद्घाटन होण्याची अधिक शक्यता व्यक्त होत आहे.

मुंबई ते नागपूर असे ७०१ किमीचे अंतर समृद्धी महामार्गामुळे केवळ आठ तासात पार करता येणार आहे. मात्र या प्रकल्पाचे काम रखडल्याने प्रकल्प पूर्णत्वास विलंब होत आहे. अशात पहिल्या टप्प्यातील काही भागाचे काम १०० टक्के पूर्ण झाल्याने २ मे रोजी नागपूर ते शेलू बाजार असा २१० किमीच्या मार्गाचे उद्घाटन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याची तयारी ही झाली होती. मात्र उद्घाटनास दोन दिवस शिल्लक असतानाच प्रकल्पात मोठी दुर्घटना घडली आणि उद्घाटन रद्द झाले. त्यानंतर राज्यात सत्तांतर झाले; उद्घाटनाचा विषय मागे पडला. पण आता शिंदे-फडणवीस सरकारने समृद्धी महामार्गाच्या उद्घाटनाचा घाट घातला आहे. महत्त्वाचे म्हणजे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन करण्याचा निर्णय घेतला आहे.

एमएसआरडीसीतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नागपूर ते शेलू बाजार ऐवजी आता नागपूर ते शिर्डी असा टप्पा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी १६ आणि २३ ऑक्टोबर अशा दोन तारखा निश्चित करण्यात आल्या असून पंतप्रधान कार्यालयाकडून तोंडी होकार मिळाला आहे. १६ ऑक्टोबर ही तारीख निश्चित करण्यात आल्याचीही माहिती समोर येत आहे. मात्र पंतप्रधान कार्यालयाकडून लेखी कळविण्यात आल्यानंतरच उद्घाटनाची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर आता सरकारकडून वा एमएसआरडीसीकडून याबाबतची अधिकृत घोषणा केव्हा केली जाते हे पाहणे आता महत्त्वाचे आहे.

दरम्यान, याबाबत एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार यांच्याकडे विचारणा केली. मात्र त्यांची कोणतीही प्रतिक्रिया उपलब्ध होऊ शकली नाही.

# 'परमबीर-वाझे यांनी स्वतःला वाचवण्यासाठी मला लक्ष्य केले'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह आणि बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांनी स्वतःला वाचवण्यासाठी आपले नाव पुढे केल्याचा दावा राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी जामीन मागताना केला आहे.

विशेष न्यायालयानेही देशमुख यांच्या या अर्जाची दखल घेऊन त्यावर सीबीआयला १४ ऑक्टोबरपर्यंत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांत उच्च न्यायालयाकडून जामीन मिळाल्यानंतर देशमुख यांनी आता सीबीआयने त्यांच्याविरोधात दाखल केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोप प्रकरणांतही जामीन देण्याची मागणी केली आहे. देशमुख यांनी वकील अनिकेत निकम आणि इंदरपाल सिंह यांच्यामार्फत गुरुवारी विशेष सीबीआय न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला.

# शेतसारा एका क्लिकवर भरण्याची सुविधा

## राज्यातील ३५६ गावांमध्ये प्रणालीचा वापर सुरू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महापालिकेच्या मालमत्ता कराप्रमाणे आता जमीन विषयक 'शेतसारा' ऑनलाइन भरण्याची सुविधा भूमी अभिलेख विभागाने सुरू केली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात राज्यातील ३५६ गावांमध्ये या प्रणालीचा वापर सुरू झाला आहे. दुसऱ्या टप्प्यात नागरीकरण झालेल्या गावांमधील शेती, तसेच अकृषिक (एनए) जमिनींसाठी या प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर शहरालगतची प्रत्येक जिल्ह्यातील पाच गावे निवडण्यात आली आहेत. यात ऑनलाइन नोटीस बजावून ऑनलाइन कर भरण्याची सुविधा विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

भूमी अभिलेख विभागाच्या या सुविधेमुळे शेती कर, बिनशेती कर, शिक्षण उपकर, रोजगार हमी उपकर, ग्रामपंचायत उपकर, जिल्हा परिषद उपकर आदी कर घरबसल्या भरता येणार आहेत. शेतसारा हा पारंपरिक कर आहे. पूर्वी शेतसारा हा महसूल देणारा महत्त्वाचा कर होता. कालांतराने नव-नवीन करांची आकारणी सुरू झाली. मात्र, जमिनींवर आकारल्या जाणाऱ्या कराची वसुली अजूनही सुरू आहे. जमिनीच्या क्षेत्रानुसार कर आकारण्यात येतो. शेतीचा कर हा कमी असल्याने या कराची वसुली अपेक्षित होत नाही. थकबाकीची रक्कम मोठी झाल्यावर हा कर वाढत जातो. थकबाकीची रक्कम ही तलाठी कार्यालयात गेल्यावरच कळते. तसेच आता घरबसल्या ऑनलाइन सातबारा उतारा मिळत असल्याने तलाठी कार्यालयातही नागरिकांना जावे लागत नाही. त्यामुळे हा कर वसूल होत नाही. यासाठी आता भूमी अभिलेख विभागाने 'ई-चावडी' या संगणक प्रणालीमध्येच शेतीचा कर ऑनलाइन भरण्याची सुविधा देण्यासाठी काम सुरू केले आहे. त्यासाठी संगणक प्रणाली तयार करण्यात आली आहे. प्रायोगिक तत्त्वावर राज्यातील ३५६ गावांमध्ये या संगणक प्रणालीचा वापर करून शेतसारा ऑनलाइन भरण्याची सुविधा सुरू झाली असल्याचे भूमी अभिलेख विभागाकडून सांगण्यात आले.

प्रत्येक जिल्ह्यात किंवा महसूल विभागात रजिस्टर नमुना लिहिण्याची पद्धत वेगळी आहे. या ठिकाणी आलेल्या अडचणी सोडवून संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात आले आहेत. या गावांमध्ये प्रामुख्याने शेतीचा कर आकारण्यात आला आहे. या लहान गावांमध्ये एनए जमिनी नसल्याने आता शहरालगतची गावे निवडून एनए करही आकारण्याच्या पर्यायाची चाचणी करण्यात येत आहे. यासाठी तलाठ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

# अंदाजित विकासदरात एका टक्क्याने घट

*(पान १ वरून)*

केला. भारताच्या अर्थव्यवस्थेचा वाढीच्या दरासंबंधी जागतिक बँकेने सुधारित अंदाज वर्तविला असला तरी उर्वरित जगाच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्था वेगाने सावरत आहे, असे बँकेने दक्षिण आशियाई क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेसंबंधीच्या या अहवालात नमूद केले आहे. गेल्या आर्थिक वर्षात भारताच्या अर्थव्यवस्थेने ८.७ टक्क्यांची विकासगती राखली होती.

भारतीय अर्थव्यवस्थेने दक्षिण आशियातील इतर देशांच्या तुलनेत चांगली कामगिरी केली आहे. करोनाच्या पहिल्या लाटेनंतर मजबूत आर्थिक धोरणाच्या जोरावर अर्थव्यवस्था जलदगतीने पूर्वपदावर आली. जागतिक संकटांमुळे जगातील देशांवर कर्जाचा डोंगर वाढतो आहे. मात्र, त्या तुलनेत भारताची परिस्थिती समाधानकारक असल्याचे मत जागतिक बँकेचे दक्षिण आशिया क्षेत्रासाठी मुख्य अर्थतज्ज्ञ हॅन्स टिमर यांनी व्यक्त केले.

करोना काळानंतर भारतीय सेवा क्षेत्राने विशेषतः निर्यातीच्या आघाडीवर चांगली कामगिरी केली. मात्र, सध्याच्या जागतिक पातळीवर प्रतिकूल वातावरणामुळे भारताच्या विकासदराच्या अंदाजात घट केली आहे. जागतिक पातळीवर प्रमुख देशाच्या मध्यवर्ती बँकांनी व्याजदर वाढीचा धडाका लावला आहे. परिणामी, उच्च उत्पन्न असलेल्या देशांच्या वास्तविक अर्थव्यवस्थेतील वाढ मंदावली आहे. याचा भारतासारख्या विकसनशील देशांवर परिणाम होणे स्वाभाविक आहे. उच्च व्याजदर वाढ आणि घसरत्या चलनाच्या मूल्यामुळे देशातील परदेशी गुंतवणुकीचा ओघ आटला आहे, असेही टिमर यांनी कारणमीमांसेत म्हटले आहे.

**गहू-निर्यातबंदीचा निर्णय आत्मघातकी :** भारताने तळागाळातील घटकांपर्यंत सामाजिक सुरक्षा जाळ्यांचा विस्तार करण्यासाठी डिजिटल उपायांचा वापर करून जगासमोर आदर्श उदाहरण घालून दिले. तथापि, गव्हावरील निर्यात बंदी आणि तांदूळ निर्यातीवर उच्च कर आकारणी यासारखे निर्णय न पटणारे आहेत, असे जागतिक बँकेने अहवालात नमूद केले आहे. चढ्या किमतीला प्रतिक्रिया स्वरूपात हे निर्णय तूर्त तर्कसंगत वाटत असले तरी दीर्घकाळात ते आत्मघातकीच ठरतील, असे बँकेने म्हटले आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांचे निवेदनाद्वारे स्पष्टीकरण

# कास महोत्सवाचे शासनाकडूनच आयोजन

**लोकसत्ता वार्ताहर**

**वाई:** जागतिक संवेदनशील भाग म्हणून ज्याची घोषणा करण्यात आली आहे, अशा कास पठारावर पर्यटन महोत्सवाच्या नावाखाली नियमबाह्य पद्धतीने मनोरंजनाचे व खाद्य महोत्सवाचे शासनानेत आयोजन केल्याची कबुली जिल्हाधिकारी रुचेस जयवंशी यांनी निवेदनाद्वारे दिली आहे. दरम्यान, याप्रकरणी लोकप्रतिनिधीदेखील मूग गिळून गप्प आहेत. दरम्यान, या महोत्सवासाठी पठारावर वृक्षतोड आणि अन्य प्रकारे निसर्गाचे नुकसान केल्याबद्दल स्थानिक आयोजकांविरुद्ध वन विभागाच्या वतीने गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दुसरीकडे या महोत्सवाविरुद्ध निसर्गप्रेमींपासून सामान्य नागरिकांपर्यंत अनेकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

शासनाचा पर्यटन विभाग, वन विभाग आणि सातारा जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने सात ते नऊ ऑक्टोबर या कास महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी रुचेस जयवंशी यांनी निवेदनाद्वारे दिली. कास पठाराला दरवर्षी लाखो पर्यटन भेट देतात. या निसर्ग पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटन विभाग वन विभाग आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केल्याचे या निवेदनात म्हटले आहे.

या महोत्सवानिमित्त येणाऱ्या पर्यटकांना या परिसरातील गावांच्या वैशिष्ट्यांची माहिती देण्यात येणार आहे. येथील स्थानिक गावांना त्या गावातील बचत गटांना येथे प्रत्येकी एक स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वनविभागातर्फे कास परिसराची माहिती, वैशिष्ट्ये, विविधतेची माहिती पर्यटकांना दिली जाईल असे या निवेदनात म्हटले आहे.

### असे महोत्सव नकोत : शिवेंद्रसिंहराजे

कास पठार हे जागतिक पातळीवर संवेदनशील भाग आहे. अशा स्थळावर निसर्ग पर्यावरणाला बाधा आणणारे महोत्सव भरवणे चुकीचे आहे. अशा चंगळवादी महोत्सवांमुळे पठारावरील जैव संपदेला धोका निर्माण झाला आहे, असे मत आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व्यक्त केले आहे.

## दिनदर्शिका

**शुक्रवार, ७ ऑक्टोबर २०२२**
भारतीय सौर अश्विन १५ शके १९४४
मिती आश्विन शुक्लपक्ष
द्वादशी ०७ : २७ पर्यंत.
नक्षत्र : शततारका १८ : १७ पोर्यंत.
चंद्र : कुंभ

- **मेष** : ज्ञानात भर पडेल.
- **वृषभ** : घरातून मदत मिळेल.
- **मिथुन** : नवनिर्मितीचा आनंद होईल.
- **कर्क** : निराशेतून बाहेर पडा.
- **सिंह** : सार्वजनिक गोष्टींची आवड.
- **कन्या** : कोणाला दुखावू नका.
- **तूळ** : मित्रांचे सहकार्य मिळेल.
- **वृश्चिक** : घरगुती पेच सुटेल.
- **धनू** : शेजार धर्म जपाल.
- **मकर** : यशाचे गणित जमेल.
- **कुंभ** : वैवाहिक सौख्य लाभेल.
- **मीन** : घाई करू नका.

**शुभ राशी : तूळ , मकर**


## नेटक्लिप्स

लो : लोकसत्ता .COM

- नंदुरबार येथे घोडे शर्यती दरम्यान घडला काळजाचा ठोका चुकवणारा प्रसंग
- गांबियातील घटनेनंतर डब्ल्युएचओने ४ भारतीय औषधांवर अलर्ट केला जारी




व्हिडीओ बघण्यासाठी वरील क्यूआर कोड स्कॅन करा...

- दृश्यकथा
- दैनिक ब्रीफिंग
- वाचनीय लेख
- बातम्यांचा अनुभव

### सर्वाधिक वाचकपसंती

- अग्रलेख : दशमीदिनी एकादशी!
- दसरा मेळावा २०२२ : उद्धव ठाकरे की एकनाथ शिंदे, कोणाच्या मेळाव्यात झाली जास्त गर्दी?
- मुंबई पोलिसांनी दिली आकडेवारी
- केंद्रात शिंदे गटाचं वजन वाढलं! सत्तांतरणानंतर पंतप्रधान मोदींच्या सरकारने शिंदे गटाकडे सोपवली पहिली महत्त्वाची जाबबदारी
- भारत मुक्ती मोर्चाचा संघ मुख्यालयावर मोर्चा, पोलिसांकडून कार्यकर्त्यांची धरपकड

# पीएच.डी.बरोबरच दुसऱ्या पदवी अभ्यासक्रमास परवानगी नाही

## एकाचवेळी दोन पदवी अभ्यासक्रमाबाबत यूजीसीकडून मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एकाचवेळी दोन पदवी अभ्यासक्रम करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यानुसार एकाचवेळी दोन पदवी अभ्यासक्रम करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना पीएच.डी. वगळता अन्य अभ्यासक्रमांना लागू असतील असे यूजीसीने स्पष्ट केले आहे. त्यामुळे पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचवेळी दुसऱ्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येणार नाही.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'मध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणिक प्रक्रिया अनुभवाधिष्ठित, सर्वसमावेशक, संशोधनाधिष्ठित आणि विद्यार्थीकेंद्रित होण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखून त्या वृद्धिंगत करण्यासाठी सोयीसुविधा निर्माण करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन पूर्णवेळ शैक्षणिक अभ्यासक्रम करण्याची मुभा देण्याचा निर्णय यूजीसीने एप्रिलमध्ये घेतला होता. त्यानंतर आता या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या रचनेत आवश्यक ते बदल करण्याच्या सूचना यूजीसीने मार्गदर्शक सूचनांद्वारे दिल्या. तसेच विद्यार्थ्यांना दोन्ही अभ्यासक्रमांना उपस्थित राहता येण्यासाठी, दोन्ही अभ्यासक्रमांच्या वेळा अडचणीच्या ठरणार नाहीत याची दक्षता घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना एकाचवेळी दोन पूर्णवेळाचे अभ्यासक्रम करून पदव्या घेता येऊ शकतात. मात्र अभ्यासक्रमांमध्ये वेळेची अडचण होऊ नये या दृष्टीने एकाएच वेळी दोन पदवी अभ्यासक्रम करताना एक प्रत्यक्ष पदवी अभ्यासक्रम, तर दुसरा दूरशिक्षण किंवा ऑनलाइन पदवी अभ्यासक्रम किंवा एकाचवेळी दोन ऑनलाइन किंवा दूरशिक्षण अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येईल. दूरशिक्षण किंवा ऑनलाइन पद्धतीने पदवी अभ्यासक्रम करण्यासाठी संबंधित संस्थेकडे तो अभ्यासक्रम राबवण्यासाठी यूजीसी किंवा नियामक परिषद किंवा केंद्र सरकारची मान्यता असणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### पूर्वलक्ष्यी प्रभावाने लाभ नाही

एकाचवेळी दोन पदवी अभ्यासक्रमांसंदर्भातील मार्गदर्शक सूचना परिपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून लागू होतील. विद्यार्थ्यांनी परिपत्रक प्रसिद्ध होण्यापूर्वी दोन अभ्यासक्रम केले असल्यास पूर्वलक्ष्यी प्रभावाने त्याचे लाभ घेता येणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधानमंडळ सचिवालयातील आस्थापनेवर लेखा व सेवा अभिलेखेविषयक कामकाजाकरिता सेवानिवृत्त अधिकाऱ्याची महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई येथे एमपॅनेलमेंटद्वारे (Empanelment) नियुक्ती करावयाची आहे.

या संदर्भातील अधिक माहिती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे संकेतस्थळ **www.mls.org.in** वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी संकेतस्थळावरील माहिती पाहून अर्ज सादर करावेत.

**(सुभाष नलावडे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ऑक्टोबर २०२२**







**पुष्कर सिंह धामी**
मुख्यमंत्री

**नरेन्द्र मोदी**
प्रधानमंत्री

## पर्यटन को मिला, नया आयाम

- दीनदयाल उपाध्याय गृह आवास अर्थात होम स्टे योजना के अन्तर्गत ग्रामीण व शहरी क्षेत्रों में अब तक चार हजार साठ (4060) आवासीय इकाईयाँ पंजीकृत की जा चुकी हैं। इस योजना के अन्तर्गत प्रत्यक्ष तथा परोक्ष रूप से लगभग बारह हजार (12,000) लोगों को रोजगार के अवसर प्राप्त हुए हैं।
- माननीय प्रधानमंत्री जी के दिशा-निर्देशों पर बदरीनाथ धाम को "स्मार्ट स्पिरिचुअल हिल टाउन" के रुप में विकसित किये जाने के उद्देश्य से राज्य सरकार द्वारा चरणबद्ध रूप से कार्य किये जा रहे हैं।
- भारत सरकार के विभिन्न सार्वजनिक उपक्रमों से रू. 2.27 करोड़ निगमित सामाजिक उत्तरदायित्व निधि (सी.एस.आर. फण्ड) से वित्त पोषण किया जा रहा है, जिसके अन्तर्गत घाट निर्माण, रेन शेल्टर, पर्यटन सूचना केन्द्र आदि अवस्थापना सुविधाओं के कार्य किये जा रहे हैं।
- सुरकण्डा देवी रोप-वे का निर्माण पूर्ण तथा मई, 2022 से रोप-वे का संचालन प्रारम्भ।
- कुमाँऊ मण्डल के अन्तर्गत लगभग अड़तीस (38) प्रमुख मंदिरों तथा पर्यटन स्थलों के महत्वपूर्ण मंदिर को मानसखण्ड मंदिर माला मिशन के अन्तर्गत विकसित किया जाना प्रस्तावित है।
- आने वाले वर्षो में गौरीकुण्ड से केदारनाथ, गोविन्द घाट से हेमकुण्ड साहिब, रानीबाग से नैनीताल, पंचकोटी से नई टिहरी, खलियाटॉप से मुनस्यारी, ऋषिकेश से नीलकंठ तथा औली से गौरसों रोप-वे परियोजनाएं प्रदेश के पर्यटन व आर्थिकी में चार चांद लगायेंगी।
- देहरादून-मसूरी, ठुलीगाड-पूर्णागिरी एवं जानकीचट्टी-यमुनोत्री रोप-वे परियोजना का निर्माण प्रगति पर।
- श्री केदारनाथ उत्थान चैरिटेबल ट्रस्ट द्वारा भारत सरकार के सार्वजनिक उपक्रमों से सी.एस.आर. मद के अन्तर्गत प्रथम चरण में रू. 225 करोड़ के कार्य पूर्ण कराये गये हैं तथा वर्तमान में रू. 198 करोड़ के कार्य गतिमान हैं।



सरकार का ध्येय

**सरलीकरण, समाधान, निस्तारीकरण और सन्तुष्टि**

सूचना एवं लोक सम्पर्क विभाग, उत्तराखण्ड द्वारा जनहित में जारी | www.uttarainformation.gov.in | uttarakhandDIPR | DIPR_UK | uttarakhand DIPR

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### ‘मातोश्री’बाहेरच्या ठाकरे कुटुंबीयांचा मेळावा

**‘दशमीदिनी एकादशी!’** या संपादकीयात (६ ऑक्टो.) खास करून शिवतीर्थ आणि बीकेसी या दोन ठिकाणी विचारांचे सोने लुटले गेल्याकडे निर्देश आहे, पण ‘टीव्ही’च्या कृपेने आम्ही एकूण चार ठिकाणचे विचारांचे सोने लुटलेले आहे. रेशीम बागेतल्या व्यासपीठावर तर प्रमुख पाहुण्या एक महिला पाहून संतोष जाहला. त्यात भर म्हणजे तिथे विचारांचे सोने लुटवताना ‘महिलांना समानतेची वागणूक मिळावी’ असे विचारांचे प्रबोधन झाले. हे खास सोने तिथे प्रेक्षकांत, संघ गणवेशात उपस्थित असलेल्या महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्र्यांसाठी होते अशी चर्चा आहे. आता तरी महाराष्ट्र मंत्रिमंडळात महिलेला स्थान मिळेल असे वाटते. मुस्लिमांशी सतत सुसंवादाची सुनिश्चिती करा हा तर सोन्याच्या विचारांचा कळसच होता. भगवान गडावरचे विचारांचे सोने काहीसे मळलेले वाटले. मी पदर पसरणार नाही, संघर्ष करणार म्हणत म्हणत त्यांनी आपण केलेल्या पक्ष प्रचाराचा पाढाच वाचला आणि माझ्या कार्यकर्त्यांना, म्हणजे पर्यायाने मलाच काही मिळावे ही अपेक्षा व्यक्त केली. बीकेसीचे विचारांचे सोने चक्क कागदावर लिहूनच आणले होते. ते कोणी लिहून दिले होते? हे जेव्हा ‘राष्ट्र उभारणीच्या पवित्र कार्यात या संघटनेचा हात कुणीच धरू शकत नाही.’ अशा वक्तव्यांतून मधूनच लक्षात येत होते. तिथे व्यासपीठावर जयदेव, स्मिता, अ‍ॅड. निहार या ठाकरे कुटुंबीयांची व्यासपीठावरची उपस्थिती पाहून हा ‘मातोश्री’बाहेरच्या ठाकरे कुटुंबीयांचा कौटुंबिक मेळावा आहे की काय असेच वाटले. त्यात फक्त राजसाहेबांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली. खरेतर तेही तिथे असायला हरकत नव्हती!

– **अ‍ॅड. एम. आर. सबनीस,** अंधेरी पूर्व (मुंबई)

### शिंदे गटाचे कौतुकच व्हायला हवे...

**दसऱ्याच्या दिवशीच** दोन नेत्यांचे मुंबईतील दोन मैदानांवर मेळावे झाले. हे दोघेही एकाच पक्षात वर्षानुवर्षे एकत्र राहिलेले नेते, तीन महिन्यांपूर्वी वेगळे झाले. दसऱ्याच्या शुभदिनी दोघेही एकमेकांना गद्दार म्हणून संबोधत होते. कुठल्यातरी महाशक्तीच्या पाठबळावर शिवसेना (शिंदे) गटाने मेळाव्याचा अट्टहास रेटून नेला. वास्तविक हे टळले असते तर मराठी माणसासाठी ते अधिक चांगले झाले असते. हल्ली राजकीय पक्षांचे मेळावे, सभा या वैचारिक बैठकीवर नसतात तर ते एक शक्तिप्रदर्शन करण्यासाठीचे कारण असते. गर्दी जमवण्यासाठी काय काय केले जाते, किती आर्थिक उलाढाल होते, काय काय क्लृप्त्या लढविल्या जातात, काय काय आमिषे दाखविली जातात हे जगजाहीर आहे. फिरण्यासाठी, खाण्यापिण्याची फुकट सोय होते, वरून चार पैसे हाती पडतात, अशी गर्दी हल्ली जिकडेतिकडे पहायला मिळते. मेळावा आयोजनाबाबत शिंदे गटाचे कौतुकच व्हायला हवे, अवघ्या तीन महिन्यांत या गटाने जवळपास ३५ कोटी रुपये खर्च करण्याइतकी आपली आर्थिक ताकद दाखवत, हजारो वाहने भाड्याने घेऊन लाखोंची गर्दी जमवून दाखवली. मात्र एकाच पक्षाचे दोन नेते, दोन ठिकाणी मेळावे घेतात आणि एकमेकांचीच उणीदुणी काढतात. एका मराठी राजकीय पक्षात असे घडणे हे मराठी माणूस म्हणून सामान्य जनतेला कितपत रुचले असेल? मराठी माणसाला दुहीचा शाप आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

– **अनंत बोरसे,** शहापूर (जि. ठाणे)

### गर्दीचा अनुभव ‘मनसे’ला आहेच!

**दसरा मेळावे** पार पडले. दोन्ही गटांची मैदाने भरलेली दिसत होती. यावरून एक लक्षात आले की दोघांकडेही कार्यकर्ते चांगल्या संख्येने आहेत. लोकांचे भरमसाट प्रश्न आहेत. त्यांना तात्काळ प्रतिसाद मिळण्यासाठी कार्यकर्त्यांचा लोकसेवेसाठी सहभाग करून घेणे अत्यावश्यक आहे. केवळ भाषण ऐकण्यासाठी गर्दी करणे नको तर लोकसेवेसाठी या गर्दीचा सहभाग दिसला तर समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत सहजपणे पोहोचता येईल. जनसंपर्क वाढवायचा असेल तर त्यात कार्यकर्ते महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांना योग्य दिशा देणे मोलाचे असते.

दोन्ही बाजूंकडे दिसलेली गर्दी लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी नियोजनबद्धपणे कामी आणली जाईल तेव्हा खऱ्या अर्थाने मेळावा यशस्वी झाला असे म्हणता येईल. कार्यकर्ते मंडळींचा उत्साह निवडणुका जवळ येऊ लागल्यावर शिगेला पोहोचतो. त्यानंतर तो का उणावतो? निवडणुकीत कोणाचा विजय होवो अथवा पराजय लोकसेवेसाठी राजकारणात आलेल्यांच्या लेखी लोकसेवा हेच कायम प्राधान्य हवे. सरकारच्या योजना तळागाळातील गरजूंपर्यंत पोहोचत नाहीत. ही नेहमीची अडचण आहे. तेव्हा सत्ताधारी पक्षातील कार्यकर्ते कुठे असतात, असा प्रश्न येतो. आलिशान गाड्यांतून फिरणे, लोकांचे प्रश्न प्रलंबित ठेवणे, त्यांना दाद न देणे, केवळ शाब्दिक बुडबुडे सोडणे, लोकांत न मिसळणे, ज्या मतदारसंघातून मते मिळाली नाहीत त्याकडे दुर्लक्ष करणे आदी सूत्रे लोकसेवेला बाधक असतात. त्यात सुधारणा व्हावी आणि लोकसेवेचा पाया भक्कम करून महाराष्ट्र मजबूत करावा.

एकाने ठणकावयाचे आणि दुसऱ्याने त्याला प्रत्युत्तर द्यायचे यामुळे लोकांचे प्रश्न सुटत नाहीत. गर्दी झाली म्हणजे लोक तुमच्या बरोबर आहेत असे मुळीच नाही. याचा अनुभव ‘मनसे’ला आहे. त्यावरून शहाणे होत दोन्ही गटांनी निःस्वार्थी राहून जनसेवा करत राहावी आणि कोण सरस, याचा निर्णय लोकांवर सोडावा.

– **जयेश राणे,** भांडुप (मुंबई)

### त्यापेक्षा सत्ताधाऱ्यांनी प्रश्न सोडवावेत...

**‘दशमीदिनी एकादशी’** हा अग्रलेख वाचला. यापूर्वी दसरा मेळाव्यासाठी आमच्या भागातून जनता उत्स्फूर्तपणे सभेला जायची, पण या वेळी चित्र काही वेगळेच दिसले. फक्त शक्तिप्रदर्शन करायचे या हेतूने गावखेड्यांतील लोकांना शहराकडे आरामदायी बसेस व गाड्यांमध्ये आणले गेले. त्यांच्या जेवणाची व खाण्यापिण्याची व्यवस्थाही योग्य रीतीने करण्यात आली. पण अशा प्रकारे गर्दी जमवून खरेच आपली राजकीय ताकद दिसते का, हा प्रश्नच आहे. सत्ताधाऱ्यांनी अशा मेळाव्यासाठी काही कोटी रुपयांचा खर्च करण्यापेक्षा जनतेत जाऊन त्यांचे आरोग्य, शिक्षण यांसारखे प्रश्न सोडवावेत. बाहेरच्या राज्यात चाललेले महाराष्ट्रातील रोजगार आपल्या राज्यात परत कसे आणता येतील, यासाठी ताकद लावावी. वंचित- उपेक्षित समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्य द्यावे. म्हणजे पुढील वर्षी तरी आपले विचार ऐकण्यासाठी सामान्य जनता स्वखर्चाने उत्साहाने शहराकडे येईल.

– **संकेत सतीश राजेभोसले,** शेवगाव (जि. अहमदनगर)

### कुस्ती वगळू देणारा नियम अन्याय्यच

**‘राष्ट्रकुल स्पर्धेतून** कुस्तीला वगळले’ हे वृत्त (लोकसत्ता- ६ ऑक्टोबर) वाचले. हा भारतासाठी खूप मोठा धक्का आहे. कारण यंदाच्या स्पर्धेत भारताने कुस्तीमध्ये १२ पदके जिंकली होती. राष्ट्रकुल स्पर्धेसाठीचे खेळ हे यजमान देशाकडून निवडले जातात. आपले खेळाडू ज्या खेळांमध्ये चांगली कामगिरी करणे अपेक्षित आहे, अशा खेळांना यजमान देशाकडून प्राधान्य दिले जाते. हे राष्ट्रकुल स्पर्धेचे धोरण अगदी चुकीचे व भेद निर्माण करणारे आहे. कुस्ती हा खेळ ऑलिम्पिकमध्ये समाविष्ट असतो. परंतु ऑस्ट्रेलियामध्ये कुस्ती हा खेळ प्रचलित नाही, त्यामुळे जर हा खेळ राष्ट्रकुल स्पर्धेमधून वगळण्यात येत असेल तर जेव्हा केव्हा राष्ट्रकुल स्पर्धा भारतात आयोजित होतील तेव्हा भारताने असेच केले तर राष्ट्रकुल स्पर्धेत भाग घेणाऱ्या इतर देशांना मान्य होईल का? जिम्नॅस्टिक, अ‍ॅथलेटिक्स यामधील अनेक प्रकार असे आहेत की ज्यामध्ये भारतासारखे अनेक देश त्यांत सहभाग घेत नाहीत. कारण हे खेळ या देशात प्रचलित नाहीत आणि हे खेळ शिकण्यासाठी याबाबत या देशांमध्ये विशेष अशी माहिती व सोयी उपलब्ध नाहीत. तरीसुद्धा हे खेळ राष्ट्रकुल स्पर्धेत समाविष्ट असतात.

अशा खेळांना जर भारतासारख्या देशाने भविष्यात राष्ट्रकुल स्पर्धा आयोजित करताना वगळले आणि खो खो, कबड्डी यांवरच भर दिला तर चालेल का? प्रत्येक देशाने वैयक्तिक स्वार्थासाठी जर अशा प्रकारचे दुजाभाव करणारे निर्णय घेऊन स्पर्धा आयोजित केल्या तर ते खेळ खेळ म्हणून खेळले जातील का? राष्ट्रकुल स्पर्धा नियामक मंडळाने आपल्या नियमावलीचा फेरविचार करून, योग्य ते बदल करायला हवेत.

– **रवींद्र भोसले,** सिद्धटेक (अहमदनगर)

### सत्ताधाऱ्यांपुढे नतमस्तक होण्याची वृत्ती घातक

**‘निवडणूक चिन्हाचा** वाद सुटेल?’ हे विश्लेषण (५ ऑक्टोबर) वाचले. आपल्या देशात निवडणूक आयोग, न्याय पालिका, विविध संचालनालये स्वायत्त असल्याचे आपण मानतो. टी. एन. शेषन निवडणूक आयुक्त असताना त्यांनी आयोगाला घटनेने दिलेले अधिकार वापरून दरारा निर्माण केला होता, परंतु त्यानंतरचे चित्र आश्वासक नाही. विद्यमान पालिका व संचालनालयांची सत्ताधाऱ्यांपुढे नतमस्तक होण्याची वृत्ती तर त्यांच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. न्यायाला विलंब, म्हणजे न्याय नाकारणे, असे म्हटले जाते. निवडणूक चिन्हांचा वाद असो की महाराष्ट्रातील सत्तांतर, आमदारांच्या निलंबनाचा खटला असो, वा विविध राजकीय अटकसत्रांवरील खटल्यांना होणारा विलंब हेच दर्शवतो.

– **शैलेश न. पुरोहित,** मुलुंड (पूर्व)

### एसटीने इतर सुविधांकडेही लक्ष द्यावे

**आधुनिक गाड्या** घेऊन एसटीचा कायापालट करण्यात येणार असल्याची बातमी वाचली. एसटीने याबरोबरच सर्व स्थानके आणि थांबे कायम स्वच्छ ठेवावेत. स्वच्छतागृहांकडे विशेष लक्ष द्यावे. आरक्षित तिकिटावर आणि परतीच्या आरक्षणावर पाच टक्के सवलत द्यावी. यामुळे प्रवाशांचा ओघ वाढेल आणि पर्यायाने उत्पन्न वाढून तोट्यातील रुतलेले चाक बाहेर निघण्यास मदत होईल.

– **वासुदेव हर्डीकर,** डोंबिवली

# जनुकांचे आरपार दर्शन

**क्ष-किरण वापरणे ते ‘डीएनए’ रचनेचा शोध हा पल्ला लांबचाच, पण रोझलिंड फ्रँकलिन, लायसन पॉलिंग, फ्रान्सिस क्रिक, जेम्स वॉटसन यांनी तो गाठल्यावर जैविक पालटही शोधता आले...**



सृष्टी-दृष्टी

प्रदीप रावत

**साल १८९५.** त्या काळात कॅथोड किरणांचा म्हणजे विजाणूंचा (इलेक्ट्रॉन्स) प्रवाह ‘क्रूक नळी’मधून हाताळण्याचे तंत्र अवगत झाले होते. व्युर्झबर्ग नावाच्या जर्मनीतल्या छोट्या शहरात विलहेम् रोंटगेन नावाचा वैज्ञानिक हीच कॅथोड किरणे क्रूकनळी वापरून न्याहाळत होता. त्यापासून बऱ्याच अंतरावर असलेल्या पडद्यावर त्याला एक हलकासा प्रकाश जाणवला. हा प्रकाश कॅथोड किरणांनी उपजला असेल? ते यंत्र तर बरेच लांब होते. त्याच्यावर काळ्याकभिन्न पुठ्ठ्यासारख्या जाड कागदाचे आवरण होते. त्यातून काही प्रकाश पाझरणे कसे शक्य होते? पण त्याने शंकेचा पिच्छा सोडला नाही. पुढच्या काही आठवड्यांतच हा सगळा कॅथोड प्रवाहाचाच प्रताप आहे... एवढेच नव्हे तर त्यातून उद्भवणारे निराळ्या धर्तीचे किरण आहेत, असे त्याच्या ध्यानी आले. ख्रिसमसअगोदर त्याने आपल्या बायकोला यंत्रशाळेत बोलावले आणि त्याच किरणांचा वापर करून तिच्या हाताचा ठसा काचेवर घेतला! तिच्या हातातील स्नायू सोडून फक्त हाडे आणि विवाहाची अंगठी त्या प्रकाशचित्रात उजळली होती. बायको म्हणाली, ‘...माझा मरणोत्तर सांगाडा दाखवतो आहेस!’

एरवी वस्तूवर आदळलेले किरण माघारी परतून काचेवर उमटतात आणि प्रकाशचित्र ऊर्फ छायाचित्र उमटते! हे किरण माघारी परतण्याऐवजी वस्तूच्या आरपार धावत होते. पण सगळ्या भागांत नव्हे. कठीण घन वस्तूंना ते भेदत नव्हते. कालांतराने ‘नेचर’ या सुप्रतिष्ठित नियतकालिकात आरपारदर्शी किरणांचा ‘सिद्धशोध’ प्रसिद्ध झाला! या अर्थआरपार किरणांना त्याने नाव दिले एक्स-रे! क्ष-किरण. बीजगणितात अज्ञात संख्येला ‘क्ष’ म्हणतात त्याचा हा प्रभाव! त्या किरणांचा वापर करून शरीरात मोडलेल्या हाडांचे दर्शन शक्य झाले. त्यावरचे उपाय अधिक नेमके झाले. १९०१ साली भौतिक विज्ञानातले पहिले नोबेल पारितोषिक जाहीर झाले ते रोंटगेन याला!

प्रकाश कोणता का असेना, त्याच्याभोवती वेढलेला एक सनातन प्रश्न आहेच! प्रकाशाचे रूप काय आहे? लहरीसारखे की कणांसारखे? की लहरीसारख्या वागणाऱ्या कणांसारखे? उदा. मॅक्स फॉन लॉऊ या जर्मन भौतिक वैज्ञानिकाने युक्तिवाद लढविला- ‘‘जर या किरणांचे रूप लहरीसारखे असेल तर अणूंमधल्या पोकळीतून ते वाहतील आणि त्याच्या योगाने स्फटिकांमधील अणूंच्या पोकळ्या आणि स्फटिकांची रचना दिसू शकेल!’’

या कल्पनेतून अनेक निर्जीव-सजीवांची क्ष-किरण तपासणी करण्याचे उधाण आले. त्या खटाटोपाला स्फटिक-छबी तंत्र (क्रिस्टलोग्राफी) म्हटले जाऊ लागले. प्रथिनांच्या जैविक स्फटिकांचा या पद्धतीने वेध घेणे सुरू झाले. १९१२ साली विल्यम ब्रॅग आणि त्याचा मुलगा लॉरेन्स यांनी अशी आरपारचित्रे घेण्याचा सपाटा लावला. (मॅक्स फॉन लाऊ आणि ब्रॅग्ज पितापुत्रांनादेखील लागोपाठ नोबेल पारितोषिक मिळाले.) या अंतर्दृष्टी छबींमध्ये दिसणारी रेणूंची भूमिती क्लिष्ट भासे. त्रिमिती वस्तूचे दोन अक्षांत होणारे सपाट दर्शन. कोण किती



रोझलिंड फ्रँकलिन

अंतरावर मागे पुढे? सरळ की वळून मिळालेला? याचे प्रक्षेप चक्रावणारे असत. त्याचे निष्कर्ष वरपांगी निखात्री वाटत. अनेक जीवशास्त्रज्ञांचा, या पद्धतीने जैविक वस्तूंचा खात्रीशीर उलगडा होणार नाही असा ठाम समज होता. पण त्याचेही गणित उलगडू लागले होते.

केम्ब्रिजमध्ये या क्ष चित्रांचे आणि चित्रकोड्यांचे मोठे संकलन आणि गणिती हिशोब बहरले होते. त्यात पार बुडालेली एक स्त्री वैज्ञानिक होती. तिचे नाव रोझलिंड फ्रँकलिन.

डीएनए द्रव्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या द्रव्याचे रेणूंचे अंतरंग कसे असते, हा प्रश्न पण या क्ष-किरण झोताने सोडवायचा खटाटोप चालूच होता. त्यासाठीची अनेक किरणचित्रे रोझलिंडने घेतलेली होती. त्याचा कच्चा माल असलेली रासायनिक द्रव्ये- डीऑक्सिरायबोज साखर, फॉस्फरस, नायट्रोजन मुबलक असणारे अ‍ॅडेनाइन, ग्वानाइन, सायटोसाइन आणि थायमाइन हे चार पायाभूत रेणू - सर्वत्र माहीत होते. पण ते आपसात कसे गुंफले जातात याचा अदमास हुलकावणी देत होता. क्ष-किरण प्रतिमा बघून त्यांना गोफणारी सांगड हाती लागत नव्हती. हे कोडे सोडवण्याचा प्रयत्न अनेक जण करीत होते. लायनस पॉलिंग नावाचे, मोठा दबदबा असलेले एक वैज्ञानिकदेखील ही समस्या सोडवण्याच्या जवळ पोहोचले होते. पण त्याहीनंतर शोध सुरूच होता.

एक दिवस क्ष-प्रतिमेतील रेणूंची मागेपुढे असणारी ठेवण पाहून फ्रान्सिस क्रिक याला ते एका वक्राकार वळणाने गुंफलेले असावेत अशी कल्पना सुचली! हा आकार निखळ एका वळणापुरता असू शकत नव्हता. कारण ती एक तर दीर्घ साखळी होती. एवढेच नव्हे तर परस्पर गोफलेल्या घटकांचे पुनःपुन्हा परस्परांना सामोरे आवर्तन होणारी अशी ती साखळी होती. असे होण्यासाठी त्यांची ठेवण, त्याचे वळण कसे असायला पाहिजे? जेणेकरून जे क्ष- प्रतिमेत दिसणाऱ्या रूपाशी ते मिळतेजुळते होईल? क्रिकला जाणवलेले आणि सुचलेले वळण तर होतेच पण येणारे वास्तव त्यापेक्षा आणखी आश्चर्यदायी होते. त्यात रचनेत निखळ तारेचे गुंडाळलेले वेटोळे नव्हते. तशा वेटोळ्याची कल्पना पॉलिंगने सुचविलीदेखील होती. क्रिक आणि त्यांचा सहकारी जेम्स वॉटसन यांनी कल्पक चिकाटीने साकारलेला सांगाडा सर्वात चपखल ठरला. एकमेकासमोर हात धरल्यागत उभे राहिलेली पण ठरावीक अंतराने सर्पिल (नागमोडी) गिरकी घेतल्यासारखी मुरडत पुढे धावणारी गोल गोल जिन्यागत ठेवण ही सगळ्यात चपखल बसणारा सांगाडा ठरली!

क्रिक आणि वॉटसन यांना गवसलेले कोड्याचे उत्तर अपार मोलाचे होते. जीवांची अगदी प्राथमिक पण कळीची लिपी हाती लागली होती. जणू जीवांच्या घडणीची वाक्ये, त्यातले शब्द, त्यातली सुटी अक्षरे यांचा ‘तिळा दार उघड’ म्हणावे असा मंत्र लाभला होता. या सगळ्या कोड्याचा उलगडा करण्यात ज्यांचा ज्यांचा मोलाचा, कळीचा हातभार लागला त्या सगळ्यांना टप्प्याटप्प्याने नोबेल पुरस्कार जाहीर झाला! पण रोझलिंड फ्रँकलिन मात्र त्यापासून वंचित राहिली!

वास्तविक तिने केलेला उलगडा भलताच कळीचा होता. जीवशास्त्रातील जुने प्रश्न तडीला लागणार होते. अनेक नवीन तंत्रज्ञानाच्या वाटा त्यातून फोफावणार होत्या. वैद्यकीय कृषी रोगविज्ञान जीव-रसायनी क्षमता औषधनिर्मिती या सगळ्याच संभाव्यतांना नवी पालवी लाभली होती. त्याहून मोठा परिणाम म्हणजे जीव कसे उत्क्रांत झाले आणि होत राहतात याच्या अनपेक्षित किल्ल्या या नव्या साक्षात्कारामुळे आवाक्यात आल्या होत्या. जीवांच्या वाढीचे, जडणघडणीचे, त्यांच्या रूप-गुणात होणाऱ्या बदलांचे मूळ एकक (युनिट) नव्याने गवसले होते. आनुवंशिकतेच्या प्रवाहाचे मूलकण या शोधामुळे हस्तगत होणार होते. व्यक्त लक्षणांतील बदलांपासून वेगळी निराळी जात उपजत जावी असे मूलभूत बदल या सर्पिलांच्या तुकड्यातच गढलेले असतात. जगणे आणि तगणे याची धडपड अवघा जीव करतो? की त्या जीवाचा घटक असलेली निरनिराळी जनुके करतात? ‘निरनिराळी जनुके आपआपल्या परीने तगण्याचा, पुढील पिढी साकारण्याचा खटाटोप करतात’ असा वेगळा पर्यायी विचार करावा याची मुहूर्तमेढ या शोधाने उभारणार होती.

योगायोगाने या वर्षीच्या शरीर आणि औषध विज्ञानाचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे.

आपला मूळ पूर्वज म्हणावा असा मानव आफ्रिकेत उत्क्रांत झाला. तेथून बाहेर पडून अन्य खंडांत पसरला. त्या काळामध्ये आफ्रिकेतर भूभागांवर अन्य मानवसदृश जीवांचा वावर होता. उदा. त्यातले एक निअँडरथाल. त्यांचा आफ्रिकेत उत्क्रांत झालेल्या मानवाशी संबंध आला असणार! तसा संबंध आल्याने होणारे जैविक पालट आपल्या (म्हणजे आधुनिक मानवप्राण्यांच्या) जनुकांत आढळतात का? अगदी ढोबळपणे विचारायचे तर, आपल्या जीवनरसायनी घडणीमध्ये निअँडरथालचा अवशेष आहे का? यासारख्या एक लाख ते ५० हजार वर्षांपूर्वी झालेल्या संपर्काचे ठसे कुठे आढळणार? तर त्याचेही उत्तर ‘डीएनएच्या रचनेत’ असेच आहे! निअँडरथालच्या डीएनएचा छोटा तुकडा सापडला तर? त्यातून या उत्तरापर्यंत मजल मारता येते. हजारो वर्षांपूर्वी घडून गेलेल्या संपर्क आणि संकराचे चित्र ही कल्पना ७० वर्षांपूर्वी अशक्य आणि अद्‌भुत भासत होती. वॉटसन-क्रिक, पॉलिंग यांनी सोडविलेल्या मळसूत्री उलगड्यामुळे त्यासारख्या अशक्य भासणाऱ्या प्रश्नाचे उत्तर आज देता आले! एका ६८ वर्षांपूर्वीच्या नोबेल पुरस्काराची परिणती नव्या नोबेल पुरस्कारात होऊ शकली!

लेखक माजी खासदार आणि ‘‘रावत’स नेचर अ‍ॅकॅडमीचे संस्थापक आहेत. pradiprawat55@gmail.com

## भाषासूत्र

### बँक आणि बजेट

**बँकेत गर्दी** असली तर कधी कधी बँकेतील बाकावर काही मिनिटे बसून राहावे लागते आणि असा प्रसंग बऱ्याचदा येतो. शब्दांच्या व्युत्पत्तीच्या दृष्टीनेदेखील बँक आणि बाक (ऊर्फ ‘बेंच’) यांचा घनिष्ठ संबंध आहे!

हे दोन्ही शब्द ‘बांका’ (banca) या लॅटिन शब्दावरून आले आहेत. प्राचीन इटलीमध्ये गावोगावी आठवड्याचे बाजार भरत. एका बाजूला आपापली बाके टाकून सावकार बसत. मालाच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार करताना जुने कर्ज चुकते करणे किंवा नवे घेणे वगैरे व्यवहार तिथेच चालत. प्रत्येक सावकाराचे बसायचे बाक ठरलेले असे. तो सावकार त्या बाकावरूनच ओळखला जाई. त्यावरून कालांतराने त्या विशिष्ट बाकाला व सावकाराला लॅटिनमध्ये ‘बांका’ आणि पुढेपुढे इंग्रजीत ‘बँक’ म्हणायला सुरुवात झाली. जेवढे सावकार तेवढी बाके आणि तेवढ्याच बँका असत.

आधुनिक अर्थव्यवस्थेत सरकारतर्फे ‘बजेट’ सादर केले जाते. ‘जमाखर्चाचा अंदाज’ या अर्थाने ‘बजेट’ शब्द सगळ्याच भाषांत रूढ झाला आहे. सामान्य माणसेही आपापले बजेट करतच असतात. ‘मी तो फोन घेतला नाही, कारण माझ्या बजेटमध्ये तो बसणारा नव्हता,’ असे आपण खूपदा म्हणतो. सरकारतर्फे सादर होणाऱ्या बजेटची चर्चा



वृत्तपत्रांतून बरेच दिवस चालू असते. पण प्रत्यक्षात ‘बजेट’ शब्दाचा जमा किंवा खर्च यांच्याशी काडीचाही संबंध नाही. ‘बजेट’ हा शब्द ‘बोगेटे’ (bougettes) म्हणजे ‘कातड्याची लहान पिशवी’ या अर्थाच्या लॅटिन शब्दावरून आला आहे.

मूळ लॅटिन शब्द ‘बोगे’ (ऊर्फ बॅग किंवा पिशवी) आणि त्याचे छोटे रूप म्हणजे ‘बोगेटे’. गंमत म्हणजे आज ‘बोगेटे’ हा बायकांच्या पर्सचा खूप महागडा इटालियन ब्रँड आहे! पूर्वी व्यापारी आपले पैसे किंवा हिशेबाचे महत्त्वाचे कागद ‘बोगेटे’ नावाच्या छोट्या कातडी पिशवीत ठेवत. पुढे कायदेमंडळांत अंदाजपत्रक सादर करायची प्रथा सुरू झाली, तेव्हा संबंधित मंत्री अंदाजपत्रकाचे कागद अशाच छोट्या कातडी पिशवीत घालून आणत. ‘बोगेटे’चे रूप बोलीभाषेत ‘बोजेट’ आणि नंतर ‘बजेट’ असे झाले. ‘g’चा उच्चार ‘ग’ऐवजी ‘ज’ असाच व्हावा म्हणून त्याचे स्पेलिंगदेखील budget असेच केले गेले. आजही जगभरचे अर्थमंत्री कातडी पिशवीत घालूनच बजेटचे कागद सभागृहात आणतात आणि ‘काय काय दडले आहे त्या पिशवीत’ याची चर्चा सुरू होते!


– **भानू काळे**

bhanukale@gmail.com

## साम्ययोग

### मंगल-मार्ग

**सत्याग्रह, उपोषण** आदींचे एक ठरावीक रूप आपल्यासमोर असते. चंपारण ते चले जाव अशी प्रदीर्घ सत्याग्रहमाला तो समज पक्का करते. गांधीजींच्या या आंदोलनांमध्ये किती तरी नेते घडले. असंख्य अनाम सत्याग्रही धारातीर्थी पडले. यातील एकाचीही ‘आदर्श सत्याग्रही’ म्हणून निवड न करता गांधीजींनी विनोबांना पुढे केले. गांधीजींच्या कल्पनेतील सत्याग्रही नेमका कोणता होता- लढाऊ की तपस्वी? दोन्ही प्रश्नांची उत्तरे नकारार्थी आहेत. नेहमीप्रमाणे या प्रश्नाचे नेमके उत्तर विनोबांनी दिल्याचे दिसते.



एकदा विनोबांना कोणी तरी विचारले, ‘सत्याग्रह आणि अहिंसेनेच आपण स्वराज्य मिळवले का?’ त्यावर विनोबा उत्तरले, ‘पूर्ण अर्थाने अहिंसेने स्वराज्य प्राप्त झाले असे म्हणता येणार नाही. भारतात आम्ही जे सत्याग्रहाचे आंदोलन चालवले त्यात अनेक प्रकारची हिंसा झाली. मानसिक हिंसा किती झाली हे तर कोणालाच माहीत नाही. तरीही आम्ही एका मर्यादेचे निश्चितच पालन केले. त्यामुळेच स्वराज्य मिळाले असा दावा आम्ही करत नाही; परंतु स्वराज्य मिळण्यात सत्याग्रह आंदोलनाचा फार मोठा वाटा होता. खरे म्हणजे आमचे ते आंदोलन म्हणजे केवळ सुरुवात होती. ते अल्प आणि अविकसित शक्तीने चालवलेले आंदोलन होते.’

विनोबा पुढे म्हणतात, ‘‘सत्याग्रह नकारात्मक नसून सकारात्मक वस्तू आहे. संपूर्ण जीवन सत्याच्या आधारे उभे करण्याची गोष्ट त्यात आहे. गांधीजींनी जे केले त्याचे बाह्य रूप तेवढे आपण पाहिले. आज तेवढ्याने भागणार नाही. ते वेगळ्या परिस्थितीत होते. तरीही त्या वेळच्या नकारात्मक कामाला त्यांनी किती तरी विधायक कामे जोडली. लोक त्यांना विचारत असत की इंग्रजांना हटवण्यासाठी खादी, ग्रामोद्योग, अस्पृश्यता निवारण यांची काय गरज आहे? ही समाजसुधारणेची कामे आहेत. परंतु खरे म्हणजे ही सत्याग्रहाचीच अंगे आहेत.’

‘गांधीजींची कल्पना नकारात्मक असती तर त्या कल्पनेला रचनात्मक कार्याची सेवा-कार्याची जोड त्यांनी दिली नसती. मला मग देशासमोर एक सत्याग्रही म्हणून उभे करण्यात अर्थ नव्हता. लोक तर तेव्हा मला ओळखतच नव्हते. कोणतेही उल्लेखनीय राजकीय काम माझ्या हातून घडले नव्हते. गांधीजींनी माझ्यात आणखी गुण पाहिला असेल-नसेल एक गुण तर नक्कीच पाहिला की याचा मेंदू कन्स्ट्रक्टिव्ह (रचनात्मक) आहे, डिस्ट्रक्टिव्ह (विध्वंसक) नाही. सत्याग्रहाने रचनात्मक काम करणे ते आवश्यक मानत होते हे यावरून स्पष्ट होते. ते तर इथपर्यंत म्हणत की, रचनात्मक कार्य पूर्ण झाले की स्थूल सत्याग्रहाची आवश्यकताच पडणार नाही. अशी त्यांची श्रद्धा होती. सत्याग्रहाचा कोणताही नकारात्मक अर्थ त्यांच्या मनात नव्हता हेच यावरून दिसते.’

गांधीजी आणि विनोबांचे वैचारिक नाते सत्याग्रहाचा अर्थ उमजला की नीट लक्षात येते. गांधीजींच्या विचारांचा विनोबांच्या हयातीत झालेला प्रवास तसा का होता हेही ध्यानात येते. त्यांच्या जवळपास प्रत्येक राजकीय आणि सामाजिक कृतीची संगती सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान सांगते.

– **अतुल सुलाखे**

jayjagat24 @gmail.com

## कुतूहल

### जादव मोलाई पायेंग

**आसाममधील ‘मिसिंग’** या आदिवासी जमातीत १९६३ मध्ये जन्मलेल्या आणि वयाच्या सोळा-सतराव्या वर्षापासून सातत्याने वनीकरण करणाऱ्या जादव मोलाई पायेंग यांना ‘फॉरेस्ट मॅन ऑफ इंडिया’ असे म्हटले जाते. याच नावाचा त्यांच्याविषयीचा लघुपट २०१३ मध्ये आला, तर २०१५ मध्ये या कामाबद्दल त्यांना ‘पद्मश्री’ मिळाली. माजुली जंगलात वन-कामगार असणाऱ्या पायेंग यांनी गेल्या काही दशकांत ब्रह्मपुत्र नदीच्या वालुकामय किनाऱ्यावर इतकी झाडे लावून जगवली की आसाममधील जोऱ्हाट जिल्ह्याचा कोकिळामुख भाग संपूर्ण जंगलमय झाला आहे. या मानवनिर्मित जंगलाला ‘मोलाई जंगल’ म्हटले जाते. एकूण ५५० हेक्टरवर वसलेले हे जंगल त्यांनी १९७९ पासून लावायला सुरुवात केली होती. एकदा या प्रदेशात खूप मोठ्या संख्येने मेलेले साप त्यांनी पाहिले. मोठा पूर ओसरून गेल्यानंतर पसरलेल्या उष्णतेमुळे हे साप मरून पडले होते. त्या वेळी त्यांनी बांबूची वीस रोपे या वालुकामय प्रदेशावर लावली आणि नंतर सामाजिक वनीकरण विभागाच्या मदतीने त्यांनी ‘अरुणाचापोरी’ नावाच्या भागात २०० हेक्टरवर झाडे लावायला सुरुवात केली. त्या वेळी ते केवळ एक मजूर होते. बाकीचे मजूर काम संपल्यावर निघून गेले, परंतु हे तेथेच थांबून झाडांची काळजी घेऊ लागले आणि स्वतःच्या कल्पनेनुसार आणखी झाडे लावू लागले.



या मोलाई जंगलात आता ‘रॉयल बेंगॉल’ वाघ, भारतीय गेंडा, १०० हून अधिक विविध प्रकारची हरणे, सशांच्या जाती, असंख्य प्रकारचे पक्षी, गिधाडे आणि माकडे इत्यादी आढळून येतात. आता येथे हजारो झाडे सुखाने जगलेली दिसतात. या जंगलाला शंभर हत्तींचा कळप भेट देतो व तेथे सहा महिने सलग राहतो. त्यांची अपत्येदेखील या जंगलात जन्म घेतात. हरवलेल्या हत्तींच्या कळपाचा शोध घेत २००८ मध्ये वनाधिकारी या जंगलात आले. जादव पायेंग यांच्या परिश्रमांनी सारे वनखाते आश्चर्यचकित झाले. २०१३ साल गेंड्याची शिकार करायला आलेल्या शिकाऱ्यांनादेखील पायेंग यांनी तत्परतेने पकडून दिले. एवढेच करून पायेंग शांत बसलेले नाहीत तर अशाच प्रकारची जंगले ब्रह्मपुत्रेच्या इतर सर्व वालुकामय प्रदेशावर पसरवण्याचे त्यांनी निश्चित केले आहे. स्वतः पायेंग जंगलातच एका छोट्या झोपडीत आपल्या बायको व तीन मुलांसह राहतात. त्यांच्याकडे असलेल्या गुरांचे दूध विकून त्यांची उपजीविका चालते.

जादव पायेंग यांच्या कार्यावर ‘जवाहरलाल नेहरू विद्यापीठा’सारख्या संस्था संशोधन करीत आहेत. अनेक माणसे मिळून वने उद्ध्वस्त करतात अशा या काळात, एका माणसाने संपूर्ण जंगल तयार केले आहे यापेक्षा सकारात्मक घटना ती कोणती!

**डॉ. नंदिनी विनय देशमुख**
मराठी विज्ञान परिषद
ईमेल : office@mavipa.org
संकेतस्थळ : www.mavipa.org

# ‘रेवडी’राठोड!

## राजकीय पक्षांच्या प्रचारी आश्वासनांच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयास नकार देणाऱ्या निवडणूक आयोगाने आता हाच प्रश्न हाती घेणे अनाकलनीयच...

**सेवाकाळात खाविंदाचरणी** नतमस्तक राहणाऱ्या अधिकारीगणांस आयुष्य सुखात घालवण्याची हमी देणाऱ्या घटनात्मक नियुक्त्या सहज मिळतात खऱ्या. अशा नेमणुकांनंतरही या मंडळींची सत्ताधाऱ्यांची तळी उचलण्याची सवय कायम राहिल्यास त्या पदांची उंची कमी होण्याचा धोका संभवतो. सांप्रतकाळी या धोक्याची छाया निवडणूक आयोगावर आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. वस्तुतः कागदोपत्री नोंदल्या गेलेल्या नियमांच्या आधारे प्रसंगोपात्त निवडणुका घेणे हेच खरे तर निवडणूक आयोगाचे काम. पण त्या कामातही आयोग सत्ताधाऱ्यांस अधिक धार्जिणा दिसणे हे दुर्दैवी आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी टी. एन. शेषन यांची या पदावर नियुक्ती करेपर्यंत निवडणूक आयोग ही एक कणाहीन यंत्रणा होती. अस्तित्वात असलेल्या आचारसंहितेचे पालन करायचे असते याचेही भान या यंत्रणेस नव्हते. ते शेषन यांनी दिले. ते येईपर्यंत आचारसंहिता असा काही प्रकार असतो याबाबत राजकीय पक्ष आणि जनता दोघेही तितकेच अनभिज्ञ होते. शेषन यांनी निवडणूक आयोगाचा वाकलेला कणा ताठ केला. त्यानंतर काही काळ तो तसा राहिला. पण नंतर पुन्हा ये रे माझ्या मागल्या. गेल्या निवडणुकीत काही महत्त्वाच्या नेत्यांविरोधात आचारसंहिता-भंगाच्या तक्रारींची दखल घेण्याबाबत निवडणूक आयोगाची जी घालमेल होत होती त्यावरून हेच दिसून आले. त्यानंतर आयोगाच्या कण्याबाबत पुन्हा शंका घ्यावी किंवा काय असा प्रश्न निर्माण होतो. कारण मतदारांना आकर्षित करण्यासाठी निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांकडून जी आश्वासने दिली जातात त्याबाबत निवडणूक आयोगाचा ताजा फतवा.

उदा. मोफत वीज, मालमत्ता करमाफी, करकपात अशा सरकारी तिजोरीवर ताण पडणाऱ्या आश्वासनांची पूर्तता करण्याकरिता आर्थिक भार कसा सहन करणार हे स्पष्ट करावे, असे फर्मान निवडणूक आयोगाने सर्व राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय राजकीय पक्षांना सोडले आहे. निवडणूक प्रचारात देण्यात येणाऱ्या विविध सवलतींच्या मुद्द्यावर सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. तेथे हा मुद्दा पहिल्यांदा हाती घेतला माजी सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी. त्यांनी याबाबत निवडणूक आयोगाने काही करावे, असे सुचवले होते. त्या वेळी या मुद्द्यावर आम्ही तटस्थ राहू अशी भूमिका आयोगाने घेतली. ती अत्यंत रास्त होती. पण नंतर कोठे आणि कोणामुळे माशी शिंकली ते कळण्यास मार्ग नाही. आयोगाने आपल्या भूमिकेपासून घूमजाव केले आणि हे ताजे फर्मान काढले.

निवडणुकीत राजकीय पक्ष जे काही देण्याचे वायदे करतात त्यांची ‘रेवडी संस्कृती’ अशी संभावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडे केली. तत्त्वतः या टीकेत काही गैर नाही. पण त्याबाबत आक्षेपांचे मुद्दे दोन. एक म्हणजे अशी कोणतीही रेवडी कोणत्याही निवडणुकीत वाटलेली नाही असे पंतप्रधान आणि सत्ताधारी भाजपचे चारित्र्य असते तर या त्यांच्या मागणीस नैतिक ताकद असती. पण ते तसे नाही. आधार कार्डास विरोध करण्यापासून प्रत्येकाच्या खात्यात काही लाख रुपये जमा करण्याच्या जुमल्यापर्यंत अनेक विविधरंगी रेवड्या भाजपने वाटल्या. म्हणजे भाजपच्या सत्ताप्राप्तीत रेवडीचा वाटा मोठा आहे. तेव्हा अशा रेवडीवाटपातून सत्ता मिळाल्यानंतर इतरांस मात्र तुम्ही असे काही करू नका, असे सांगण्याचे चातुर्य केवळ भाजपच दाखवू शकतो. त्याची री निवडणूक आयोगाने ओढण्याचे काहीही कारण नाही.

> **‘रेवडी’विषयीची नाराजी पंतप्रधानांनी व्यक्त केलेली आहे, हे लक्षात घेता निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांस अधिक धार्जिणा दिसणे हे दुर्दैवी आहे...**

दुसरे असे की अशक्यतांचे शक्यतांत रूपांतर करण्याची कला म्हणजे राजकारण. त्याचा ‘कलात्मक’ आविष्कार दिसतो तो निवडणुकांत. यातूनच काही नावीन्यपूर्ण कल्पना जन्मास आल्या. उदाहरणार्थ तमिळनाडूत सार्थपणे राबवली गेलेली ‘अम्माज् किचन’ ही संकल्पना. किंवा बिहारमध्ये नितीशकुमार यांनी शाळेत जाणाऱ्या मुलींस देऊ केलेल्या दुचाक्या. शुद्ध अर्थशास्त्रीय निकषांवर या अशा योजनांचा विचार होऊ शकत नाही. ती त्या शास्त्राची मर्यादा आहे. म्हणून अर्थकारणास राजकारणाची जोड मिळाली की ते अधिक क्रियाशील होते. पण निवडणूक आयोगाचा ताजा फतवा या प्रक्रियेच्या गळ्यालाच नख लावतो. यातील सर्व घोषणा अर्थशास्त्रीयदृष्ट्या वाईट असतात असे नाही. उदाहरणार्थ गेल्या निवडणुकीत थॉमस पिकेटी, रघुराम राजन, माजी अर्थसल्लागार अरविंद सुब्रमण्यम आदींनी सादर केलेली ‘किमान समान उत्पन्न’ (युनिव्हर्सल बेसिक इन्कम) ही योजना. ती कशी वास्तवात येऊ शकते हे संबंधितांनी दाखवून दिले. पण पंतप्रधानांच्या वर्णनानुसार ती रेवडी ठरू शकते. म्हणून त्या तालावर नाचू पाहणाऱ्या आयोगामते ती आक्षेपार्ह ठरण्याचा धोका आहे. असे झाल्यास निवडणूक आयोग राजकीय पक्षांच्या अधिकारांवर गदा आणतो, असे म्हणावे लागेल.

निवडणुका मोकळ्या वातावरणात पार पाडणे ही(च) निवडणूक आयोगाची जबाबदारी असताना निवडणूक प्रचारात देण्यात येणाऱ्या आश्वासनांची पूर्तता कशी करणार याची विचारणा करण्याचा खटाटोप कशाला, असा राजकीय पक्षांचा सवाल म्हणून योग्यच. एखादी योजना राबविल्यास त्याचा लाभ वैयक्तिक पातळीवर, कुटुंबे, समूह, फक्त दारिद्र्यरेषेखालील वर्ग यांपैकी कुणाला की सर्व जनतेला मिळणार, या आश्वासनांची पूर्तता करण्याकरिता येणारा वित्तीय भार, त्यासाठी उपलब्ध साधनसामग्री, आश्वासनाची पूर्तता केल्यावर येणारा खर्च करवाढ करून खर्च वसूल करणार की खर्चावर नियंत्रण आणणार, खुल्या बाजारातून निधी उभा करणार का किंवा अन्य कोणते उपाय आहेत का, अतिरिक्त साधनसामग्री निर्माण करण्याकरिता योजण्यात येणाऱ्या उपायांचा तिजोरीवर पडणारा ताण या साऱ्यांची माहिती निवडणूक आयोगाला कळवावी लागणार आहे. जाहीरनाम्यात देण्यात येणाऱ्या आश्वासनांची पूर्तता करण्याकरिता वित्तीय नियोजन कसे करणार हे सांगा असे सुचवणे म्हणजे विवाहाआधी वधू-वरांस विवाहित आयुष्याच्या आयोजनाचा तपशील मागण्यासारखेच. यातील तर्कदुष्ट मुद्दा असा की, विरोधी पक्षात असलेल्या राजकीय पक्षाला सरकारी साधनसामग्रीचा अंदाज कसा येणार? आयोगाच्या या मर्यादाभंगास भाजप वगळता सर्वच राजकीय पक्षांनी विरोध दर्शविला हे रास्तच. भाजपने त्यावर न बोलणेही तसे रास्तच! या संदर्भात वित्तीय नियोजनाची माहिती मागविण्याचा निवडणूक आयोगाला अधिकार आहे का, असा सवाल राजकीय पक्षांनी केला आहे. हा सरळ सरळ राजकीय पक्षांच्या कारभारात निवडणूक आयोगाचा हस्तक्षेप असल्याची टीका होते. ती अत्यंत योग्य आणि स्वागतार्ह.

याचा अर्थ सर्वच राजकीय पक्षांची सर्व आर्थिक आश्वासने योग्यच असतात असे नव्हे. ताजे उदाहरण म्हणजे पंजाबमध्ये नुकत्याच सत्तेवर आलेल्या आम आदमी पार्टी सरकारचे. वीज ३०० युनिटपर्यंत सरसकट मोफत देण्याच्या आश्वासनाची पूर्तता करताना सरकारला तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यातूनच कर्मचाऱ्यांचे वेतन गेल्या महिन्यात विलंबाने देण्याची वेळ पंजाब सरकारवर आली. तसेच १८ वर्षांवरील सर्व महिलांना दरमहा एक हजार रुपये अनुदान देण्याच्या आश्वासनाची पूर्तता करणे हेदेखील पंजाबमधील ‘आप’ सरकारपुढील मोठे आव्हान असेल. महाराष्ट्रातही शेतकऱ्यांना मोफत विजेचे आश्वासन काँग्रेस-राष्ट्रवादीने दिले होते. सत्तेत येताच या आश्वासनाची अंमलबजावणी करणे किती कठीण आहे याचा अंदाज सत्ताधाऱ्यांना आला आणि कालांतराने ही योजना गुंडाळण्यात आली. परंतु राजकीय पक्षांच्या आश्वासने देण्याच्या अधिकारांवर सरसकट गदा आणणे हा मार्ग नव्हे. हे म्हणजे काहींनी आपापल्या वधूस लग्नात दिलेली आश्वासने पाळली नाहीत म्हणून सर्व संभाव्य वर मंडळीस आश्वासने देण्यास मना करण्यासारखे.

यातून केवळ लोकशाहीचा संकोच होतो. निवडणूक आयोगाकडून हे अपेक्षित नाही. अशी काही दांडगाई करून ‘रेवडीराठोड’ होण्यापेक्षा आयोगाने आपला ताठ कणा निवडणुकांत दाखवावा. त्याची अधिक गरज आहे.

---

# हा ‘राजकीय तमाशा’ नाही; कारण...



देश-काल

योगेन्द्र यादव

**‘भारत जोडो यात्रा’ ही प्रतिक्रियात्मक नसून सकारात्मक आहे, स्वशक्तीची परीक्षा घेणारी ही पदयात्रा चुकीच्या गोष्टींना सामूहिक विरोध करतानाच ऐक्याचा संदेश देते आणि ती कुणा एकाच पक्षापुरती मर्यादित राहू शकत नाही...**

**‘भारत जोडो** यात्रे’मुळे निर्माण झालेला अंत:प्रवाह लोकांच्या लक्षात यायला कारणीभूत ठरले ते एक छायाचित्र. राहुल गांधी यांचे भाषण सुरू असताना मुसळधार पाऊस पडायला लागला. त्यातही राहुल गांधी तसेच भिजत आपले भाषण करत राहिले. त्यांच्यासमोर उभे असलेले हजारो लोकदेखील ते ज्या प्लास्टिकच्या खुर्च्यांवर बसले होते, त्यांच्यावरून उठून त्या आपल्या डोक्यावर धरून राहुल गांधी यांचे भाषण तेवढेच लक्षपूर्वक ऐकत उभे राहिले. हे छायाचित्र विलक्षण होते. ‘भारत जोडो यात्रा’ नेमकी कशी सुरू आहे, याबद्दलच्या हजारो बातम्यांनी जे सांगितले त्यापेक्षाही हे छायाचित्र आणि त्यातून जाणारा संदेश अधिक बोलका होता. ‘भारत जोडो यात्रे’पेक्षाही हे छायाचित्र अधिक ‘व्हायरल’ झाले.

यातून या मोहिमेला लोकांचा जो प्रतिसाद मिळतो आहे, त्यात अगदी सूक्ष्म असा बदल झाला आहे, हे लक्षात येते. ‘भारत जोडो यात्रे’ची सुरुवात अतिशय संथ झाली. ७ सप्टेंबर रोजी कन्याकुमारी येथून आम्ही सुरुवात केली तेव्हा आम्हाला दुर्लक्ष, उपहास आणि शंकाकुशंकांना तोंड द्यावे लागले. मला आठवतंय ‘ही खरोखरच पदयात्रा आहे का, आम्ही खरोखरच चालत जाणार आहोत का’ याचा अंदाज घेण्यासाठी एका वरिष्ठ पत्रकाराने मला फोन केला होता. ही यात्रा नेमकी कशासाठी, ती काय साध्य करणार आहे, तिचे हेतू काय आहेत याविषयी नेमकी माहिती कोणालाच नव्हती. ‘हे काँग्रेसचे नेते खरोखरच चालणार आहेत का? राहुल गांधी अधूनमधून यात्रेत सहभागी होणार असतील ना? की ते खरोखरच पूर्ण यात्राभर चालणार आहेत?’ ‘काँग्रेसची ही भारत जोडो यात्रा यशस्वी झाली तर रोड शो आणि फसली तर तमाशा असेच होईल ना?’ मी ‘भारत जोडो यात्रे’ला निघण्याच्या आदल्या दिवशी काही जवळचे कौटुंबिक मित्र मला भेटायला आले होते. माझ्या या उद्योगाबद्दल त्यांना काळजी वाटत होती. ती त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. ‘‘योगेंद्रजी, या यात्रेत सहभागी होऊन तुम्ही तुमची प्रतिष्ठा पणाला लावत आहात. तुम्ही काँग्रेसमध्ये सामील होणार नाही आहात हे आम्हाला माहीत आहे, पण काँग्रेसशी जोडून घेणे म्हणजे मृत्यूचे चुंबन घेणे नाही का?’’ असे ते मला विचारत होते.

### सकारात्मक वातावरण

‘भारत जोडो यात्रा’ सुरू होऊन एक महिना झाला आहे. या पहिल्या महिन्यातच काही तरी बदलले आहे. हा बदल म्हणजे देशाचा बदललेला मूड असे म्हणणे आततायी ठरेल. पण या यात्रेने ‘सकारात्मक’ वातावरण निर्माण केले आहे, ही प्रतिक्रिया मी सारखी ऐकतो आहे. ‘भारत जोडो यात्रा’ हा केवळ एक राजकीय तमाशा का झाला नाही याची माझ्या मते सहा कारणे आहेत.

सगळ्यात पहिले कारण म्हणजे ‘भारत जोडो’ ही काही केवळ प्रतिक्रियात्मक मोहीम नाही तर ती सकारात्मक आणि सक्रिय मोहीम आहे. बऱ्याच काळानंतर असे घडले आहे की राष्ट्रीय पातळीवरील प्रमुख विरोधी पक्षाने रस्त्यावर उतरून काही तरी कृती करायला सुरुवात केली आहे.



आपला म्हणून अजेंडा पुढे न्यायचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यामुळे पहिल्यांदाच असे होते आहे की कोणी तरी आपल्या कृतीवर भारतीय जनता पक्षाला प्रतिक्रिया देण्यास भाग पाडले आहे. ‘भारत जोडो यात्रे’च्या पहिल्या महिन्यातच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुखांनी मुस्लीम विचारवंतांशी संवाद साधला. बेरोजगारी, गरिबी आणि असमानता चिंताजनक असल्याचे भाष्य केले हा योगायोग अर्थातच नाही. हे मुद्दे ‘भारत जोडो यात्रे’त उपस्थित केले गेल्यानंतर हे लगेच घडले. फुटबॉलच्या खेळाप्रमाणेच राजकारणातही चेंडूवरचा ताबा महत्त्वाचा असतो, तो असा. राजस्थान काँग्रेसमध्ये एवढी धुस फूस झाली. पण या घडामोडींचा राहुल गांधींच्या ‘भारत जोडो यात्रे’वर काहीच परिणाम झाला नाही. ती तेवढ्याच सकारात्मकपणे पुढे चालत राहिली.

दुसरे कारण म्हणजे, ही फक्त यात्रा नाही, ती पदयात्रा आहे. पदयात्रेला आपल्याकडे तिला सखोल असा सांस्कृतिक संदर्भ आहे. आपल्याकडे पदयात्रा ही एक राजकीय कृती ठरते. पदयात्रेमध्ये आत्मक्लेश असतो. आपल्या श्रद्धेची, विश्वासाची खात्री देणारे ते व्याकरण आहे. पंढरीची वारी असो, अमरनाथ यात्रा असो, नर्मदा परिक्रमा असो किंवा देशातील शेकडो सामाजिक वा राजकीय यात्रा असोत, त्या यात्रेत चालत जाणारा आणि त्यांना चालताना पाहणारा यांच्यामधली दरी त्या पदयात्रेने सांधली जाते.

एखाद्या गोष्टीत लोक स्वतः सहभागी होत नाहीत, दूरवरूनच ते पाहतात तेव्हा त्यांच्यासाठी ते दुसऱ्याच्या अनुभवावर आधारित असे समजून घेणे असते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पदयात्रा हे संवाद साधण्याचे रस्त्यावरचे माध्यम आहे. त्याचे महत्त्व, त्याची तीव्रता ते अनुभवल्याशिवाय समजू शकत नाही.

तिसरे कारण म्हणजे, ‘भारत जोडो यात्रा’ हा केवळ आभासी विरोध नाही. त्यासाठी तुम्हाला रस्त्यावर उतरावे लागते. स्वशक्तीचे दर्शन घडवावे लागते. भाजप-राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांना असलेल्या लोकांच्या पाठिंब्याबाबत, त्यांच्या जनमानसातील स्थानाबाबत सातत्याने दावे करत असल्यामुळे, त्यांच्या विरोधात केली जाणारी प्रत्येक कृती रस्त्यावर उतरून आपले लोकांमधले स्थान, सामर्थ्य दाखवूनच करावी लागते.

त्यांच्यावर टीका करणारा प्रत्येक टीकाकार वेगळा काढून एकटाच दाखवला जात असल्याने आपल्याला असलेला लोकांचा पाठिंबा दाखवण्यासाठी गर्दीची गरज असते. हजारो लोक एकत्रितरीत्या रस्त्यावर येऊन पदयात्रा करतात, मोर्चा काढतात, हे विरोधामधले एक अत्यंत ताकदीचे विधान आहे. संसदेत आवाज उमटणे बंद झाले की रस्त्यावर उतरून हाक देण्याशिवाय पर्याय नसतो.

चौथे कारण म्हणजे, हे केवळ गर्दी गोळा करणे नाही. ‘भारत जोडो यात्रे’ला लोकांचा खरोखरच प्रतिसाद मिळतो आहे. अर्थात काँग्रेस पक्ष आणि त्याच्या नेत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थितांची जमवाजमव केली आहे, त्यात पुढील निवडणुकीत तिकीट मिळावे अशी आकांक्षा असलेले अनेक जण आहेत, हे कोणीच नाकारणार नाही. पण ‘भारत जोडो यात्रे’दरम्यान तीन राज्यांमध्ये फिरताना मी इंद्रधनुष्याचे सर्व हसते-खेळते रंग पाहिले अनुभवले आहेत. अर्थात ते प्रत्येक हास्य कशासाठी आहे, त्या प्रत्येक हास्यामागचे मन कसे आहे हे सांगणे अवघड आहे, परंतु या यात्रेने आशा निर्माण केली आहे, हे मात्र नक्की. अनेक जण या यात्रेत प्रत्यक्ष सहभागी झाले आहेत. अनेकांनी या यात्रेला आपला पाठिंबा दिला आहे. पण त्याहीपलीकडे या यात्रेबद्दल आस्था असणाऱ्यांचे तिला पाठिंबा देणाऱ्यांचे एक मोठे वर्तुळ आहे. त्यामुळेच ही यात्रा कलुषित करण्याचे भाजपच्या आयटी सेलचे अनेक प्रयत्न फसले आहेत.

पाचवे कारण, ही यात्रा फक्त धर्मनिरपेक्षतेबद्दल बोलत नाही. ‘भारत जोडो यात्रे’ने आज आवश्यक असलेल्या अनेक प्रकारच्या ऐक्याचा संदेश दिला आहे आणि अर्थव्यवस्थेतील सर्वात महत्त्वाचे मुद्दे समोर आणण्यात तिला यश आले आहे. राहुल गांधी यांचे दैनंदिन भाषण सामान्यतः जात, भाषा आणि विविध धर्मांमध्ये एकतेची गरज याविषयी असते. नरेंद्र मोदी सरकारवर ते करत असलेल्या टीकेतून ही बाब पुढे येते, पण त्यांचे भाषण मुस्लिमांविरुद्धच्या द्वेषाच्या राजकारणावर टीका करण्यापुरते मर्यादित नसते. बेरोजगारी, महागाई, नोटाबंदी, वस्तू व सेवा कर (जीएसटी) वा सरकारच्या चुका हे प्रश्न त्यांनी सातत्याने व आक्रमकपणे मांडले आहेत. कुडमुड्या भांडवलशाहीला विरोध करणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील प्रमुख राजकीय नेत्यांपैकी ते एक आहेत. आपल्यासाठी टाकलेल्या जाळ्यात न अडकता ही यात्रा तिचा संदेश देत पुढे चालली आहे.

आणि सहावे कारण, ‘भारत जोडो’ ही फक्त काँग्रेसची यात्रा नाही. या यात्रेला अनेक जनआंदोलने तसेच संघटना, बुद्धिजीवी तसेच भूतकाळात काँग्रेसशी थोडाफार संबंध आलेल्या नागरिकांचा पाठिंबा आहे (याच नात्याने प्रस्तुत लेखक तिच्याशी जोडला गेला), एरवी जे सहसा राजकीय पदे भूषवत नाहीत किंवा काँग्रेस पक्षाला त्यांचा पाठिंबा नसतो, असे लोकदेखील या वेळी ‘भारत जोडो यात्रे’ला पाठिंबा देण्यासाठी उघडपणे पुढे आले आहेत. याचा अर्थ यापुढच्या काळात त्यांना काँग्रेसशी जोडून घ्यायचे आहे किंवा त्यांची काँग्रेसच्या नेतृत्वावर निष्ठा आहे, असे चुकूनही समजू नये. असे सगळे असणे हाच ‘भारत जोडो’चा आत्मा आहे आणि या यात्रेची नैतिक गरज आहे, हेच यातून स्पष्ट होते.

‘भारत जोडो यात्रे’त सहभागी होऊन मी माझी प्रतिष्ठा पणाला लावतो आहे, असे मला सांगणाऱ्या मित्रांना मी नुकताच पुन्हा भेटलो. या वेळी त्यांच्या बोलण्यात अशी कोणतीच काळजी नव्हती तर ते अगदी चिंतामुक्त होते. हसत हसत ते म्हणाले, ‘‘काही तरी घडतंय...’’ त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य त्यांच्या शब्दांपेक्षाही जास्त बोलके होते. मीदेखील त्यांचे म्हणणे मान्य केले आणि म्हणालो, ‘‘हो, आपण समाजामधल्या अंतःप्रवाहांना लाट समजण्याची चूक करत नाही, तोपर्यंत तरी काही तरी घडतं आहे, असं समजायला हरकत नाही. कारण घोडामैदान पुढेच आहे...’’

**लेखक ‘जय किसान आंदोलन’ आणि ‘स्वराज इंडिया’चे संस्थापक आहेत.** yyopinion@gmail.com

---

## विश्लेषण

# कार्लसनच्या ‘फसवणुकी’चे आरोप खरे?

**सिद्धार्थ खांडेकर**

**बुद्धिबळ जगताला** गेल्या महिन्यात हादरवून सोडलेल्या हान्स नीमन फसवणूक प्रकरणाला गेल्या काही दिवसांत नाट्यमय कलाटणी मिळाली. माजी बुद्धिबळ जगज्जेता आणि या खेळाच्या इतिहासातील सर्वांत शक्तिशाली बुद्धिबळपटू मॅग्नस कार्लसनने सुरुवातीस अप्रत्यक्षपणे आणि नंतर थेट केलेल्या फसवणुकीच्या आरोपांमुळे हान्स नीमन हा युवा अमेरिकन बुद्धिबळपटू माहितीझोताच्या केंद्रस्थानी आला. आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ संघटनेने (फिडे) या प्रकाराची दखल घेऊन चौकशी समिती नियुक्त केली आहे. पण चेस डॉट कॉम या संकेतस्थळाने सविस्तर अहवाल सादर करून नीमन ऑनलाइन बुद्धिबळ प्रकारात सातत्याने फसवणूक करत असल्याचा आरोप केला आहे. हे प्रकरण संपण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत.

### मॅग्नस कार्लसनचा आरोप काय होता?

जवळपास महिन्याभरापूर्वी अमेरिकेतील सिंकेफील्ड बुद्धिबळ स्पर्धेत (प्रत्यक्ष पटावर समोरासमोर) कार्लसन पांढऱ्या मोहऱ्यांनिशी खेळत असताना, नीमनविरुद्ध पराभूत झाला. दोघांच्या एलो मानांकनात दीडशेहून अधिक गुणांचा फरक होता. तरीदेखील कार्लसन टिकाव धरू शकला नाही. हा निकाल धक्कादायक होता. पण या पराभवाच्या दुसऱ्याच दिवशी कार्लसनने स्पर्धेतून माघार घेऊन आणखी एक धक्का दिला. मग १९ सप्टेंबर रोजी आणखी एका स्पर्धेत



(ऑनलाइन डाव) कार्लसनने एक चाल खेळून डाव सोडला. नीमन हा फसवणूक करत असल्याचा संशय आल्यामुळे कार्लसन असे करत असल्याची चर्चा त्यामुळे सुरू झाली. लवकरच अधिकृत निवेदन जारी करून कार्लसनने चर्चा-अंदाजांना अधिकृत दुजोरा दिला. सिंकेफील्ड स्पर्धेत नीमन ज्या सहजतेने आणि त्वरेने चाली खेळत होता, ते संशयास्पद होते. इतक्या झटपट अचूक चाली माझ्याविरुद्ध खेळण्याची क्षमता मोजक्याच बुद्धिबळपटूंमध्ये आहे आणि त्यांपैकी नीमन नाही. त्याने पूर्वी दोन वेळा ऑनलाइन डावांमध्ये फसवणूक केल्याची कबुली दिलेली असली, तरी तो सातत्याने गैरमार्गांचा अवलंब करतो, असे कार्लसनचे म्हणणे.

### नीमनचा बचाव काय?

वयाच्या १२व्या आणि १६व्या वर्षी आपण ऑनलाइन डावांदरम्यान दोन वेळा फसवणूक केली होती याची कबुली नीमनने हा संपूर्ण वाद सुरू झाल्यानंतर दिली. त्याचे ऑनलाइन खाते चेस डॉट कॉमने या दोन प्रकारांनंतर बंद केले. याच संकेतस्थळाने त्याच्यावर फसवणुकीच्या आरोपांपुष्ट्यर्थ सखोल अहवाल सादर करावा हा योगायोग नाही. आपल्या खेळामध्ये गेल्या काही वर्षांत सुधारणा झाली आहे. हे वास्तव पचवता न आलेल्यांनी आरोपसत्र सुरू केल्याची नीमनची भूमिका आहे.

### नीमनच्या एलो मानांकनातील सुधारणा अवास्तव आहे?

ती अवास्तव वाटल्यामुळेच नीमनविषयी कायमच संशय व्यक्त केला गेला. सप्टेंबर २०२०मध्ये नीमनचे मानांकन २४६५ होते. सप्टेंबर २०२२मध्ये ते २६८८ इतको नोंदवले गेले, म्हणजे २२३ गुणांची वाढ. ती ‘अ-सामान्य’ असल्याचे बहुतेक सर्व बुद्धिबळपटू, प्रशिक्षक आणि विश्लेषकांचे मत आहे. परंतु अशा प्रकारे नाट्यमय वाढ नोंदवला गेलेला तो एकमेव नाही. मूळ आर्मेनियाचा आणि सध्या अमेरिकेकडून खेळू लागलेल्या लेव्हॉन अरोनियानच्या मानांकनातही तशी ती नोंदवली गेली. भारताचे सध्याचे तीन प्रमुख युवा बुद्धिबळपटू डी. गुकेश, अर्जुन एरिगेसी आणि आर. प्रज्ञानंद यांनी गेल्या काही महिन्यांमध्ये नेत्रदीपक प्रगती केली. परंतु अरोनियान किंवा या तिघांच्या बाबतीत तिळभरही संशय व्यक्त झालेला नाही.

### मग नीमनच्या फसवणुकीचा पुरावा काय?

सध्या तरी त्याच्या असामान्य चाली हाच पुरावा आहे. तो कशा प्रकारे फसवणूक करतो - उदा. वस्त्रांमध्ये एखादे उपकरण लपवून,किंवा ऑनलाइन खेळताना अदर्शनी भागात इतर सॉफ्टवेअरचा वापर करून वगैरे - याबद्दलही ठोस हाती काही लागलेले नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, सध्या तरी त्याच्यावरील आरोपांचे स्वरूप ऑनलाइन बुद्धिबळापुरते मर्यादित आहे. प्रत्यक्ष पटावर सदेह खेळण्यापासून त्याला सध्या तरी कोणत्याही नियमांच्या आधारे रोखता येऊ शकत नाही. पण त्याच्या एलो गुणांमध्ये झालेली वाढ आणि त्याच्या काही चालींमधील थक्क करणारी संगणकीय अचूकता त्याच्याविषयी संशय वाढवणारी ठरते. नीमनचे मानांकन आज जवळपास २७००पर्यंत पोहोचले आहे. पण कोणत्याही डावानंतर त्याचे विश्लेषण नीमन करतो, त्या वेळी ते एखाद्या निष्णात बुद्धिबळपटूचे वाटत नाही, असे निरीक्षण त्याचे समर्थन करणारेही व्यक्त करतात. नुकतेच एका विजयी डावाबद्दल नीमन उद्गारला, की इतक्या सुंदर डावाचे विश्लेषण करण्याची गरजच काय!

### पण एवढा तर्क पुरेसा आहे?

ब्राझिलियन स्ट्रीमर आणि विश्लेषक राफेलायते आणखी एका रंजक मुद्द्याकडे लक्ष वेधतात. एखाद्या बुद्धिबळपटूंच्या सर्वसाधारण चालींची संगणकीय अचूकतेशी असलेली तफावत आणि अशा सदोष चालींचे सातत्य, यांचे एकत्रित प्रमाण असा बुद्धिबळपटू जेव्हा प्रगती करतो तेव्हा कमी होणे अपेक्षित असते. या संदर्भात राफेलायते यांनी गुकेश, प्रज्ञानंद, एरिगेसी यांच्याबरोबरच कार्लसन, करुआनासारख्या मातब्बरांचेही उदाहरण सप्रमाण दिले. नीमनच्या बाबतीत मात्र हे प्रमाण तितके कमी झालेले नाही. याचा अर्थ त्याच्या चाली आजही २५०० एलो मानांकनाच्या बुद्धिबळपटूच्या प्रमाणात सदोष आहेत. मग त्याचे मानांकन वाढले कसे? याचे साधे उत्तर कार्लसनने पुरवले आहे. तो म्हणतो, की पूर्णतः अपराजित राहण्यासाठी मला केवळ दोन किंवा तीनच चाली अवैध प्रकारे खेळणे पुरेसे ठरते. नीमन सध्या हेच करत असल्याचा त्याच्यावर आरोप करणाऱ्यांचा सूर आहे. पण सिद्ध अजूनही काहीच झालेले नाही ही(च) नीमनच्या दृष्टीने जमेची बाजू.

siddharth.khandekar@expressindia.com

---

## अन्वयार्थ

# भारतीय औषधांवर अविश्वास का?



**जागतिक आरोग्य** संघटनेने भारतात खोकल्यावर तयार करण्यात आलेल्या द्रव औषधांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले असून त्याचा परिणाम भारतातून निर्यात होणाऱ्या औषधांवरही होऊ शकतो. पश्चिम आफ्रिकेतील गाम्बिया या देशातील ६६ मुलांच्या मृत्यूस भारतीय बनावटीची खोकल्यावरील औषधे कारणीभूत असल्याची ‘शक्यता’ जागतिक आरोग्य संघटनेने व्यक्त केली असून अशा चार औषधांमध्ये असलेल्या विशिष्ट औषधी द्रवामुळे असे घडले काय, याविषयी तपासणीचा सल्ला दिला आहे. भारतात खोकल्यावरील अशा औषधांचा सर्रास वापर होत असतो. मात्र त्यांची परिणामकारकता आणि त्याचे परिणाम याबाबत पुरेशा प्रमाणात तपासणी होते किंवा नाही, याबाबत अशा घटनेमुळे शंका निर्माण होते. या एकाच प्रकारच्या चार औषधांबद्दल मागील वर्षीच्या जुलै महिन्यात प्रथम शंका निर्माण होऊ लागली. त्यांच्या सेवनामुळे पाच वर्षांच्या मुलांमध्ये किडनीशी संबंधित अडचणी निर्माण होऊ लागल्या. ताप, उलट्या आणि लघवी होण्यास त्रास अशा तक्रारी येऊ लागल्या. हे द्रव औषध घेतल्याने मृत्यू पावणाऱ्या मुलांची टक्केवारी ९० एवढी असल्याचे लक्षात येऊ लागले. गाम्बियातील प्रयोगशाळेत ही औषधे तपासणीसाठी पाठवण्यात आली, तेव्हा त्यामध्ये डायथिलीन ग्लायकॉल आणि इथेलीन ग्लायकॉल या द्रव्यांचे अतिरिक्त प्रमाण असल्याचे लक्षात आले. हे दोन्ही द्रव मानवी शरीरास घातक असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे. या औषधांच्या परिणामकारकतेबद्दल वा त्याच्या विश्वासार्हतेबद्दल भारतीय कंपन्यांनी अद्याप पुरेसा स्पष्ट खुलासा केलेला नाही. जागतिक पातळीवर अमेरिकेच्या एफडीए (फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन) या संस्थेकडून मान्यता मिळालेल्या औषधांना विश्वासार्ह मानले जाते. अनेकदा भारतीय औषध कंपन्या ही मान्यता मिळवण्यासाठीच्या अटींची पूर्तता करू शकत नाहीत. त्यामुळे ती परस्पर तिसऱ्या जगातील देशांमध्ये पाठवली जातात. तेथे अशा औषधांची मागणी मोठी, शिवाय अमेरिकी एफडीएची मान्यता टाळून हा व्यवसाय करता येतो. असे करताना त्याच्या औषधीय विश्वासार्हतेबाबत फारशी काळजी घेतली जात नसावी. हे असे केवळ गाम्बिया या देशातच घडले आहे, असे नव्हे; भारतात दोन वर्षांपूर्वी जम्मू-काश्मीरमध्ये अशाच प्रकारची औषधे घेतल्यामुळे १७ मुलांचा मृत्यू झाला होता. हिमाचल प्रदेशातही अशाच प्रकारे १४ मुलांना जीव गमवावा लागला होता. या औषधांच्या दर्जाबाबत केलेल्या चाचण्या १९ वेळा अयशस्वी ठरल्या होत्या. तरीही ती बाजारात सहजपणे उपलब्ध होत आहेत. या पद्धतीने भारतीय औषधांबद्दल होणाऱ्या गैरसमजांना खतपाणी मिळते आणि जगात समांतरपणे सुरू असलेल्या बनावट औषधांचे उत्पादन करणाऱ्या देशांमध्ये भारताचे नाव अग्रक्रमावर येते. भारतात औषधांना मान्यता देणाऱ्या आयसीएमआरसारख्या संस्थांनी त्याबाबत अधिक जागरूक राहून अशा औषधांवर कडक बंदी घालण्याची आवश्यकता आहे. करोनाकाळात अनेक कंपन्यांनी आपापली औषधे बाजारात आणण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी याच संस्थेने काटेकोरपणे तपासणी केल्यानंतर त्याला परवानगी दिली होती. अशाच रीतीने भारतात तयार होणाऱ्या प्रत्येक औषधाबाबत जागरूकता दाखवणे महत्त्वाचे व आवश्यक आहे. एफडीएची मान्यता टाळून अशी औषधे बाजारात उपलब्ध होण्याने अनेक निष्पापांना जीव गमवावा लागत असेल, तर त्याकडे अधिक गांभीर्यानेच पाहायला हवे.

लोकसत्ता [पुणे]
१० शुक्रवार, ७ ऑक्टोबर २०२२ WWW.LOKSATTA.COM

# रस्ते दुरुस्तीवर दहा वर्षांत २२१ कोटींची उधळपट्टी

## पथ विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** रस्ते दुरुस्तीच्या नावाखाली महापालिकेच्या पथ विभागाने गेल्या दहा वर्षांत तब्बल २२१ कोटी रुपयांचा खर्च केला आहे. दरवर्षी महापालिकेच्या तिजोरीतून कोट्यवधी रुपये खर्च करूनही रस्त्यांवरील खड्डे कायम असल्याने हा खर्च उधळपट्टीच ठरला आहे. गेल्या दहा वर्षांत रस्ते दुरुस्तीसाठी महापालिकेच्या पथ विभागाला ३४१ कोटींची तरतूद उपलब्ध करून देण्यात आली. त्यापैकी २२१ कोटींचा खर्च रस्ते दुरुस्तीवर करण्यात आला आहे. रस्ते दुरुस्तीसाठीची १२० कोटींची रक्कम खर्च करण्यात आलेली नाही. त्यामुळे महापालिकेच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याने रस्ते दुरुस्ती, डांबरीकरणाची प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी शंभर कोटी रुपयांचा निधी आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी उपलब्ध करून दिला आहे. गेल्या काही वर्षांपासून रस्ते दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होत असला, तरी रस्त्यांची दुरवस्था कायम असल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे दरवर्षी शेकडो कोटी रुपये खर्च केल्यानंतरही रस्ते योग्य पद्धतीने दुरुस्त का होत नाहीत, अशी विचारणा नागरिकांकडून करण्यात येत आहे.दरवर्षी महापालिकेला रस्ते दुरुस्तीसाठी ३४१ कोटींचा निधी उपलब्ध झाल्याची माहिती महापालिकेच्या पथ विभागाकडून देण्यात आली आहे. उपलब्ध तरतुदीपैकी केवळ ६४.८१ टक्के निधीचा प्रत्यक्ष वापर रस्ते दुरुस्तीवर झाला आहे.

> **शहरातील रस्त्यांची एकूण लांबी १ हजार ४०० किलोमीटर आहे. रस्ते दुरुस्तीसाठी दरवर्षी किमान ४०० कोटींची आवश्यकता असते. देखभाल दुरुस्ती दायित्व कालावधीत केलेले रस्ते वगळता अन्य रस्त्यांसाठी हा निधी खर्च केला जातो. मात्र निधीच्या कमतरतेमुळे रस्ते दुरुस्ती अडचणीची ठरत आहे**
> – डॉ. कुणाल खेमनार, अतिरिक्त आयुक्त

सन २०१६-१७ या वर्षात सर्वाधिक ७३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. त्यातील ४९ कोटी रुपये रस्ते दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आले. त्यातील ३८ कोटी रुपये पाणीपुरवठा, मलःनिस्सारण, गॅस आणि महावितरणाच्या वाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यासाठी खर्च करण्यात आले.

दोन वर्षांपूर्वी करोना संसर्गाच्या कालावधीतील दोन आर्थिक वर्षातही ८६ कोटींच्या एकूण तरतुदीपैकी ६० कोटींचा खर्च करण्यात आला. मात्र त्यानंतरही रस्त्यांच्या कामांचा दर्जा निकृष्ट राहिल्याचे दिसून आले. गेल्या दोन वर्षांत सर्वाधिक खर्च करूनही यंदा रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्याची वस्तुस्थिती आहे. शहरातील स्वयंसेवी संस्था, नागरिकांनी आणि वाहनचालकांनी त्याबाबत महापालिकेच्या पथ विभागाकडे शेकडो तक्रारी नोंदविल्या आहेत.

महापालिकेच्या अंदाजपत्रकातील तरतुदीपैकी केवळ दहा टक्के निधी रस्ते पूर्ववत करण्यासाठी आणि दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आला आहे. रस्ते सुस्थितीत राहावेत, यासाठी महापालिकेने यंदा तीस प्रमुख रस्त्यांची निवड केली आहे. या रस्त्यांचे पुनरुज्जीवन केले जाणार असून जड वाहतुकीनंतरही हे रस्ते खराब होणार नाहीत, या दृष्टीने रस्त्यांवर कामे केली जाणार आहेत. येत्या काही दिवसांत या तीस रस्त्यांवरील कामे सुरू करण्यात येणार असल्याची माहिती पथ विभागाकडून देण्यात आली.

# शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने २९ लाखांची फसवणूक

### गुजरातमधील तिघांच्या विरोधात गुन्हा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने एकाची २९ लाख ५० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी तिघांच्या विरोधात कोथरुड पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

या प्रकरणी विशालभाई गोविंदभाई रावल (वय २६), मयूरभाई चौधरी, गोपालभाई रावल (तिघे रा. गुजरात) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एकाने कोथरुड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

तक्रारदार मूळचे सोलापूरचे आहेत. त्यांची एका परिचितामार्फत आरोपी रावल, चौधरी यांच्याशी ओळख झाली होती. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष आरोपींनी तक्रारदाराला दाखविले होते.आरोपी तक्रारदाराला कोथरुड भागात भेटले होते. त्यांच्याकडून वेळोवेळी २९ लाख ५० हजार रुपये घेतले. आरोपींना पैसे दिल्यानंतर तक्रारदाराला परतावा देण्यात आला नाही. पैशांबाबत विचारणा केल्यानंतर आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे दिली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रारदाराने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक सावळे तपास करत आहेत.

# ‘ठाकरे, शिंदे यांनी सामंजस्याची भूमिका घ्यावी’

### अजित पवार यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** महागाई, बेरोजगारीसारखे महत्त्वाचे विषय बाजूला ठेवून भलत्याच विषयांवर चर्चा घडवून आणली जात आहे. शिवसेनेच्या अंतर्गत वादाला अवास्तव प्रसिद्धी दिली जात असून, उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोघांनी सामंजस्याची भूमिका घ्यायला हवी. राजकीय जोडे बाजूला ठेवून सलोख्याच्या भावनेने राहिले पाहिजे, असे मत विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी व्यक्त केले.

थेरगाव येथे पत्रकारांशी बोलताना पवार म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोघांनीही सामंजस्याची भूमिका घ्यायला हवी. प्रत्येकाला पक्षाची ताकद वाढवण्याचा तसेच पक्षाची भूमिका जनतेसमोर मांडण्याचा अधिकार आहे. मात्र, लोकशाहीच्या परंपरा जपल्या पाहिजेत. सद्यःस्थिती पाहता त्यांच्यातील वाद पराकोटीला गेले आहेत. शब्दाने शब्द वाढत जातो. ‘अरे ला कारे’ झाले, की त्याचे पडसाद दूरपर्यंत पसरतात. राजकारणाच्या वेळी राजकारण ठीक आहे. राजकीय जोडे बाजूला ठेवून सलोख्याच्या भावनेने राहिले पाहिजे.

ठाकरे आणि शिंदे यांच्यातील वादात कोणाला कोणते चिन्ह मिळेल, हे आताच सांगता येत नाही. राष्ट्रवादीला प्रारंभी चरखा हे निवडणूक चिन्ह मिळाले होते. ऐनवेळी वाद झाला आणि चरखा चिन्ह गोठवण्यात आले. नंतर, आम्हाला घड्याळ मिळाले. प्रसारमाध्यमांमुळे जग जवळ आले आहे. त्यामुळे आता कोणतेही चिन्ह असले तरी ते मतदारांपर्यंत पोहोचविणे फारसे अवघड राहिले नाही, असे पवार यांनी सांगितले.

# शिस्तबद्ध पथसंचलनामध्ये हजारो स्वयंसेवक

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** घोषपथकाच्या तालबद्ध ठेक्यावर शिस्तबद्ध संचलन करीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने विजया दशमीनिमित्त बुधवारी शहराच्या विविध भागांमध्ये झालेल्या पथसंचलनामध्ये हजारो स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. गणवेशातील स्वयंसेवकांच्या पथसंचलनाचे ठिकठिकाणी उत्साहात स्वागत करण्यात आले.

कसबा भाग मोतीबाग नगराच्या पथसंचलनामध्ये पाचशेहून अधिक स्वयंसेवकांनी संपूर्ण गणवेशात सदंड सहभाग घेतला. मोतीबागेतील ध्वजवंदन आणि शिवाजीनगरच्या एस.एस.पी.एम.एस. येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून घोषपथकाने मानवंदना दिली. मानवंदना कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, कसबा भाग संघचालक ॲड. प्रशांत यादव उपस्थित होते. रेणुका स्वरूप प्रशालेच्या मैदानावरून प्रत्यक्ष पथसंचलनाची सुरुवात झाली. ठिकठिकाणी ज्येष्ठांसह लहान मुलांनी पुष्पवृष्टी करून पथसंचलनाचे स्वागत केले.

संघाच्या संभाजी भागाच्या पथसंचलनाला कर्वेनगरच्या काकडे पॅलेस येथून सुरुवात झाली. अश्वारूढ ध्वज, घोषपथक आणि शेकडो स्वयंसेवकांच्या शिस्तबद्ध संचलनाने नागरिकांचे लक्ष वेधले. ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि स्वयंसेवकांवर पुष्पवृष्टी करून नागरिकांनी पथसंचलनाचे उस्फूर्तपणे स्वागत केले. या पथसंचलनात संभाजी भाग संघचालक अनिल व्यास, सह प्रांत प्रचारक सुनील साठ्ये, कर्वेनगर कार्यवाह चेतन भिसे सहभागी झाले होते.

# अन्ननलिकेच्या कर्करोगावर रुग्णाची मात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** वेगाने कमी होत चाललेले वजन आणि अन्न सेवन करताना गिळण्यास होणारा त्रास या दोन प्रमुख तक्रारी घेऊन आलेल्या महिलेला अन्न नलिकेच्या कर्करोगाचे निदान झाले. केमोथेरपी, रेडिएशन आणि शस्त्रक्रिया अशा तिन्ही पर्यायांचा वापर करून तिला कर्करोग मुक्त करण्यात डॉक्टरांना यश आले आहे.

कर्करोग शल्यविशारद डॉ. जयपाल रेड्डी यांनी या महिलेवर उपचार केले. डॉ. रेड्डी म्हणाले,की वजन घटणे आणि अन्न गिळण्यास त्रास यावरून अन्ननलिकेच्या कर्करोगाची शंका येत होती. आवश्यक तपासण्यांमधून अन्न नलिकेत गाठ असल्याचे स्पष्ट झाले. बायोप्सीमधून ही गाठ कर्करोगाचीच असल्याचे दिसून आले. कर्करोगाचा प्रसार लक्षणीय असला तरी इतर अवयांमध्ये तो पसरला नव्हता. केमोथेरपी आणि रेडिएशन दिल्यानंतर एका आठवड्यातच रुग्णाचा अन्न गिळण्याचा त्रास कमी झाला. त्यानंतर शस्त्रक्रिया करुन रुग्णाच्या अन्न नलिकेतील कर्करोग संपूर्ण काढून टाकण्यात आला. ही शस्त्रक्रिया करणे गुंतागुंतीचे आहे, कारण पारंपरिक पद्धतीने केलेल्या शस्त्रक्रियेत मोठ्या जखमा, त्यामुळे रक्तस्त्रावही अधिक होतो. या रुग्ण महिलेवर दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रियेचा पर्याय निवडून कमीत कमी छेद आणि वेदनाही कमी राहतील अशी काळजी घेण्यात आल्याचे डॉ. रेड्डी यांनी स्पष्ट केले. तळेगाव येथील टिजीएच ऑन्को-लाईफ सेंटर येथे या महिलेवर उपचार करण्यात आले.

# रस्त्यांवर फटाका विक्रीचे स्टॉल्स लावल्यास परवाना रद्द

### हमीपत्रानंतरच फटाका विक्री स्टॉल्सना परवानगी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महापालिकेच्या मोकळ्या जागांवर; तसेच खासगी मिळकतंमधील मोकळ्या जागा किंवा बंदिस्त जागांवर फटाका विक्री स्टॉल्सला परवानगी देताना पदपथांवर स्टॉल्स लावले जाणार नाहीत, असे हमीपत्र घेतल्यानंतरच फटाका व्यावसायिकांना परवानगी देण्यात येणार आहे. पदपथ, रस्त्यांवर फटाका विक्रीचे स्टॉल्स उभारल्यास परवाना रद्द करण्याची शिफारसही महापालिकेच्या अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकान निर्मूलन विभागाने केली आहे.

महापालिकेच्या अतिक्रमण आणि बांधकाम निर्मूलन विभागाकडून याबाबतचे परिपत्रक काढण्यात आले आहे. मालमत्ता आणि व्यवस्थापन उप आयुक्त, परवाना आणि आकाशचिन्ह विभागाचे उप आयुक्त, सर्व क्षेत्रीय कार्यालयील महापालिका सहायक आयुक्त आणि अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी यांना हमीपत्र घेण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

दिवाळीवेळी तात्पुरत्या स्वरूपात फटाका आणि शोभेची दारू विक्री करण्यासाठी परवाने मंजूर केले जातात. सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात जनहित याचिका दाखल आहे. त्यानुसार राज्याच्या नगरविकास विभागाने योग्य ती कार्यवाही करण्याची सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांना केली आहे. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त कार्यालयाने महापालिकेच्या स्तरावर मान्य धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासंदर्भात संबंधित विभागांना आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाकडून त्याबाबतचे परिपत्रक काढण्यात आले आहे.

दिवाळीमध्ये तात्पुरते फटाका विक्री स्टॉल्सना परवानगी देताना शहरातील पदपथांवर फटाका विक्रीला परवानगी दिली जाणार नाही. महापालिकेच्या मोकळ्या जागा, खासगी मिळकतींमधील मोकळ्या किंवा बंदिस्त जागावर नियमानुसार परवानगी घेताना रस्ता, पदपथांवर अनधिकृतपणे फटाका विक्रीचे स्टॉल्स लावले जाणार नाहीत, याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे. पदपथ, रस्त्यांवर फटाका आणि शोभेची दारू विक्रीचे स्टॉल्स उभारले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. अनधिकृत फटाका विक्री स्टॉल्स उभारणाऱ्यांवर स्थानिक पोलीस ठाण्याच्या मदतीने कायदेशीर कारवाई करावी किंवा त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत. अनधिकृत फटाका विक्रीचे स्टॉल्स पदपथ किंवा रस्त्यांवर टाकणाऱ्यांना पुढील वर्षी परवाने दिले जाऊ नयेत, असे या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# ‘टाटा मोटर्स’ कामगारांचा कंपनीतील पूजेवर बहिष्कार

### दिवाळी बोनसवरून नाराजी नाट्य; असंतोष पुन्हा चव्हाट्यावर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** टाटा मोटर्स कंपनीच्या कार विभागातील (कार प्लांट) वेतनवाढ करार रखडला असल्याने आधीच कामगारांमध्ये तीव्र नाराजी असताना, दिवाळीचा बोनस निर्धारित कालावधीत जाहीर न झाल्याने या नाराजीत आणखी भर पडली आहे. त्याचा परिणाम म्हणून कामगारांनी कंपनीच्या दसरा-खंडेनवमीच्या सामूहिक पूजेवर बहिष्कार टाकला. याद्वारे कामगारांमधील असंतोष पुन्हा चव्हाट्यावर आला आहे.

टाटा मोटर्सच्या कामगारांचा व्यवस्थापनाशी ३ मे २०२२ रोजी वेतनवाढ करार झाला. सुरुवातीपासून दर तीन वर्षांनंतर करार होत होता. यंदापासून तो दर चार वर्षांनंतर होईल, असा बदल करण्यात आला. तो कामगारांना मान्य नव्हता. कामगारांचा विरोध असतानाही तो करार मान्य करण्यात आला. इतर विभागांचा वेतनवाढ करार झाला, त्या पद्धतीने कार विभागाचा करार झाला नाही. तो बराच काळ रखडला. त्यावरून या विभागातील कामगारांमध्ये नाराजी आहे.

कंपनीने कामगारांच्या नाश्त्याची वेळ बदलून ती कमी केली. जवळपास २ हजार कामगारांनी चहा, नाश्ता व जेवणावर बहिष्कार टाकून कामगारांनी आपली नाराजी तेव्हा व्यक्त केली. ही घटना ताजी असतानाच नाराजीनाट्याचा दुसरा अंक खंडेनवमीच्या दिवशी दिसून आला. या वेळी नाराजीचे कारण बोनस होते. दसऱ्यापर्यंतही बोनसची घोषणा झाली नाही म्हणून कामगारांमध्ये असलेली नाराजी नव्याने उफाळून आली. कंपनीच्या परंपरेप्रमाणे कामगार, पदाधिकारी आणि व्यवस्थापनातील अधिकारी प्रत्येक विभागात जाऊन एकत्रितपणे खंडेनवमीची पूजा करतात. तथापि, या वर्षी तसे झाले नाही. नाराजीमुळे कामगार संघटनेने कंपनी व्यवस्थापनाशी असहकार पुकारत पूजेवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार, कामगारांनी आपापल्या जागेवर वैयक्तिक पूजा केली. मात्र, संयुक्तपणे कंपनीच्या विविध भागात दिवसभर होणाऱ्या पूजांचे कार्यक्रम या वेळी होऊ शकले नाहीत.

### संघटनेत दोन गट

कार विभागाचा वेतनवाढ करार झाल्याशिवाय बोनसवर चर्चा नको, अशी अट कामगार संघटनेने व्यवस्थापनासमोर ठेवली आहे. वेतनवाढ करार व बोनसचा विषय परस्परांशी जोडू नये, असे बहुसंख्य कामगार नेत्यांचे म्हणणे आहे. त्यावरून दोन गट पडले आहेत. कामगार नेत्यांमध्ये असलेल्या गटबाजीचा फायदा व्यवस्थापनाकडून घेतला जात असून त्यामुळे आमचे नुकसान होत असल्याची भावना कामगारांमध्ये आहे.

# पीकविमा, अतिवृष्टीची मदत मिळण्यास अडथळे?

### मुख्य सचिवांच्या आदेशानंतरही पीक कापणी प्रयोगास तलाठ्यांचा नकार

**दत्ता जाधव, लोकसत्ता**

**पुणे :** राज्याच्या मुख्य सचिवांनी आदेश दिल्यानंतरही खरीप हंगामातील पीक कापणी प्रयोग करण्यास तलाठ्यांनी नकार दिला आहे. तलाठ्यांनी दिलेल्या नकाराचा परिणाम म्हणून पीकविमा योजना आणि अतिवृष्टीत झालेल्या नुकसान भरपाईचा लाभ मिळण्यात अडचणी येणार आहेत. तलाठ्यांच्या या आडमुठ्या भूमिकेचा नाहक त्रास शेतकऱ्यांना सहन करावा लागणार आहे.

राज्यात मंडलनिहाय खरीप हंगामातील पिकाचे पीक कापणी प्रयोग केले जातात. या प्रयोगातून आलेल्या निष्कर्षानुसार शेतीमालाच्या उत्पन्नांचा अंदाज वर्तविला जातो. अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तीत पिकांचे किती नुकसान झाले, याची माहिती प्रयोगातून मिळते. पीकविम्याचा लाभ देताना कंपन्या किंवा अतिवृष्टी बाधितांना मदत देताना सरकारकडून पीक कापणी प्रयोगाचे निष्कर्षाचा आधार घेतला जातो. त्यामुळे हे पीक कापणी प्रयोग वेळेत न झाल्यास आणि निष्कर्ष संबंधित यंत्रणांना वेळेत न मिळाल्यास शेतकऱ्यांना मदत देण्याच्या प्रक्रियेत अडचणी येणार आहेत.

### खरीप पीक काढणी अखेरच्या टप्प्यात

राज्यभरात कडधान्यांची काढणी पूर्ण झालेली आहे. सोयाबीन आणि बाजरीची काढणी अखेरच्या टप्प्यात आहेत. तरीही तलाठ्यांकडून करावयाचे पीक कापणी प्रयोग अद्याप झालेले नाहीत. त्यामुळे यापुढे तलाठ्यांनी प्रयोग सुरू करण्याचा निर्णय घेतला तरीही त्याचा फायदा शेतकऱ्यांना होण्याची शक्यता कमीच आहे. तलाठ्यांनी न केलेल्या पीक कापणी प्रयोगामुळे राज्याच्या एकूण पीक कापणी निष्कर्ष काढण्यात अडचणी येणार आहेत.

> **मुख्य सचिवांसोबत झालेल्या बैठकीत आम्हाला तोंडी आदेश मिळाले आहेत. मुख्य सचिवांकडून लेखी आदेश मिळत नाहीत, तोवर आम्ही पीक कापणी प्रयोग करणार नाही. पीक कापणी प्रयोगाच्या आदेशाला १९७५च्या शासन निर्णयाचा संदर्भ दिला जातो. आता काळ बदलला आहे. त्यानुसार नव्याने जबाबदारी निश्चित केली पाहिजे. पीक कापणी प्रयोगाचे निष्कर्ष पैसेवारी काढण्यासाठी ग्राह्य धरण्यास मुख्य सचिवांनी मंजुरी दिली आहे, त्या बाबतही लेखी आदेशाची प्रतीक्षा आहे.**
> –ज्ञानेश्वर डुबल, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी मंडळाधिकारी समन्वय महासंघ

### ‘महसूल’कडून हीन वागणूक?

महसूल कर्मचारी आडमुठी भूमिका घेत आहेत. मुख्य सचिवांच्या आदेशालाही ते जुमानत नाहीत, असे चित्र आहे. पीक कापणी प्रयोगासह, पीकविमा योजना, पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेसह विविध योजनांबाबत महसूल खात्याची अशीच अडमुडी भूमिका आहे. काम करायला आम्ही आणि पुरस्कार घ्यायला महसूल विभाग पुढे असतो. तो इतर विभागांना हीन दर्जाची वागणूक देतो, अशी उद्विग्नता कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. पण, कृषी विभागाच्या एकाही अधिकाऱ्याने जाहीरपणे मत व्यक्त करण्यास नकार दिला. इतकी महसूल विभागाची दहशत दिसून आली.

राज्यात पीक कापणी प्रयोगाची विभागणी महसूल विभाग ३३ टक्के, कृषी विभाग ३६ टक्के आणि ग्रामविकास विभाग ३३ टक्के, अशी करण्यात आली आहे. त्यानुसार कृषी आणि ग्रामविकास विभागाने आपले प्रयोग करून संबंधित माहिती वरिष्ठांना कळवली आहे. पण, हे काम कृषी विभागाचे आहे, असे म्हणत महसूल विभागाच्या तलाठ्यांनी कामावर बहिष्कार टाकला होता. त्यामुळे प्रयोग रखडले. मुंबईत २८ सप्टेंबर रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागाचे सचिव आणि संघटना पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. मुख्य सचिवांनी आदेश देऊनही अद्यापही तलाठ्यांनी पीक कापणी प्रयोग सुरू केलेले नाहीत.

# दारू पिण्यास मनाई केल्याने जिवे मारण्याची धमकी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** दारू पिण्यास मनाई केल्याने एकास जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना कोथरूड भागात घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ऋषीकेश भास्कर यशोदे (वय ४३, रा. ग्लोरिया ग्रास, पौड रस्ता) यांनी कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कोथरूडमधील भुसारी कॉलनी परिसरात शिवदत्त प्लाझा इमारतीजवळ तिघे जण दारू पित होते. त्या वेळी यशोदे यांनी ‘सोसायटीच्या आवारात दारू पिऊ नका,’ असे तिघांना सांगितले. ‘आम्हाला ओळखले नाही का? आम्ही गंभीर गुन्ह्यातील आरोपी आहोत,’ असे म्हणत तिघांनी यशोदे यांना पिस्तुलातून गोळी झाडून जिवे मारण्याची धमकी दिली, असे यशोदे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक राठोड तपास करत आहेत.

### कामकाजात अडथळे, बीएसएनएल कार्यालयाकडे तक्रार

# अग्निशमन दलाचे नियंत्रण कक्ष विमा कंपनीच्या ध्वनिमुद्रणाने त्रस्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना विनाविलंब सेवा देणारे अग्निशमन दलाचे अधिकारी आणि कर्मचारी एका विमा कंपनीच्या ध्वनिमुद्रणाने त्रस्त झाले आहेत. दलाच्या नियंत्रण कक्षामध्ये असलेल्या चार इनकमिंग लाईन्सवर दूरध्वनी उचलताच ऐकू येणाऱ्या ध्वनिमुद्रणाने दलाच्या कामकाजात अडथळे निर्माण झाले आहेत. यासंदर्भात बीएसएनएलच्या कार्यालयशी संपर्क साधून ही बाब निदर्शनास आणून देण्यात आली आहे. अग्निशमन दलाचे नियंत्रण कक्ष हे आग तसेच आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना वेळेत सेवा देण्याचे कार्य पार पाडत असते.

### आपत्कालीन प्रसंगी १०१ वर संपर्क न झाल्यास पर्यायी क्रमांक पुढीलप्रमाणे

नियंत्रण कक्ष ०२०-२६४५१७०७
नियंत्रण कक्ष अग्निशमन अधिकारी
पंकज जगताप - ८९२३१०१४५३
प्रदीप खेडेकर - ९८९००१५१०१
वरिष्ठ अग्निशमन अधिकारी
रमेश गांगड - ९६८९९३००७०
गजानन पाथ्रुडकर - ९६८९९३००९०

दलाच्या नियंत्रण कक्षात दिवसभरात विविध प्रकारचे शेकडो दूरध्वनी येत असतात. त्याप्रमाणे नियंत्रण कक्षातील जवान परिस्थिती हाताळून योग्य ती सेवा बजावत असतात. परंतु, सध्या महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षातील दूरध्वनी क्रमांक १०१ वर गेल्या चार दिवसांपासून (४ ऑक्टोबर) विमा कंपनीचे ध्वनिमुद्रित ध्वनिमुद्रण सातत्याने वाजत आहे.

नियंत्रण कक्षामधे असणाऱ्या चार इनकमिंग लाइन्सवर दूरध्वनी उचलताच विमा कंपनीचे ध्वनिमुद्रण ऐकू येते. त्यामुळे दलाच्या कामकाजात अडथळा निर्माण होत आहे. नागरिकांनी संपर्क साधल्यास नियंत्रण कक्षाचे दूरध्वनी व्यस्त असल्याचे जाणवत आहे. त्यामुळे आग किंवा आपत्कालीन प्रसंगी मोठी अडचण निर्माण होऊ शकते. या प्रकारामधे विमा कंपनीचे नाव समजत नसून ८०३७६८१००३ तसेच ८०७१६३१०९ या क्रमांकावरून सातत्याने संपर्क होऊन विनाकारण त्रास होत आहे. या विषयावर बीएसएनएलच्या कार्यालयाशी संपर्क साधून ही गोष्ट निदर्शनास आणून देण्यात आली आहे. बीएसएनएलचे अधिकारी आणि कर्मचारी याबाबत पुढील कार्यवाही करत आहेत.

# अल्पवयीन मुलीवर नात्यातील व्यक्तीकडून अत्याचार

## लोणावळा ग्रामीण पोलिसांकडून गुन्हेगाराला तत्काळ अटक

**लोकसत्ता वार्ताहर**

**लोणावळा :** नेपाळ येथून पोटापाण्यासाठी लोणावळ्यात आलेल्या कुटुंबातील एका अल्पवयीन मुलीवर तिच्या नात्यातील व्यक्तीकडून दारू पाजून अत्याचार करण्यात आल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. लोणावळा ग्रामीण पोलिसांनी तत्काळ या गुन्ह्यातील आरोपीला जेरबंद केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मंगळवारी (३ ऑक्टोबर) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास लोणावळा शहराजवळ असलेल्या वरसोली (ता. मावळ) या ठिकाणी हा घृणास्पद प्रकार घडला आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या वडिलांनी फिर्याद दिली असून यातील आरोपी शंकर पानसिंग बहादूर थापा (वय २४, सध्या रा. वरसोली, ता. मावळ, मूळ रा. शिवडी, पो. चौरपाटी, जि. अझाम, नेपाळ) याला लोणावळा ग्रामीण पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. आरोपी शंकर याने पीडित मुलगी आणि तिचा सात वर्षीय भाऊ यांना भाजीपाला खरेदी करण्यासाठी म्हणून घरातून बाहेर नेले. त्यानंतर त्यांना एका पडीक जमिनीवर घेऊन जाऊन पीडित मुलीला त्या ठिकाणी दारू पाजून तिच्यावर शारीरिक अत्याचार केले. या प्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक सुरेखा शिंदे पुढील तपास करीत आहेत.



चांदणी चौकातील जुना उड्डाणपूल पाडण्यात आल्यावर रस्ता रुंदीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. मात्र, वाहतूक कोंडी अद्याप कायम आहे.

# ‘लोकसत्ता दुर्गा’ सन्मान सोहळा सोमवारी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** ‘लोकसत्ता दुर्गा पुरस्कार २०२२’ जाहीर झालेल्या नऊ कर्तबगार स्त्रियांचा सन्मान सोहळा सोमवारी, १० ऑक्टोबर रोजी होणार आहे.

Gravittus FOUNDATION Towards a better world प्रस्तुत
लोकसत्ता दुर्गा २०२२
सहप्रायोजक

प्रसिद्ध अभिनेत्री वंदना गुप्ते, सोनाली कुलकर्णी आणि चिन्मयी सुमीत यांच्यासह मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, उत्पादन शुल्क व नागरी हवाई वाहतूक विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर आणि ‘महाजेनको’चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन या वेळी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

या भव्य पुरस्कार सोहळ्यात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारतीय चित्रपट संगीताचा ७५ वर्षांचा इतिहास उलगडणार आहे. यानिमित्ताने ओठांवर रेंगाळणारी निवडक चित्रपटगीते सादर केली जाणार असून, आपले चित्रपट संगीत कसे बदलत गेले, याचा पटच त्यातून समोर येणार आहे. ‘अफसाना लिख रहीं हूँ’पासून ‘सवांर लूँ’पर्यंतची गोड गाणी या कार्यक्रमात रसिकांना ऐकायला मिळतील.

यंदा ‘लोकसत्ता दुर्गा पुरस्कारां’साठी निवड झालेल्या नऊ ‘दुर्गां’मध्ये सायबर गुन्हेविषयक जनजागृती करणाऱ्या सोनाली पाटणकर, उद्योजिका भूपाली निसळ, मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देणाऱ्या तपस्वी गोंधळी, सामाजिक कार्यकर्त्या सीमा किणीकर, शास्त्रज्ञ डॉ. सुलभा कुलकर्णी, डॉ. मोनाली रहाळकर, डॉ. सुनीती धारवाडकर, संदीपा कानिटकर आणि अंध-अपंगांसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्या जाई खामकर यांचा समावेश आहे.

**मुख्य प्रायोजक**
- ग्रॅव्हिटस फाऊंडेशन

**सहप्रायोजक**
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
- सिडको
- व्हि पी बेडेकर अँड सन्स प्रा. लि.
- तन्वी हर्बल्स
- टीजेएसबी सहकारी बँक लि.

**पॉवर्ड बाय**
- व्हि एम मुसळूणकर ज्वेलर्स
- दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड
- जमीन प्रा. लि.

**टेलिव्हिजन पार्टनर**
- एबीपी माझा

**कार्यक्रम कुठे, कधी?**
स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, दादर, शिवाजी पार्क
सोमवारी सायंकाळी ६.१५ वा.
कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, प्रथम येणाऱ्यांना प्रथम प्रवेश मिळेल. काही जागा राखीव.

# रासायनिक शेती विनाशाकडे घेऊन जाणारी

## गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** रासायनिक शेती विनाशाकडे घेऊन जाणारी आहे. पर्यावरण, पाणी, जमीन आणि गोमातेचे संरक्षण करायचे असेल तर नैसर्गिक शेतीला पर्याय नाही. रासायनिक शेतीइतकेच उत्पादन नैसर्गिक शेतीतून मिळते. देशातील जनतेला विषमुक्त अन्नधान्य देऊन कर्करोगासारख्या आजाराच्या विळख्यापासून जनतेला दूर ठेवण्यासाठी नैसर्गिक शेती करा, असे आवाहन गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

बालेवाडी येथील क्रीडा संकुलात झालेल्या राज्यस्तरीय नैसर्गिक शेती परिषदेत ते बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकात पाटील, कृषिमंत्री अब्दुल सत्तार, फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांच्यासह कृषी सचिव एकनाथ डवले, आयुक्त धीरज कुमार आदी उपस्थित होते.

राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले,की मी राज्यपाल नंतर, अगोदर शेतकरी आहे. हरियानातील कुरुक्षेत्रात दोनशे एकर जागेवर नैसर्गिक शेती केल्यानंतरच मी तुमच्यासमोर बोलण्यासाठी उभा आहे. रासायनिक शेतीपेक्षा कमी उत्पादन मिळते म्हणून नैसर्गिक शेती करणे टाळले जाते. पण, रासायनिक शेती इतकेच उत्पादन नैसर्गिक शेतीतून मिळते, शिवाय उत्पादन खर्चात बचत होते. रासायनिक शेतीमुळे जमिनीची सुपीकता कमी झाली आहे. जमिनीतील सेंद्रिय कार्बन ०.५ टक्क्यांपर्यंत आला आहे. जिवामृत, बीजामृत, घनामृत आणि वाफसा या चतु:सूत्रीद्वारे आपण शाश्वत शेती करू शकतो. नैसर्गिक शेती जीवाणूची शेती आहे. हे जीवाणू हवेतून नायट्रोजन आणि जमिनीतून सूक्ष्म अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध करून देतात. नैसर्गिक शेतीमुळे पिकांना पाणी कमी लागते. रासायनिक खतांची गरज भासत नाही. पर्यावरण, पाणी, जमीन आणि गोवंशाचे संरक्षण करायचे असेल तर नैसर्गिक शेतीला पर्याय नाही. नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून भारत आत्मनिर्भर आणि विश्वगुरू बनू शकतो.

### नैसर्गिक शेतीचे क्षेत्र २५ लाख हेक्टरवर नेणार

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी नैसर्गिक शेतीविषयी लोकांना मार्गदर्शन करावे, ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इच्छा होती. राज्यात आज नगदी पिके वाढली आहेत. चारा पिके कमी झाली आहेत, त्यामुळे पशुधन घटत चालले आहे. सध्या राज्यात नैसर्गिक शेतीखालील क्षेत्र दहा लाख हेक्टर आहे. ते २०२५ पर्यंत २५ लाख हेक्टरपर्यंत घेऊन जायचे आहे. नैसर्गिक शेतीविषयी केंद्राकडून मोहीम स्वरूपात काम सुरू आहे. त्याचा फायदा राज्याला होणार आहे, असे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

# पुण्यात समाजमाध्यमांवरील ओळखीतून फसवणुकीच्या प्रकारांत वाढ

## अनोळखी व्यक्तीने मैत्रीची विनंती पाठविल्यास प्रतिसाद न देण्याचे पोलिसांचे आवाहन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** समाजमाध्यमावरील ओळखीतून सिंहगड रस्ता भागातील ज्येष्ठ महिलेची सायबर चोरट्यांनी ५७ लाख ७९ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. सायबर चोरट्यांनी परदेशातून ज्येष्ठ महिलेला दोन कोटी रुपये पाठविण्याचे आमिष दाखविले होते.

याबाबत एका ज्येष्ठ महिलेने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ज्येष्ठ महिला सिंहगड रस्ता परिसरात राहायला आहेत. ज्येष्ठ महिलेच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्यांनी संपर्क साधला होता. त्या वेळी एका चोरट्याने त्याचे नाव एरिक ब्राऊन असे सांगितले होते. परदेशात वास्तव्यास असल्याची बतावणी चोरट्यांनी केली होती. ज्येष्ठ महिलेला परदेशातून दोन कोटी रुपये भेट म्हणून पाठविण्यात येणार असल्याचे आमिष चोरट्यांनी दाखविले होते.

त्यानंतर ज्येष्ठ महिलेच्या मोबाइल क्रमांकावर आशा कुमारी नावाच्या महिलेने संपर्क साधला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियातून बोलत असल्याची बतावणी तिने केली. रिझर्व्ह बँकेशी साधर्म्य असलेला ई-मेल महिलेला पाठविण्यात आला. ज्येष्ठ महिलेला आमिष दाखवून तिला वेळोवेळी ५७ लाख ७९ हजार ३०० रुपये बँक खात्यात जमा करण्यास सांगितले.

दरम्यान, महिलेला दोन कोटी रुपयांची रक्कम पाठविण्यात आली नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने सायबर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला. त्यानंतर या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुमार घाडगे तपास करत आहेत.

### आमिषाचे जाळे

गेल्या काही वर्षांपासून समाजमाध्यमातून अनोळखी व्यक्तीशी झालेल्या मैत्रीतून फसवणूक करण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. अनोळखी व्यक्तीने मैत्रीची विनंती पाठविल्यानंतर त्याला प्रतिसाद देऊ नका, असे आवाहन पोलिसांनी वेळोवेळी केले आहे. पोलिसांनी दिलेल्या सूचनांकडे काणाडोळा करून अनेक जण आमिषांना बळी पडत आहेत.

# शकुंतला नगरकर यांना जीवनगौरव पुरस्कार

## विक्रम गोखले यांच्या हस्ते आज वितरण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड कलाकार संघाच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त विविध पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यंदाचा जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ लावणीसम्राज्ञी शकुंतला नगरकर-काळे यांना जाहीर करण्यात आला आहे.

चिंचवड येथील रामकृष्ण मोरे नाट्यगृहात शुक्रवारी (७ ऑक्टोबर) दुपारी एक वाजता ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांच्या हस्ते विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. याशिवाय, महाराष्ट्राची लोकधारा, महिलांसाठी लावणी महोत्सव, हास्यकट्टा, हिंदी-मराठी गीतांचा संगीत रजनी आदी कार्यक्रम होणार आहेत. अभिनेते माधव अभ्यंकर, सुरेखा कुडची, जयमाला इनामदार, मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले आदी उपस्थित राहणार आहेत.

अभिनेते संतोष चव्हाण, ढोलकी सम्राट राजू जावळकर, नृत्य दिग्दर्शक अर्जुन जाधव, माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, शाम जगताप यांच्यासह अनेकांना पुरस्कार दिले जाणार आहेत, असे कलाकार संघाचे अध्यक्ष विजय उलपे यांनी सांगितले.

# ‘आरपीआय’ अल्पसंख्याक आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी अ‍ॅड्. आयुब शेख

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** रिपब्लिकन पक्षातील विविध जबाबदाऱ्यांवर काम पाहिलेले अ‍ॅड. आयुब शेख यांची रिपब्लिकन पार्टी अल्पसंख्याक आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी तर ख्वाजाभाई शेख यांची सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे.



राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी या निवडीची घोषणा केली आहे.

शेख हे पुणे महापालिकेत नगरसेवक होते. तसेच मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँकेवर संचालक म्हणून पाच वेळा ते निवडून आले आहेत. आझम कॅम्पसमध्ये त्यांनी वीस वर्ष सचिव म्हणून काम पाहिले आहे.

# शहरासह जिल्ह्यातील गरजू कुटुंबांसाठी अन्नधान्याचा संच

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** गरजू कुटुंबांची दिवाळी गोड करण्यासाठी २७० रुपये किमतीच्या वस्तू केवळ १०० रुपयांत देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. त्यानुसार पुणे शहर आणि जिल्ह्यातील नऊ लाख १६ हजार ३७१ कुटुंबांना लाभ होणार आहे. हे किट बुधवारी प्रशासनाला प्राप्त होणार आहे.

राज्य सरकारकडून निविदा काढण्यात येणार असून त्यांच्याकडूनच या चारही वस्तूंचे स्वतंत्र संच तयार करून घेतले जाणार आहेत. त्यानंतर हा एकत्रित माल जिल्हा पुरवठा अधिकारी आणि अन्नधान्य वितरण विभागाच्या गोदामांमध्ये आणण्यात येणार आहे. हा संच स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत शिधापत्रिकाधारकांना देण्यात येणार आहे. प्रत्येक शिधापत्रिकेवर एक संच याप्रमाणे त्याचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सुरेखा माने यांनी दिली.

# जिल्ह्यात २४ जणांना नव्याने करोना संसर्ग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** गुरुवारी दिवसभरात जिल्ह्यातील २४ जणांना करोना संसर्गाचे निदान झाले. राज्याच्या साथरोग सर्वेक्षण विभागाने याबाबत माहिती दिली. मात्र, बहुसंख्य करोना रुग्णांना सौम्य लक्षणे असून ते घरच्या घरी बरे होत असल्याने घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

गुरुवारी दिवसभरात आढळलेल्या २४ नवीन रुग्णांपैकी १५ रुग्ण पुणे महापालिका क्षेत्रातील आहेत. सहा रुग्ण पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात, तर तीन रुग्ण जिल्ह्याच्या उर्वरित भागात आढळले आहेत. संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी विशेषतः जोखीम गटातील रुग्ण, सहव्याधीग्रस्त आणि ज्येष्ठ नागरिकांनी तसेच लसीकरण न झालेल्या नागरिकांनी मुखपट्टी वापरासह सर्व आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. गुरुवारी आढळलेल्या २४ नव्या रुग्णांमुळे पुणे जिल्ह्यातील एकूण करोना रुग्णसंख्या १५ लाख दोन हजार ३२६ एवढी झाली आहे. सध्या जिल्ह्यातील ७०१ रुग्णांवर करोनाचे उपचार सुरू आहेत.

**टाटा कॅपिटल फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड**
TATA
नोंदणीकृत कार्यालय : टॉवर ए, ११वा मजला, पेनिनसुला बिझीनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०००१३

प्रति, तारीख : ०७ ऑक्टोबर २०२२

१. श्री. श्रीनिवास नंदकिशोर लड्डा,
फ्लॅट नं. ३०६, तिसरा मजला, एच-१, गंगाधाम फेज-२, मार्केट यार्ड, पुणे-४११०३७.
येथे सुद्धा : द्वारा - दिपाली ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस अँड टूर्स अँड ट्रॅव्हल्स, शॉप नं. २०, सर्व्हे नं. ३०/३११, सुमित प्लाझा, मार्केट यार्ड, पुणे-४११०३७.
२. श्रीमती वंदना श्रीनिवास लड्डा,
फ्लॅट नं. ३०६, तिसरा मजला, एच-१, गंगाधाम फेज-२, मार्केट यार्ड, पुणे-४११०३७.
येथे सुद्धा : द्वारा - दिपाली ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस अँड टूर्स अँड ट्रॅव्हल्स, शॉप नं. २०, सर्व्हे नं. ३०/३११, सुमित प्लाझा, मार्केट यार्ड, पुणे-४११०३७.
३. मेसर्स उज्वल मोटर्स, तिचे मालक द्वारा
फ्लॅट नं. ३०६, तिसरा मजला, एच-१, गंगाधाम फेज-२, मार्केट यार्ड, पुणे-४११०३७.
येथे सुद्धा : द्वारा - दिपाली ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस अँड टूर्स अँड ट्रॅव्हल्स, शॉप नं. २०, सर्व्हे नं. ३०/३११, सुमित प्लाझा, मार्केट यार्ड, पुणे-४११०३७.
४. मेसर्स दिपाली ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस अँड टूर्स अँड ट्रॅव्हल्स - तिचे मालक द्वारा
फ्लॅट नं. ३०६, तिसरा मजला, एच-१, गंगाधाम फेज-२, मार्केट यार्ड, पुणे-४११०३७.
येथे सुद्धा : द्वारा - दिपाली ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस अँड टूर्स अँड ट्रॅव्हल्स, शॉप नं. २०, सर्व्हे नं. ३०/३११, सुमित प्लाझा, मार्केट यार्ड, पुणे-४११०३७.

**विषय : स्थावर सुरक्षित मत्तेच्या विक्रीकरिता सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ९(१) व नियम ८(८) अंतर्गत सूचना**

प्रिय महोदय / महोदया,

मेसर्स टाटा कॅपिटल फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडच्या (यापुढे "सुरक्षित धनको" म्हणून संदर्भित) वतीने प्राधिकृत अधिकारींनी त्यातील विनिर्दिष्ट कालावधीच्या आत संपूर्ण देणींच्या प्रदानाकरिता तुम्हा प्रेषितींवर फर्माविणारी, वित्तिय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचनेच्या कलम १३(२) आणि सुरक्षा हीत कायदा, २००२ (यापुढे "कायदा" म्हणून संदर्भित) अंमलबजावणी अंतर्गत तुमच्या प्रॉपर्टी अकाउंट नं. ७४१०९५३ अनुसार कर्ज या संबंधित तुमच्यावर दिनांकित १४ नोव्हेंबर, २०१९ मागणी सूचना निर्गमित करण्यात आली होती.

विनिर्दिष्ट कालावधीच्या आत उक्त सूचनेचे अनुपालन करण्यास प्रेषिती असमर्थ ठरले आहेत, त्यामुळे प्राधिकृत अधिकारींनी ०४ जुलै, २०२२ रोजी सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २०२२च्या नियम ८ यासह वाचलेल्या कलम १३च्या पोट-कलम (४) अंतर्गत स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे :

**मालमत्तेची अनुसूची**

पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- फ्लॅट नं. ३०६, सुमारे मोजमापाचा ७१.३७ चौ.मी., "गंगाधाम (फेज-२) गृहकुल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित"मधील गंगाधाम फेज-२ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील बिल्डिंग नं. एच-१ मधील तिसऱ्या मजल्यावरील, ज्याचे बांधकाम जमीन सुमारे मोजमापाची २५५४३ चौ.मी. यावर करण्यात आलेले आहे, मालमत्तेपैकी धारण केलेला सर्व्हे नं. ६१२, हिस्सा नं. ८+९, सर्व्हे नं. ६१५, हिस्सा नं. १/१, सर्व्हे नं. ६१५, हिस्सा नं. १/२, सर्व्हे नं. ६१५, हिस्सा नं. २ ते ८/१, असलेला तत्सम सीटीएस नं. ३९४, ३९५, ३९९, येथे स्थित- रिव्हेन्यू व्हिलेज मुंजेरी बिबवेवाडी, ता. हवेली, जि. पुणे, जी पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या स्थानिक मर्यादेत स्थित व नोंदणी जिल्हा, उप-निबंधक हवेली, जि. पुणेच्या अधिकारितेतील.
खालीलप्रमाणे सिमित: पूर्व- एफ-४, पश्चिम- एफ-१, उत्तर- रोड, दक्षिण- इंटरनल रोड

प्राधिकृत अधिकारीद्वारा सुरक्षित धनकोने पूर्वोक्त गहाणवट मालमत्तेच्या विक्रीकरिता दोन वेळा जाहीर लिलाव सूचना निर्गमित केल्या होत्या. पहिली जाहीर लिलाव सूचना निर्गमित केली होती. त्यात तुम्हास सांगण्यात आले होते की जर कलम १३(२) अंतर्गत सूचनेमध्ये मागणी केल्यानुसार संपूर्ण रकमेचे तुमच्याद्वारा प्रदान न केल्यास, सुरक्षित धनको २५ जानेवारी, २०२१ रोजी गहाणवट मालमत्तेची विक्री जाहीर लिलावाद्वारा करतील. सुरक्षित धनकोने पहिल्या लिलावाच्या बाबत कोणत्याही बोली स्वीकारल्या नाहीत. सुरक्षित धनकोने नंतर दुसरी लिलाव विक्री सूचना

निर्गमित केली. त्यात तुम्हास असे सांगण्यात आले होते की जर तुमच्याद्वारा कलम १३(२) अंतर्गत सूचनेमध्ये मागणी केल्यानुसार संपूर्ण रकमेचे प्रदान न केल्यास, सुरक्षित धनको गहाणवट मालमत्तेची विक्रि २६ मार्च, २०२१ रोजी जाहीर लिलावाद्वारा करतील. सुरक्षित धनकोने दुसऱ्या लिलावाबाबत सुद्धा कोणत्याही बोली स्वीकारल्या नाही.

आता, सुरक्षित धनकोने सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या पोट-नियम ८ व नियम ८च्या तरतुदीसह आणि खाजगी कराराद्वारा रु. ४९,००,०००/- (रुपये एकोणपन्नास लाख फक्त) करिता सुरक्षित मत्तेच्या खरेदीकरिता भावी खरीददाराकडून प्रस्ताव स्वीकारले आहेत.

वरील परिस्थितीवर प्रकाश टाकता सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८ व ९ अंतर्गत सद्य सूचना तुम्हास निर्गमित करण्यात येत आहे, जेथे सुरक्षित धनकोद्वारा सद्य सूचनेच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत लागू पुढील लागू व्याज व आकार यासह १४ नोव्हेंबर २०१९ रोजी प्रमाणे रु. १,१३,७१,०२३/- (रुपये एक कोटी तेरा लाख एकाहत्तर हजार तेवीस फक्त) या रकमेचा भरणा करण्याकरिता तुम्हास पुन्हा एकदा फर्माविण्यात येत आहे, त्यास असमर्थ ठरल्यास प्राधिकृत अधिकारीना वर नमूद केल्यानुसार खाजगी व्यवहाराद्वारा गहाणवट मालमत्तेची विक्री प्रक्रिया करण्याकरिता स्वातंत्र असेल.

आपला स्नेहांकित,
प्राधिकृत अधिकारी
टाटा कॅपिटल फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड
आयरिझ टॉवर, ९वा मजला,
बाणेर-पाषाण लिंक रोड, बाणेर, पुणे-४११०२१

तारीख : ०७ ऑक्टोबर २०२२
स्थळ : पुणे

# ‘आठवणीतल्या शांताबाई’ कार्यक्रमातून रविवारी स्मृतींचा जागर

**पुणे :** आपल्या लेखणीने मराठी साहित्याचे दालन समृद्ध करणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सांगता १२ ऑक्टोबर रोजी होत आहे. त्या निमित्ताने कलांगण, मुक्तछंद आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या वतीने रविवारी (९ ऑक्टोबर) ‘आठवणीतल्या शांताबाई’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे सकाळी साडेआठ वाजता होणाऱ्या कार्यक्रमात शांत शेळके यांच्या समग्र साहित्याचा आढावा घेण्यात येणार असून त्यांची लोकप्रिय गाणी सादर करण्यात येणार आहेत. तसेच दृक-श्राव्य माध्यमातून शांताबाई यांच्यासह काही मान्यवर भेटीला येणार आहेत. या कार्यक्रमाची संकल्पना आणि निर्मिती चैत्राली अभ्यंकर यांची आहे.कार्यक्रमाच्या पूर्वार्धात मुक्तछंद संस्थेच्या वतीने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा डॉ. अरुणा ढेरे यांच्या हस्ते प्रसिद्ध कवी-गीतकार गुरू ठाकूर यांना शांता शेळके स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. प्रसिद्ध कवी प्रवीण दवणे आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी या वेळी उपस्थित राहणार आहेत. उत्तरार्धात शांताबाईंची लोकप्रिय गीते चैत्राली अभ्यंकर, संजीव मेहेंदळे आणि हेमंत वाळुंजकर सादर करणार आहेत.

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
**ई-निविदा सूचना**
नं. ०८/२०२२/बॉयलर अॅण्ड ईटीपी/डीडी
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि करिता विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे खालील कामांकरिता नामांकित फर्म्स / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवीत आहेत. **ठिकाणासह कामाचे नाव :** खुली निविदा तत्त्वावर सोलापूर विभागाच्या दौंड येथील ईटीपी प्लान्टच्या सर्व विद्युत कनेक्शन्ससह फॅब्रीकेशन व इफ्लुअंट ट्रिटमेंट प्लान्टचा (२००० लि. / दिवस क्षमता) पुरवठा आणि आरओएच डेपो, दौंडची १००० किग्रॅ/एच (एनर्जी पॅक मेक), २ टीपीएच क्षमतेच्या ऑइल फायर्ड स्टिम बॉयलर नं. ईबीपीएल-०२७२ चे संधारण व दुरुस्तीच्या कंत्राट कामाकरिता निविदा. **कामाचा अदमासे खर्च :** रु. ३२,४२,५२८.६६. **इरठे रक्कम :** रु. ६४,९००.००. **कार्यालयाचा पत्ता :** विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, यांत्रिक शाखा, मध्य रेल्वे, सोलापूर. **कामाचा पूर्तता कालावधी :** स्वीकृती पत्राच्या निर्गमनाच्या तारखेपासून चार महिने. **निविदेची अपलोडींग बंद होण्याची तारीख व वेळ :** ३१.१०.२०२२ रोजी दु.१२.०० वा. **निविदा उघडण्याची अपेक्षित तारीख व वेळ :** ३१.१०.२०२२ रोजी दु.१२.३० वा. **वेबसाइट तपशील :** www.ireps.gov.in
सीनि. डीएमई, सोलापूर
रेल मदत हेल्पलाइन : १३९ SLP-30

# बायोपॉलिमर्समधील संशोधनासाठी ‘प्राज’ आणि ‘आयसीटी’मध्ये सामंजस्य करार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** भारतात बायोपॉलिमर्ससाठी नव्या केंद्राच्या उभारणीसाठी प्राज इंडस्ट्रीज आणि आयसीटीने पुढाकार घेतला आहे. बायोपॉलिमर्स उत्कृष्टता आणि नवोपक्रम केंद्राच्या (सेंटर ऑफ एक्सलन्स अ‍ॅण्ड इनोव्हेशन फॉर बायोपॉलिमर्स) उभारणीसाठी प्राज इंडस्ट्रीज (प्राज) चे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी आणि आयसीटीचे कुलगुरू प्रा. अनिरुद्ध पंडित यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

कृषी संशोधनातून तयार केला जाणारा बायोपॉलिमर हा प्लास्टिकला टिकाऊ पर्याय ठरणे शक्य आहे. जैवविघटनशील असल्याने तो पर्यावरण रक्षणातही महत्त्वाचे योगदान देणारा ठरणार आहे. ‘परिमल आणि प्रमोद चौधरी सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनोव्हेशन फॉर बायोपॉलिमर्स’ या केंद्रामध्ये बायोपॉलिमर वैशिष्ट्यीकरण, प्रक्रिया आणि बदल यासाठी नवीन पद्धती आणि मानके विकसित करण्यासाठी अत्याधुनिक प्रयोगशाळा असेल. वैद्यकीय आणि सौंदर्यप्रसाधन क्षेत्रात बायोपॉलिमरचा वापर वाढवण्याबरोबरच पॅकेजिंग, खाद्यपदार्थ, ग्राहकोपयोगी वस्तू, कृषी, कापड, इलेक्ट्रॉनिक्स, ऊर्जा साठवणूक अशा क्षेत्रांमध्येही त्याचा वापर सुरू करण्याचा या केंद्राचा मानस आहे.

प्राजचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी म्हणाले, जग हवामान बदलाच्या संकटाशी झुंजत आहे आणि शाश्वत विकासासाठी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान उपायांची आवश्यकता आहे. बायोपॉलिमरची प्रचंड क्षमता वापरून कार्बोहायड्रेट-आधारित अर्थव्यवस्थेकडे संक्रमणाचा वेग वाढवण्याचा आमचा मानस आहे. आयसीटी मुंबईचे कुलगुरू प्रा. अनिरुद्ध पंडित म्हणाले, जैविक उत्पत्ती आणि जैव विघटन करण्यायोग्य अशा दोन्ही नूतनीकरणीय पॉलिमर हे भविष्य आहे. यासाठी आयसीटी आणि प्राज यांची युती होणे कौतुकास्पद आहे. दोन्हींच्या एकत्रित प्रयत्नांतून बायोपॉलिमरच्या क्षेत्रात दीर्घकालीन काम करणे शक्य असल्याची भावना प्रा. पंडित यांनी व्यक्त केली.

# खंडेरायाच्या जेजुरीनगरीत १८ तासांचा मर्दानी दसरा

**लोकसत्ता वार्ताहर**

**जेजुरी :** मध्यरात्रीचे चांदणे, हवेतील गारवा, आकाशाकडे मुक्तपणे झेपावणाऱ्या विविध छटांच्या रंगीत तोफा, दऱ्याखोऱ्यात घुमणारा फटाक्यांचा जबरदस्त आवाज, भाविकांच्या आनंदाला आलेले उधाण आणि ‘येळकोट येळकोट जय मल्हार’ ही घुमणारी ललकारी अशा भारलेल्या वातावरणात कडेपठारच्या डोंगरामध्ये जेजुरीचा मर्दानी दसरा १८ तास रंगला.

कडेपठारच्या डोंगरातील देवांची पालखी आणि दरीतील रमणा या ठिकाणी आणलेली खंडोबा गडातील पालखी यांची मध्यरात्री अडीच वाजता भेटाभेट झाली. मानकरी राऊत यांनी देवांना आरसा दाखविला. बुधवारी सायंकाळी सहा वाजता मुख्य पेशवे इनामदार राजाभाऊ पेशवे ,सचिन पेशवे यांनी आदेश देताच सनई-ढोल वाजून शेडा देण्यात आला. मानकऱ्यांनी पालखी उचलून खांद्यावर घेतली. मंदिर प्रदक्षिणा करून आल्यावर पालखीमध्ये पुजारी-सेवकांनी खंडोबा म्हाळसादेवीच्या उत्सव मूर्ती पालखीत ठेवल्या. पालखी सीमोल्लंघनासाठी वाजत-गाजत निघाली, या वेळी भाविकांनी भंडाऱ्याची प्रचंड उधळण केल्याने सारा गड सोनेरी झाला. ‘सदानंदाचा येळकोट’ अशा जयघोषात पालखी खंडोबा गडाच्या बाहेर आली. नंतर दरीतील रमणा या ठिकाणी पालखी नेण्यात आली.

कडेपठार या देवाच्या मूळ ठिकाणापासून रात्री नऊ वाजता तेथील देवांची स्वारी निघाली.

सनई, ढोलीबाजा, शंख ,डमरू ,संबळ अशी पारंपारिक वाद्ये वाजवीत फटाक्यांची आतषबाजी करीत पालखी भेटाभेटीसाठी पुढे निघाली. मानकरी सुभाष राऊत यांच्या परिवाराने तयार केलेले हवाई नळे, दिवट्या पेटवून उजेड केला जात होता, अवघड वळणे, उंच डोंगर, चढ उतार पार करताना खांदेकऱ्याचे कस पणाला लागले. सुसरटिंगी ही अवघड टेकडी पार करताना खांदेकऱ्यांनी हाताची साखळी करून हा अवघड टप्पा पार करताना मर्दानी दसरा साऱ्यांना अनुभवायला मिळाला.

पालखीने सकाळी सात वाजता खंडोबा गडामध्ये प्रवेश केला. लोककलावंतांनी देवासमोर जुन्या लावण्या, देवांची गाणी सादर केली. पालखी नाचवण्यात आली. त्यानंतर मूर्तींचा ज्वारीच्या धान्याला स्पर्श करून हे धान्य (रोजमारा) पेशव्यांच्या हस्ते सर्वांना वाटण्यात आले.

### खंडा उचलणे स्पर्धेत अमोल खोमणे प्रथम

खंडोबा गडावर झालेल्या खंडा उचलणे स्पर्धेत अमोल खोमणे यांनी, तर खंडा कसरतीमध्ये सचिन कुदळे यांनी प्रथम क्रमांक पटकाविले. खंडोबा देवस्थानचे मुख्य विश्वस्त तुषार सहाणे, शिवराज झगडे, पंकज निकुडे पाटील, प्रसाद शिंदे, संदीप जगताप ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, सोमनाथ उबाळे, कृष्णा कुदळे या वेळी उपस्थित होते.

## थायलंडमध्ये पाळणाघरात गोळीबार

# २४ चिमुरड्यांसह ३६ बळी

**पीटीआय, बँकॉक**

**ईशान्य थायलंडमधील** एका शहरातील पाळणाघरात झालेल्या गोळीबारात २४ मुलांसह ३६ जणांचा मृत्यू झाला. माजी पोलीस अधिकारी असलेल्या हल्लेखोराने स्वतःच्या कुटुंबाचीही हत्या करून आत्महत्या केली.

पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, नाँगबुआ लम्फू शहरातील पाळणाघरात स्थानिक वेळेनुसार दुपारी १२.३० वाजता हल्लेखोर शिरला. पानिआ कामराप (३४) असे त्याचे नाव असून अमलीपदार्थांशी संबंधित गुन्ह्यात त्याची पोलीस दलातून गतवर्षी हकालपट्टी झाली होती. पाळणाघरात गोळीबार आणि काही जणांवर चाकूचे वार केल्यानंतर हल्लेखोराने तिथून पळ काढला. गोळीबार करतच आपल्या गाडीतून घरी गेला. रस्त्यावरील काही जणांनाही गोळ्या लागल्या. घरी गेल्यानंतर मुलगा आणि पत्नीची गोळ्या झाडून हत्या केल्यानंतर त्याने स्वतःवर गोळी झाडत आत्महत्या केली.

पाळणाघरात १९ मुले, ३ मुली आणि २ प्रौढ व्यक्तींचा मृत्यू झाला. याखेरीज हल्लेखोर आणि त्याच्या कुटुंबासह १२ जणांचा बळी गेल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या हल्ल्यामध्ये हँडगन, शॉटगन, पिस्तुल आणि चाकू अशा वेगवेगळ्या हत्यारांचा वापर झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

गेल्या काही वर्षांत थायलंडमध्ये अशा घटनांमध्ये वाढ होते आहे. २०२० मध्ये नाखोन राचासिमा शहरात एका मॉलमध्ये झालेल्या गोळीबारात २९ जणांचा मृत्यू झाला होता. तब्बल १६ तासांच्या ओलिसनाट्यानंतर पोलिसांनी हल्लेखोराला ठार केले.

गेल्याच महिन्यात थायलंडच्या लष्करी महाविद्यालयात एका कारकुनाने आपल्या दोन सहकाऱ्यांची गोळ्या झाडून हत्या केली होती.



### हृदयद्रावक...

हल्ल्यानंतर पाळणाघरातील दृश्य हृदयद्रावक होते. चिमुरड्यांना झोपण्यासाठी असलेल्या चटया, चित्रे, रंगीबेरंगी भिंती रक्ताने भरून गेल्या होत्या. एका मृत शिक्षिकेच्या हातामध्ये बाळ होते... घटनास्थळी धाव घेतलेल्या पालकांचा अनावर झालेला शोक हृदय पिळवटून टाकणारा होता.

# फ्रेंच लेखिका ॲनी अर्नो यांना साहित्याचे नोबेल

**पीटीआय, स्टॉकहोम**

**फ्रेंच लेखिका** आणि साहित्याच्या प्राध्यापिका ॲनी अर्नो यांना यंदाचा साहित्याचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. 'व्यक्तिगत स्मरणशक्तीचे मूळ, त्यातील विसंगती आणि सामूहिक प्रतिबंध उलगडण्यासाठी दाखवलेले धैर्य आणि चिकित्सक वृत्ती' यासाठी अर्नो यांना गौरवण्यात येत असल्याचे स्वीडिश अकॅडमीने जाहीर केले.

अर्नो (८२) यांनी आपल्या लेखनाची सुरुवात आत्मकथनपर कादंबऱ्यांनी केली. मात्र कालांतराने त्यांनी स्मरणशक्तीपर लेखन सुरू केले. त्यांची २०पेक्षा जास्त पुस्तके ही छोटी आणि त्यांच्या किंवा आसपासच्या व्यक्तींच्या जीवनातील घटना सांगणारी आहेत. लैंगिक संबंध, गर्भपात, आजारपण, आईवडिलांचा मृत्यू अशा घटनांचे चित्र त्यातून उभे राहते. त्यांच्या २००८ साली प्रसिद्ध झालेल्या आणि सर्वाधिक गाजलेल्या 'द इयर्स' या आत्मकथनपर लेखनात दुसऱ्या महायुद्धानंतर फ्रान्समधील समाजाची स्थित्यंतरे त्या विशद करतात. या पुस्तकाची खासियत अशी की यामध्ये प्रथमच त्यांनी नायिकेचा उल्लेख तृतीयपुरुषी केला. आतापर्यंतच्या कादंबऱ्यांमध्ये त्या 'मी' असे लिहीत असत. 'द इयर्स'मध्ये त्यांनी 'ती'ची कहाणी सांगितली. या आठवड्यात नोबेल पुरस्कारांची घोषणा करण्यात येत असून शुक्रवारी 'शांतता पुरस्कार' जाहीर होणार आहे.

> ॲनी अर्नो यांचे लेखन कोणत्याही तडजोडीशिवाय आणि थेट भाषेत आहेत. त्यांचे लेखन हे प्रशंसनीय आणि दीर्घकाळ टिकणारे असे आहे.
>
> **- अँड्रेस ओल्सन,** अध्यक्ष, साहित्य नोबेल समिती



### लेखिकेविषयी...

पूर्वाश्रमीच्या ॲनी डचेन्स यांचा जन्म १ सप्टेंबर १९४० रोजी फ्रान्समधील लिलिबोन इथे झाला. त्यांचे बालपण नॉर्मंडी येथील येटोट इथे गेले. शिक्षक होण्याची पदवी घेतल्यानंतर त्यांनी साहित्यामध्ये उच्चशिक्षण घेतले. त्यानंतर अनेक वर्षे त्यांनी विद्यापीठात साहित्यामध्ये अध्यापनाचे काम केले. 'द इयर्स' या पुस्तकासाठी २०१९ साली ॲनी अर्नो यांना आंतरराष्ट्रीय बुकर पुरस्कारासाठी नामांकन होते.

# महापौरांसह २० जणांची गोळ्या झाडून हत्या

## मेक्सिकोमध्ये हल्लेखोरांचा बेछूट गोळीबार

**पीटीआय, मेक्सिको सिटी**

**मेक्सिकोच्या गुएरेरो** राज्यात बुधवारी एका कार्यक्रमादरम्यान झालेल्या गोळीबारात शहराचे महापौर आणि त्यांच्या वडिलांसह २० जणांचा मृत्यू झाला, अशी माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली.

स्थानिक वेळेनुसार बुधवारी सॅन मिगुल तोतोलापान शहरातील एका सभागृहात कार्यक्रम सुरू होता. त्यावेळी काही हल्लेखोरांनी व्यासपीठाच्या दिशेने गोळीबार सुरू केला. यात शहराचे महापौर कोनार्डो मेंडोसा अल्मेडा, माजी महापौर असलेले त्यांचे वडील आणि अन्य १६ जणांचा जागीच मृत्यू झाला. सूत्रांच्या माहितीनुसार अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या 'लॉस टकिलेरोस' या टोळीने हा हल्ला केला असण्याची शक्यता आहे. हल्ल्यापूर्वी या टोळीच्या सदस्यांनी आपण गुएरेरोमध्ये परतल्याची एक चित्रफीत समाजमाध्यमांवर टाकली होती. म्होरक्या ठार झाल्यानंतर गेली ५-६ वर्षे ही टोळी निष्क्रिय होती.



### महापौर लक्ष्य

मेक्सिकोचे विद्यमान अध्यक्ष अँड्रेस मॅन्युएल लोपेझ ओब्राडोर यांच्या कार्यकाळात आतापर्यंत १८ महापौर आणि आठ लोकप्रतिनिधींची हत्या झाली आहे. सुरक्षेसाठी लोपेझ ओब्राडोर यांची भिस्त लष्करावर असून त्यामुळे स्थानिक पोलिसांचे पंख छाटले गेल्याचा आरोप होत आहे.

# अपहरण झालेल्या शीख कुटुंबाची अमेरिकेत हत्या

**पीटीआय, लॉस एंजेलिस**

**अमेरिकेच्या** कॅलिफोर्नियामध्ये चार दिवसांपूर्वी अपहरण झालेल्या शीख कुटुंबाची हत्या झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मृतांमध्ये ८ महिन्याच्या बाळाचाही समावेश आहे. या घटनेनंतर पंजाबमधील त्यांच्या मूळ गावी संतापाची भावना व्यक्त होत असून पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनीही सखोल चौकशीची मागणी केली आहे.

कॅलिफोर्नियाच्या मर्सेड काऊंटीमध्ये नव्याने ट्रकच्या व्यवसायात उतरलेले जसदीप सिंग, त्यांचे मोठे बंधू अमरदीप सिंग, जसदीप यांची पत्नी जसलीन कौर आणि ८ महिन्यांचे बाळ आरुही यांचे अपहरण करण्यात आले होते. त्यांचा शोध सुरू असताना गुरुवारी जवळच असलेल्या फळबागेमध्ये चौघांचे मृतदेह आढळून आले. अपहरणाची सीसीटीव्ही चित्रफीत पोलिसांच्या हाती लागली असून पैशांसाठी त्यांची हत्या करण्यात आल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अपहृतांपैकी एकाचे एटीएम कार्ड अपहरणाच्या घटनेनंतर वापरण्यात आले होते. सिंग कुटुंबीयांनी मात्र आपल्या कार्यालयातून कसलीही चोरी झाली नसल्याचे म्हटल्यामुळे हत्येच्या कारणाबाबत संशय बळावला आहे.

पोलिसांनी आरोपी जिजस मॅन्युअल सल्गाडो याला यापूर्वीच अटक केली असून आत्महत्येच्या प्रयत्नात जखमी झाल्यानंतर त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### चौकशीची मागणी

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी या घटनेबाबत तीव्र संतापाची भावना व्यक्त केली. केंद्र सरकारने अमेरिकेच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून या प्रकरणाची योग्य चौकशी करण्यास सांगावे, अशी मागणी त्यांनी केली. परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनीही या प्रकरणात लक्ष घालावे, असे आवाहनही मान यांनी केले.

# 'भारत जोडो' यात्रेमध्ये सोनिया गांधी यांचा सहभाग

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी यांच्या बुटाची लेस बांधत असलेले राहुल गांधी यांचे 'भारत जोडो' यात्रेतील छायाचित्र शुक्रवारी व्हायरल झाल्यानंतर, सोनिया व राहुल गांधी यांच्या एकत्रित सहभागाचा कर्नाटकसह अन्य राज्यांतील आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसला किती लाभ होऊ शकेल, याची चर्चा सुरू झाली आहे.

या चर्चेकडे भाजपलाही लक्ष द्यावे लागले असून 'यात्रेमध्ये सोनिया फक्त अर्धा तास सहभागी झाल्या होत्या, या यात्रेमुळे निवडणुकीच्या निकालावर कोणताही परिणाम होणार नाही,' असा दावा कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई तसेच, केंद्रातील भाजपचे नेतेही करत आहेत. 'भारत जोडो' यात्रेला लोकांचा फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. यात्रा काढून काँग्रेस घाम गाळत असल्याचे दिसत असले तरी, त्याचा काँग्रेसला राजकीय फायदा होण्याची शक्यता नाही,' असा दावा भाजपच्या राष्ट्रीय महासचिवांनी केला.

काँग्रेसची 'भारत जोडो' यात्रा सध्या कर्नाटकमध्ये असून दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर शुक्रवारी मंड्या जिल्ह्यातून यात्रा पुन्हा सुरू झाली. सकाळी साडेआठ वाजता सोनिया गांधी यात्रेमध्ये सहभागी झाल्या, सुमारे एक किमी अंतर चालल्यानंतर, राहुल गांधी यांनी सोनियांना सकाळच्या टप्प्यातील उर्वरित यात्रा कारमधून पूर्ण करण्याची विनंती केली. काही वेळानंतर, सोनियांनी पुन्हा दोन किमीची पदयात्रा केली. यात्रेमध्ये सोनिया गांधी जेमतेम अर्धा तास सहभागी होणार होत्या; पण त्यांनी दोन तास पदयात्रा केली, अशी माहिती काँग्रेसकडून देण्यात आली.



**खरगे अनुपस्थित**

काँग्रेसच्या पक्षाध्यक्ष पदाच्या निवडणुकीतील उमेदवार मल्लिकार्जुन खरगे कर्नाटकमध्ये असून ते सोनिया व राहुल यांच्यासह 'भारत जोडो' यात्रेमध्ये सहभागी होतील, असे सांगितले जात होते. मात्र, शुक्रवारी खरगे यात्रेमध्ये दिसले नाहीत.

# 'वंदे भारत' एक्स्प्रेसची म्हशींच्या कळपाला धडक



**अहमदाबाद :** गेल्याच आठवड्यात सुरू झालेल्या 'वंदे भारत' एक्स्प्रेसने गुरुवारी सकाळी गुजरातमध्ये वाटवा व गैतापूरदरम्यान म्हशींच्या कळपाला धडक दिली. या अपघातात गाडीच्या इंजिनचे आणि पुढील भागाचे नुकसान झाले आहे.

मुंबई सेंट्रल ते गांधीनगर या दरम्यान धावणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेसचे ३० सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकार्पण केले. अतिवेगवान धावणारी ही एक्स्प्रेस गुरुवारी सकाळी मुंबई सेंट्रल येथून सुटली. सकाळी ११.१५ वाजता गैतापूर आणि वाटवा या स्थानकांदरम्यान रुळांवर आलेल्या म्हशींच्या कळपाला या एक्स्प्रेसने जोरदार धडक दिली. त्यामुळे एक्स्प्रेसच्या इंजिनच्या पुढील भागाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. नुकसान झालेला भाग दुरुस्त करून ही गाडी गांधीनगर स्थानकाकडे रवाना झाली. या अपघातात कोणत्याही प्रवाशाला इजा झाली नाही, अशी माहिती पश्चिम रेल्वेचे प्रवक्ते जितेंद्र कुमार यांनी दिली.

# भारतीय औषधामुळे आफ्रिकेत मुलांचा मृत्यू?

## हरियाणा सरकारकडून चौकशी सुरू

**नवी दिल्ली :** भारतीय कंपनीने तयार केलेल्या खोकल्याच्या औषधामुळे पश्चिम आफ्रिकेतील गाम्बिया या देशात ६६ मुलांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. जागतिक आरोग्य संघटनेने ही शंका उपस्थित केल्यानंतर हरियाणा सरकारने या औषधाचे नमुने प्रयोगशाळेत पाठवले आहेत.

जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, गाम्बियामधील बालकांच्या मृत्यूचा तपास करताना किमान चौघांच्या नमुन्यांमध्ये दूषित आणि कमी दर्जाचे खोकल्याचे औषध आढळून आले आहे. हे औषध हरियाणाच्या सोनिपतमधील मेडन फार्मास्युटिकल्स कंपनीने तयार केले आहे. याबाबत माहिती मिळताच कंपनीतील औषधाचे नमुने कोलकाता येथील केंद्रीय औषध प्रयोगशाळेत पाठवण्यात आल्याचे हरियाणाचे आरोग्यमंत्री अनिल वीज यांनी सांगितले. या कंपनीमार्फत बनवण्यात येणाऱ्या औषधांना केवळ निर्यातीची परवानगी असून भारतात औषधे विकली जात नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कंपनीने आतापर्यंत केवळ गाम्बियामध्येच निर्यात केली असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

### अपुरी माहिती?

जागतिक आरोग्य संघटनेने गाम्बियातील सर्व ६६ मृत्यूंबाबत व्यक्तिगत माहिती दिली नसल्याचे सूत्रांनी सांगितले. केवळ चार नमुन्यांचे परीक्षण अहवाल देण्यात आले असून त्याआधारे भारतात तपासाला मर्यादा आहेत. मात्र प्राथमिक चौकशी म्हणून औषधांचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. प्राथमिक तपासणीत कंपनीकडे औषध निर्मिती आणि निर्यातीचे सर्व परवाने असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

# दीड वर्षाच्या बाळाला भाषणात खेचणे, हे हिंदुत्वात बसते का?

## खासदार श्रीकांत शिंदे यांचे उद्धव ठाकरेंना खुले पत्र

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**ठाणे :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी शिवाजी पार्कवरील सभेतील भाषणादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दीड वर्षाच्या नातू रुद्रांश याच्याबद्दल केलेल्या विधानानंतर राजकारण तापू लागले आहे. एका दीड वर्षाच्या मुलाबद्दल अपशब्द वापरणे, हे कोणत्या धर्मात आणि कोणत्या ग्रंथात लिहिले आहे, असा प्रश्न उपस्थित करत शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. त्याचबरोबर कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना उद्देशून समाजमाध्यमावर प्रसारित केलेल्या पत्रात एका दीड वर्षाच्या अजाण बाळाला आपल्या भाषणात खेचणे, हे तुमच्या धगधगत्या हिंदुत्वात बसते का? अशी विचारणा करत प्रश्नांची सरबत्ती केली आहे.

बाप मंत्री, कार्ट खासदार आणि त्यांच्या नातवाचा नगरसेवकपदावर डोळा, असे उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना उद्देशून विधान केले असून या विधानाचा शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी समाचार घेत उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांनी सभेमध्ये राम मंदिर, धर्मांतर तसेच हिंदुत्वाच्या इतर मुद्द्यांवर कोणते विचार मांडले, असा प्रश्न उपस्थित करत लहान मुलाबाबत अपशब्द वापरणे, हे कोणत्या धर्मात आणि ग्रंथात बसते, अशी विचारणा म्हस्के यांनी केली आहे. शिशुपालाचे जे काही अपराध झाले, ते संपविण्यासाठी श्रीकृष्णाने जन्म घेतला. मग, आम्ही त्या लहान मुलाला श्रीकृष्ण म्हणायचे का, असा प्रश्नही त्यांनी विचारला. आपल्या तो बाब्या आणि दुसऱ्याचा तो कार्टा का, अशी विचारणाही त्यांनी या वेळी केली. तर, कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना उद्देशून समाजमाध्यमावर एक पत्र प्रसारित केले असून त्यात एका दीड वर्षाच्या अजाण बाळाला आपल्या भाषणात खेचणे, हे तुमच्या धगधगत्या हिंदुत्वात बसते का? असा प्रश्न खासदार शिंदे यांनी उपस्थित केला आहे. तसेच मुख्यमंत्री असताना स्वतःला 'कुटुंबप्रमुख' म्हणवत होतात ना? मग कुटुंबप्रमुख असा कोवळ्या जीवांचा बाजार मांडणारा असतो? दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कुठे आणि तुम्ही कुठे. बाळासाहेबही विरोधकांवर जळजळीत टीका करायचे, पण त्यांनी असली हीन व गलिच्छ टिप्पणी कधीही केली नाही, अशी टीकाही त्यांनी केली आहे. एका माजी मुख्यमंत्र्याच्या तोंडी ही असली भाषा. पद वगैरे जाऊ द्या. कुठलाही सुसंस्कृत माणूस, संवेदनशील माणूस असे बोलू शकतो? बोलणे सोडाच, असा विचार करू शकतो? मनाला किती वेदना देणारे आहे हे. आणि या पत्रात जी वेदना मी मांडली आहे, तीच भावना राज्यातील प्रत्येक बापाची असणार यात मला तरी शंका नाही. ज्या परिवारासाठी आम्ही जिवाचं रान केले त्याच कुटुंबातली एक प्रमुख व्यक्ती ज़र आमच्या चिमुकल्याबद्दल असे उद्गार काढत असेल तर आमच्या मनाला किती वेदना होत असतील, असेही त्यांनी म्हटले आहे. राजकारण होतच राहील, टीकाटिप्पणी होतच राहील; पण त्यात निरागसतेला ओढू नका. हे पाप आहे आणि तेही कुठेही फेडता येणार नाही असे. त्या पापाचे धनी होऊ नका, असेही खासदार श्रीकांत शिंदे यांनी म्हटले आहे.

# अंबानी कुटुंबाला धमकी देणाऱ्याला बिहारमधून अटक

**मुंबई :** रिलायन्स उद्योग समूहाचे प्रमुख, प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी आणि त्यांच्या कुटुंबीयांना ठार मारण्याच्या धमकीप्रकरणी डी. बी. मार्ग पोलिसांनी एका ३० वर्षीय तरुणाला बिहार येथील दरभंगा येथून अटक केली. न्यायालयाने त्याला १० ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

राकेश मिश्रा (३०) असे अटक आरोपीचे नाव आहे. तो बिहार दरभंगा येथील रहिवासी असून तो उच्चशिक्षित आहे. सर एच. एन. रिलायन्स फाऊंडेशन रुग्णालयात त्याने बुधवारी दुपारी १२ वाजून ५७ मिनिटांनी आणि सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास दूरध्वनी करून रिलायन्स रुग्णालय उडवून देण्याची धमकी दिली होती. तसेच मुकेश अंबानी, त्यांची पत्नी नीता यांच्यासह दोन्ही मुलांना ठार मारण्याची धमकी त्याने दिली होती.

रुग्णालय प्रशासनाने याबाबतची माहिती डी. बी. मार्ग पोलिसांना दिली होती. तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन पोलिसांनी राकेश मिश्रा याला अटक केली. दरम्यान, धमकीच्या दूरध्वनीनंतर पोलिसांनी अंबानी यांच्या अँटेलिया या निवासस्थानाच्या सुरक्षेत वाढ केली आहे.

# एसटी महामंडळाचा तोटा वाढला

## २ हजार २७५ कोटी रुपये तोटा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई:** एसटी महामंडळाचा तोटा वाढतच असून उत्पन्न कमी, खर्च जास्त अशी स्थिती महामंडळाची आहे. त्यामुळे भविष्यात कर्मचाऱ्यांचे वेतन देणेही कठीण झाले आहे. २०२१-२२ मध्ये २ हजार २७५ कोटी रुपये तोटा झाला असून अद्यापही प्रवासी संख्येत वाढ होत नसल्याने या तोट्यात आणखी वाढ होण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शुक्रवारी एसटी महामंडळाच्या परिस्थितीचा आढावा घेणार असून शासनाकडूनही होणारी मदत, सद्यःस्थिती इत्यादीबाबत महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चाही होणार आहे. ही बैठक दुपारी एक वाजता मंत्रालयात होणार आहे.

एसटी महामंडळ हे गेल्या काही वर्षांपासून तोट्यात आहे. मात्र वर्षागणिक हा तोटा वाढतच आहे. करोनाकाळापासून प्रवासी एसटीपासून दुरावले आणि त्यामुळे उत्पन्नही कमी झाले. त्यातच कर्मचाऱ्यांच्या संपामुळे एसटीच्या तोट्यात आणखी भर पडली. या संपावर तोडगा काढताना एसटी फायद्यात येत नाही, तोपर्यंत शासनाकडून चार वर्षे आर्थिक मदत देण्याचा निर्णयही झाला. मात्र एसटीची सेवा पुर्ववत होऊनही प्रवासी संख्या वाढलेली नसून उत्पन्नही कमीच मिळत आहे. परिणामी खर्च जास्त आणि उत्पन्न कमी अशी स्थिती असून तोटा वाढतच आहे.

२०१९-२० मध्ये एसटीतून एकूण २१९ कोटी प्रवाशांनी प्रवास केला होता. त्यावेळी वर्षाला ७ हजार ८९० कोटी रुपये उत्पन्न मिळाले होते, तर ८ हजार ७९० कोटी रुपये खर्च होता. परिणामी ९१९ कोटी रुपये तोटा सहन करावा लागला. २०२०-२१ मध्ये करोनामुळे मोठा फटका बसला आणि ४ हजार १३८ कोटी रुपये उत्पन्न, तर ५ हजार ८६६ कोटी रुपये खर्च झाला होता. त्यावेळी एका वर्षात एकूण ५४ कोटी ९९ लाख प्रवाशांनी प्रवास केला होता. यामुळे तोटा १ हजार ७२८ कोटी रुपये झाला. करोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतरही प्रवासी संख्या वाढणे अपेक्षित होते, परंतु तसे झाले नाही.

२०२१-२२ मध्ये एकूण ४९ कोटी ५० लाख प्रवाशांनी प्रवास केला असून २ हजार ६०८ कोटी रुपये उत्पन्न आणि ४ हजार ८८३ कोटी रुपये खर्च झाला आहे. यामुळे २ हजार २७५ कोटी रुपये तोटा झाल्याची माहिती एसटीतील सूत्रांनी दिली. तोटा वाढतच असून भविष्यात कर्मचाऱ्यांच्या वेतनाचाही प्रश्न उद्‌भवू शकतो.



### मुख्यमंत्री घेणार आढावा

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शुक्रवारी दुपारी एक वाजता मंत्रालयात एसटी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार असून यामध्ये महामंडळाच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. शासनाकडून चार वर्षांत केली जाणारी आर्थिक मदत, कमी झालेली प्रवासी संख्या, उत्पन्न, कर्मचाऱ्यांचे वेतन इत्यादींवर चर्चाही होणार आहे.

# गरिबांना तीन हजार रुपयांची दिवाळी भेट द्या : पटोले

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**मुंबई:** राज्यातील गोरगरीब जनतेला दिवाळीसाठी १०० रुपयांमध्ये एक किलो चणाडाळ, साखर, रवा व एक लिटर पामतेलच्या माध्यमातून शिंदे-फडणवीस सरकारने जाहीर केलेली दिवाळी भेट अत्यंत तुटपुंजी आहे. त्यामुळे सरकारने महागाईचा विचार करून प्रत्येक कुटुंबाच्या बँक खात्यातच तीन हजार रुपये दिवाळी भेट जमा करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी गुरूवारी केली आहे.

पटोले यांनी गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे ही मागणी केली आहे. जनतेची दिवाळी गोड करणे हे सरकारचे कर्तव्यच आह, असे पटोले यांनी म्हटले आहे.

# सायबर फसवणुकीत ओळख लपविणारी यंत्रणा हस्तगत

## 'सीबीआय'चे 'ऑपरेशन चक्र' सुरू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** सायबर फसवणूक किंवा कर्जवसुलीसाठी मोबाइलवर येणारे कॉल हे प्रचंड त्रासदायक ठरतात. असे कॉल करणाऱ्या व्यक्तींना पोलिसांकडे तक्रार करण्याचा इशारा दिला तरी ते जुमानत नाहीत. कधी कधी तर ते उद्धट बोलतात. आपला ठावठिकाणा शोधला जाणार नाही, याची खात्री असल्यानेच ते असे वर्तन करतात. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) काही दिवसांपासून सुरू केलेल्या 'ऑपरेशन चक्र' या मोहिमेनुसार टाकलेल्या छाप्यात या गुन्हेगारांना उपयुक्त ठरणारी यंत्रणा जप्त करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

वाढत्या सायबर फसवणुकीला प्रतिबंध करण्यासाठी सीबीआयने आखलेल्या या मोहिमेत पुणे आणि अहमदाबाद येथे २०१४ पासून सुरू असलेल्या दोन कॉल सेंटरवर कारवाई केली. या कॉल सेंटर्समधून अमेरिकेतील अनेक ग्राहकांची सायबर फसवणूक करण्यात आल्याचे स्पष्ट झाले होते. अमेरिकेच्या फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनने (एफबीआय) इंटरपोलमार्फत सीबीआयकडे तांत्रिक माहिती पुरविली होती. व्हॉइस ओवर इंटरनेट प्रोटोकॉल या तंत्रज्ञानाचा वापर या कॉल सेंटरमध्ये होत होता. त्यामुळे कॉल करणाऱ्याचा शोध घेणे कठीण होते. याबाबतची माहिती इंटरपोलकडून मिळाल्यानंतर वेगवेगळ्या पद्धतीने सीबीआयच्या तपास पथकाने चौकशी सुरू केली होती. दीडशेहून अधिक ठिकाणी तपासणी केली. त्यातून बरीच माहिती उघड झाली असून त्याची छाननी सुरू असल्याची माहिती सीबीआयने दिली.

### अशी झाली माहिती उघड...

सायबरविषयक गुन्ह्यांची उकल करण्यासाठी सीबीआयचा विशेष तपास विभाग आहे. एफबीआय, इंटरपोल तसेच कॅनडा व ऑस्ट्रेलियातील तपास यंत्रणेकडून मिळालेल्या तांत्रिक माहितीची गेल्या काही महिन्यांपासून शहानिशा सुरू होती. त्यातूनच ही माहिती उघड झाली. सीबीआयने या माहितीच्या आधारे देशभरात सुरू असलेल्या अनेक संशयास्पद कॉल सेंटरवर छापे टाकले. १६ राज्यांत एकाच वेळी सीबीआयने ही कारवाई केली.

## राज्य सेवा मुख्य परीक्षा

# आर्थिक भूगोल, अवकाशीय तंत्रज्ञान आणि सुदूर संवेदन

एमपीएससी मंत्र

**रोहिणी शहा**

**मुख्य परीक्षा** सामान्य अध्ययन पेपर एकमधील आर्थिक भूगोल, अवकाशीय तंत्रज्ञान आणि सुदूर संवेदन हे मुद्दे त्यांचे आर्थिक महत्त्व समजून घेऊन अभ्यासणे आयोगाला अपेक्षित असल्याचे दिसून येते. त्यामुळे या लेखामध्ये या घटकांच्या तयारीबाबत एकत्रित चर्चा करण्यात येत आहे.

**● आर्थिक भूगोल**

या घटकातील आर्थिक व्यवसाय म्हणून शेती आणि मत्स्य व्यवसाय या मुद्द्यांचा अभ्यास कृषी घटकाच्या तयारीमध्ये करणे व्यवहार्य ठरेल. उर्वरित मुद्द्यांची तयारी पुढीलप्रमाणे करता येईल.

**● खनिजे आणि ऊर्जा साधने**

यामध्ये महाराष्ट्रातील साधनसंपत्तीचाच समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात उत्पादन होणारी प्रमुख खनिजे आणि ऊर्जा साधने माहीत करून घ्यायला हवीत. खनिज/ ऊर्जा साधन, त्याचा महाराष्ट्रातील साठा, त्याचे देशातील एकूण साठ्यातील प्रमाण आणि क्रमांक, उत्पादनातील महाराष्ट्राचा वाटा आणि क्रमांक, त्याचे आर्थिक महत्त्व, त्यांचा विविध उपयोगांतील वापर आणि आवश्यकता या मुद्द्यांच्या आधारे तयारी करायला हवी.

खनिजांचे उत्खनन म्हणजे खाणींचे प्रकार, त्यांच्या पर्यावरणीय समस्या, त्यातील कामगारांच्या समस्या, उत्पादकता हे मुद्देही बारकाईने अभ्यासायला हवेत.

**● वाहतूक**

महाराष्ट्राच्या बाबतीत रस्ते, रेल्वे, सागरी व हवाई वाहतूक हे वाहतुकीचे प्रकार महत्त्वाचे आहेत; पण त्याचबरोबर देशातील अंतर्गत जलवाहतुकीचा आढावा घेणेही आवश्यक आहे.

या वाहतूक प्रकारांचा ब्रिटिशकाळापासूनचा विकास समजून घ्यावा. या वाहतुकीच्या साधनांसाठी आवश्यक पायाभूत/ मूलभूत बाबी, अभ्यासायला हव्यात. या वाहतूक प्रकारांचे उपप्रकार, त्यांचा विस्तार, त्यांचा वापर/उपयोजन, विविध उद्योगांसाठीचे त्यांचे महत्त्व, प्रवासी वाहतुकीतील महत्त्व, त्यांच्या विकासासाठीचे केंद्र व राज्य स्तरावरील प्रकल्प/योजना, संबंधित शासकीय अभिकरणे/विभाग अशी विस्तृत माहिती असायला हवी. या मुद्द्यांच्या अद्ययावत आकडेवारीसाठी त्या त्या वर्षीच्या आर्थिक पाहणी अहवालांचा संदर्भ घेता येईल.

आर्थिक विकास, आर्थिक विकासाची साधने, शाश्वत विकास हे मुद्दे वाहतूक या मुद्द्यामध्ये समाविष्ट असल्याने वाहतुकीची साधने आणि आर्थिक विकास यांचा परस्परसंबंध व एकमेकांवर होणारा परिणाम अशा परिप्रेक्ष्यातून अभ्यासायला हवेत.





**● पर्यटन**

महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पर्यटनस्थळांचा अभ्यास स्थान, वैशिष्ट्ये, आर्थिक महत्त्व, वर्गीकरण, पर्यावरणीय मुद्दे, संबंधित समस्या, कारण, उपाय आणि चालू घडामोडी या मुद्द्यांच्या आधारे करावा.

महाराष्ट्रातील सर्व राष्ट्रीय उद्याने, वने माहीत असायला हवीत. भारतातील प्रसिद्ध वने, उद्याने व सद्यःस्थितीत चर्चेत असलेली स्थळे याची माहिती असावी. किल्लेही त्यांच्या ठळक इतिहासासह स्थान, प्रकार, वैशिष्ट्ये अशा मुद्द्यांच्या अनुषंगाने पाहावेत.

धार्मिक, वैद्यकीय, सांस्कृतिक पर्यटन, राखीव उद्याने इ. संकल्पना व्यवस्थित समजून घेणे आवश्यक आहे. या संकल्पनांवर आधारित राज्यातील स्थळे आणि त्यांची वैशिष्ट्ये माहीत करून घ्यावीत.

पर्यटन क्षेत्रातील नव्या संकल्पना माहीत करून घ्यायला हव्यात.

केंद्र व राज्याच्या पर्यटनविषयक धोरणे व योजनांची अद्ययावत माहिती असायला हवी.

**● ज्ञानाधिष्ठित आर्थिक व्यवसाय**

या घटकाचा अभ्यास करताना इंग्रजी अभ्यासक्रमच बघायला हवा. इंग्रजी अभ्यासक्रमाचा मराठी अनुवाद करताना महाराष्ट्रातील आयटी पार्क्स हा मुद्दा वगळला आहे.

इलेक्ट्रानिक व्यवसायांचे सर्वच प्रकार ज्ञानाधिष्ठित नसले तरी त्यांचा विस्तृत अभ्यास करणे व्यवहार्य ठरेल. अभ्यास करताना त्यांचे प्रकार, या व्यवसायामध्ये समाविष्ट उत्पादने व सेवांचा आढावा घ्यावा. इलेक्ट्रानिक वस्तूंचे भारतातील उत्पादन, कच्च्या मालासाठी आयातीवरील अवलंबित्व, त्यांचा जीडीपीमधील व निर्यातीमधील वाटा, उत्पादनामध्ये अग्रेसर राज्ये, समस्या, कारणे, परिणाम व उपाय असे मुद्दे लक्षात घ्यावेत. या व्यवसायातील सेवांमध्ये बी.पी.ओ. उद्योग, ज्ञानाधारित काही स्टार्ट अप्स, त्यांची वैशिष्ट्ये, भारतातील विस्तार, भारतातील तसेच देशातील वैशिष्ट्यपूर्ण स्टार्ट अप्सची थोडक्यात माहिती असे मुद्दे विचारात घ्यावेत.

राज्यातील आयटी पार्क्स, पुणे शहरातील माहिती तंत्रज्ञान केंद्र, भारतातील सिलिकान व्हॅली/ माहिती तंत्रज्ञान केंद्र यांचा विकास, स्थाननिश्चितीमागील कारणे, यांमध्ये उपलब्ध सेवा व उत्पादने, त्यांचे आर्थिक महत्त्व, रोजगारनिर्मिती क्षमता अशा मुद्द्यांच्या आधारे अभ्यासावेत.

**● संगणक व जैव तंत्रज्ञान**

CTBT ( Computer Technology and Bio Technology) हा मुद्दा त्याचे ज्ञानाधारित स्वरूप लक्षात घेऊन अभ्यासायला हवा. यामध्ये या तंत्रज्ञानाच्या विकासाचा थोडक्यात आढावा, त्यांचे स्वरूप आणि प्रकार, त्यांचे विविध क्षेत्रांमधील उपयोजन असे मुद्दे लक्षात घ्यायला हवेत.

इंग्रजी अभ्यासक्रमामध्ये संशोधन व विकास आणि राज्यातील अशा संस्था असे दोन वेगळे मुद्दे आहेत. मराठीमध्ये भारतातील संशोधन व विकास संस्थेची भूमिका असा वेगळाच मुद्दा समाविष्ट आहे. तशी या तिन्ही मुद्द्यांमध्ये link आहेच व तयारीही सलगपणे करता येऊ शकते. त्यामुळे तिन्ही मुद्दे अभ्यासणे व्यवहार्य ठरेल. संशोधन व विकासामध्ये कार्यरत भारतातील संस्थांचा आढावा नाव, बोधवाक्य, उद्देश, कार्यक्षेत्र, वाटचालीतील ठळक उपलब्धी, नियंत्रक/नियामक यंत्रणा अशा मुद्द्यांच्या आधारे घ्यावा.

भूगोल आणि आकाश-अवकाशीय/अंतराळ तंत्रज्ञान

आकाश व अवकाश संज्ञा, GIS, GPS आणि दूरसंवेदन यंत्रणा यांमधील तांत्रिक व संकल्पनात्मक मुद्दे समजून घ्यायला हवेत.

संरक्षण, बॅंकिंग आणि वाहतूक नियोजन, आरोग्य व शिक्षण यांसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये व अवकाश तंत्रज्ञान आणि टेलिकम्युनिकेशन तंत्रज्ञानाचे महत्त्व समजून घ्यायला हवे.

अभ्यासक्रमामध्ये उल्लेख केलेल्या व यापुढे होणाऱ्या अवकाश तंत्रज्ञानाधारित प्रकल्प व मोहिमांचा तसेच विकसित अवकाशीय उपग्रह संपत्तीचा आढावा उद्देश, कालावधी, उपयोजन, उल्लेखनीय वैशिष्ट्ये, विकास करणारी यंत्रणा, खर्च, यशापयश अशा मुद्द्यांच्या आधारे घ्यावा.

ISRO, DRDO यांची संशोधन व विकासातील भूमिका समजून घेण्यासाठी त्यांचे स्थापनेपासूनचे ठळक कार्य, आव्हाने, यशापयश समजून घ्यावे.

अवकाशीय शस्त्रास्त्र स्पर्धा अभ्यासताना स्वरूप, कारणे, परिणाम व प्रतिबंधात्मक उपाय असे मुद्दे पाहावेत. यामध्ये भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावरील भूमिका समजून घ्यावी व याबाबतच्या चालू घडामोडींची माहिती असायला हवी.

**● रिमोट सेन्सिंग**

रिमोट सेन्सिंगची मूलभूत तत्त्वे/संकल्पना, डेटा व माहिती, रिमोट सेन्सिंग डेटा कलेक्शन, रिमोट सेन्सिंग फायदे व मर्यादा हे मुद्दे ढोबळ वाटत असले तरी त्यांचा बारकाईने अभ्यास आवश्यक आहे.

रिमोट सेन्सिंग व एरियल फोटोग्राफीमधील प्रक्रिया आणि त्यामध्ये समाविष्ट तांत्रिक मुद्दे व संकल्पना यांचा अभ्यास करताना संकल्पनेचे मूलभूत तत्त्व/तंत्रज्ञान, त्यांमधील घटक, त्यांचे प्रकार व त्यांमधील तुलना, त्यांचा अपेक्षित प्रभाव/परिणाम आणि त्यांचे उपयोजन/ अनुप्रयोग/ वापर असे मुद्दे लक्षात घ्यावेत.

जीआयएस आणि त्याचे अनुप्रयोग हा मुद्दा अभ्यासताना त्यामधील समाविष्ट सर्व तांत्रिक घटकांमागील मूलभूत तंत्रज्ञान, संबंधित घटकाचे असल्यास प्रकार, त्यामधील संज्ञा व संकल्पना, त्यांचे उपयोजन आणि दैनंदिन जीवनातील वापर असे मुद्दे लक्षात घ्यावेत.

नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि आपत्ती व्यवस्थापनातील सामाजिक गरजा सोडविण्यासाठी जीआयएसचे कार्य अभ्यासताना त्या त्या क्षेत्रातील गरजा समजून घेऊन मग त्यांच्यासाठी जीआयएसचा वापर कशा प्रकारे करण्यात येतो हे समजून घ्यावे.

---

नोकरीची संधी

**सुहास पाटील**

*suhassitaram@yahoo.com*

**भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड ( BEL), हैद्राबाद (संरक्षण मंत्रालयांतर्गत, भारत सरकारचा उपक्रम). ( Advt. No. BEL/ HYD/२०२२-२३/०३) BEL च्या हैद्राबाद युनिटमध्ये ट्रेनी इंजिनिअर आणि प्रोजेक्ट इंजिनिअर पदांची तात्पुरत्या स्वरूपात भरती.**

**एकूण रिक्त पदे** – १४१.

( I) ट्रेनी इंजिनिअर- I - ८६ पदे ( अजा - १३, अज - ६, इमाव - २३, ईडब्ल्यूएस - ८, खुला - १६).

**स्ट्रीमनुसार रिक्त पदांचा तपशिल –**

(१) इलेक्ट्रॉनिक्स (पोस्ट कोड TEEL) - ६० पदे.

**पात्रता** – इलेक्ट्रॉनिक्स/ इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन/ इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन/ टेली कम्युनिकेशन/ इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक.

(२) मेकॅनिकल (पोस्ट कोड TEME) - २० पदे.

**पात्रता** – मेकॅनिकल इंजिनिअरींग पदवी.

(३) कॉम्प्युटर सायन्स (पोस्ट कोड TECS) - ६ पदे.

**पात्रता** – कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरींग पदवी.

(४) इलेक्ट्रिकल (पोस्ट कोड TELE) - १ पद.

**पात्रता** – इलेक्ट्रिकल/इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग पदवी.



(५) सिव्हील (पोस्ट कोड TECL) - २ पदे (इमाव - १, खुला - १).

**पात्रता** – सिव्हील इंजिनिअरींग पदवी.

**अनुभव** – ट्रेनी इंजिनिअर- I पदांसाठी संबंधित इंडस्ट्रीमधील किमान ६ महिन्यांचा अनुभव अनिवार्य.

( II) प्रोजेक्ट इंजिनिअर- I - ५२ पदे ( अजा - ७, अज - ३, इमाव - १४, ईडब्ल्यूएस - ५, खुला - २३).

**स्ट्रीमनुसार रिक्त पदांचा तपशिल –**

(६) इलेक्ट्रॉनिक्स (पोस्ट कोड PEEL) - ३० पदे.

(७) मेकॅनिकल (पोस्ट कोड PEME) - १५ पदे.

(८) कॉम्प्युटर सायन्स (पोस्ट कोड PECS) - ५ पदे.

(९) इलेक्ट्रिकल (पोस्ट कोड PELE) - १ पद.

(१०) सिव्हील (पोस्ट कोड PECL) - १ पद.

**पात्रता** – पद क्र. ६ ते १० साठी संबंधित विषयातील इंजिनिअरींग पदवी. सर्व पदांसाठी पदवी परीक्षेत किमान सरासरी ५५... गुण आवश्यक. (अजा/अज/दिव्यांग उमेदवारांना गुणांची अट लागू नाही.)

**अनुभव** – प्रोजेक्ट इंजिनिअर- I पदांसाठी संबंधित इंडस्ट्रीमधील किमान २ वर्षांचा अनुभव अनिवार्य आहे. पदनिहाय अनुभवाचा तपशिल www. bel- india. in या वेबसाईटवरील जाहिरातीमध्ये उपलब्ध आहे. १ वर्ष कालावधीची ॲप्रेंटिसशिप ट्रेनिंग अनुभव म्हणून समजली जाईल.

**वयोमर्यादा** – ट्रेनी इंजिनिअर- I पदांसाठी २८ वर्षे, प्रोजेक्ट इंजिनिअर- I पदांसाठी ३२ वर्षे. (वयोमर्यादेत सूट - इमाव - ३ वर्षे, अजा/अज - ५ वर्षे, दिव्यांग - १० वर्षे)

**वेतन** – ट्रेनी इंजिनिअर- कपदांसाठी - पहिल्या वर्षी रु. ३०,०००/-, दुसऱ्या वर्षी रु. ३५,०००/-, तिसऱ्या वर्षी रु. ४०,०००/-.

प्रोजेक्ट इंजिनिअर- I पदांसाठी पहिल्या वर्षी रु. ४५,०००/-, दुसऱ्या वर्षी रु. ५०,०००/-, तिसऱ्या वर्षी रु. ५५,०००/-.

याशिवाय सर्व पदांसाठी उमेदवारांना दरवर्षी प्रत्येकी रु. १२,०००/- इतर खर्चासाठी दिले जातील.

**निवड पद्धती** – सर्व पदांसाठी लेखी परीक्षा दि. १६ ऑक्टोबर २०२२ (रविवार) रोजी ' Little Flower Junior College, Opp. Survey of India, P & T Colony, Uppal, Hyderabad - ५०० ०३९' येथे घेतली जाईल.

**वेळ** – सकाळी ९.३० वाजता प्रोजेक्ट इंजिनिअर- I पदांसाठी.

दुपारी १२.३० वाजता ट्रेनी इंजिनिअर- I पदांसाठी.

लेखी परीक्षेसाठी येताना उमेदवारांनी गुगल फॉर्मची प्रिंटआऊटवर रंगीत पासपोर्ट साईज फोटो चिकटवून येऊन यावे आणि आधारकार्ड आणावे. आधार कार्डाचा नंबर त्यांचा रोल नंबर असेल.

लेखी परीक्षा ५० गुणांसाठी यातून पर्सोनल इंटरव्ह्यूकरिता उमेदवार शॉर्टलिस्ट केले जातील. (१:५ प्रमाणात) लेखी परीक्षेचा निकाल २० ऑक्टोबर २०२२ रोजी जाहीर केला जाईल. उमेदवारांना तसे ई-मेलद्वारे आणि वेबसाईटवरून कळविण्यात येईल. (परीक्षेचे ठिकाण आणि वेळ)

अंतिम निवड यादी www. bel- india. in या वेबसाईटवर प्रसिद्ध केली जाईल.

**अर्जाचे शुल्क** – ट्रेनी इंजिनिअर- I रु. १७७/-.

प्रोजेक्ट इंजिनिअर- I रु. ४७२/-. (अजा/अज/दिव्यांग उमेदवारांना शुल्क माफ आहे.)

शंकासमाधानासाठी ई-मेल - hydrgen@bel. co. in किंवा फोन नं. ०४०-२७१९४९९९.

विस्तृत माहिती www. bel- india. in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अर्ज कसा करावा - उमेदवारांनी Google Format द्वारे आपले नाव रजिस्टर करणे आवश्यक. https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSeoFbusWGjHbr3RMaD1nmLCc7HGdBHCUbR2jNkNAPpBfw9aOg/viewform?usp=sf_link

प्री- Registration १४ ऑक्टोबर २०२२ पर्यंत करणे आवश्यक.

**युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन ( UPSC) मार्फत केंद्र सरकारच्या विविध विभागात पुढील पदांची सिलेक्शन पद्धतीने भरती.**

**एकूण रिक्त पदे** – ५०. ( Advt. No. १८/२०२२)

(१) सिरिअस फ्रॉड इन्व्हेस्टिगेशन ऑफिस ( SFIO), मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स - 'प्रोसिक्युटर' ग्रुप-बी - एकूण १२ पदे. (अजा - १, अज - १, इमाव - २, ईडब्ल्यूएस - १, खुला - ७) (२ पदे दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव)

**पात्रता** – कायदा विषयातील पदवी.

**अनुभव** – ३ वर्षांची कायदा विषयातील पदवी असल्यास शासकीय संस्थेमधील कोर्ट मॅटर/ ॲडमिनिस्ट्रेशन कामाचा १ वर्षाचा अनुभव आवश्यक. ५ वर्षांची कायदा विषयातील पदवी असल्यास शासकीय संस्थेमधील कोर्ट मॅटर/ ॲडमिनिस्ट्रेशन कामाचा २ वर्षांचा अनुभव आवश्यक.

**इष्ट पात्रता –**

(i) LL. M.,

(ii) कॉर्पोरेट/क्रिमिनल मॅटर्समधील अधिकचा १ वर्षाचा अनुभव.


**कामाचे ठिकाण** – नवी दिल्ली.

**वयोमर्यादा** – दि. १३ ऑक्टोबर २०२२ रोजी ३० वर्षे. (इमाव - ३३ वर्षे, अजा/अज - ३५ वर्षे, दिव्यांग - ४०/४३/४५ वर्षे)

(२) ॲनिमल हजबंडरी युनिट, डेव्हलपमेंट डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ NCT ऑफ दिल्ली - वेटेरिनरी ऑफिसर - १० पदे (अजा - १, अज - १, इमाव - ५, ईडब्ल्यूएस - ३).

दिव्यांग उमेदवार (कॅटेगरी B/ LV, D/ HH, LD, MD) अर्ज करण्यास पात्र आहेत.

**पात्रता** – (दि. १३ ऑक्टोबर २०२२ रोजी) इंडियन वेटेरिनरी काऊन्सिल ॲक्ट, १९८२ चा पहिला किंवा दुसऱ्या शिड्यूलनुसार मान्यताप्राप्त अर्हता आणि स्टेट/इंडियन वेटेरिनरी काऊन्सिलकडील रजिस्ट्रेशन.



**अनुभव** – ३ वर्षांची कायदा विषयातील पदवी असल्यास शासकीय संस्थेमधील कोर्ट मॅटर/ॲडमिनिस्ट्रेशन कामाचा १ वर्षाचा अनुभव आवश्यक.

५ वर्षांची कायदा विषयातील पदवी असल्यास शासकीय संस्थेमधील कोर्ट मॅटर/ ॲडमिनिस्ट्रेशन कामाचा २ वर्षांचा अनुभव आवश्यक.

**इष्ट पात्रता** – डेअरी/कॅटल/पोल्ट्रीमधील व्यावसायिक कामाचा अनुभव.

**कामाचे ठिकाण** – दिल्ली.

**वेतन श्रेणी** – लेव्हल-१० अंदाजे वेतन दरमहा रु. ९९,०००/-.

**वयोमर्यादा** – दि. १३ ऑक्टोबर २०२२ रोजी ३५ वर्षे. (इमाव - ३८ वर्षे, अजा/अज - ४० वर्षे)

(३) डिपार्टमेंट ऑफ हेल्थ अँड फॅमिली वेल्फेअर, मिनिस्ट्री ऑफ हेल्थ अँड फॅमिली वेल्फेअर - स्पेशालिस्ट ग्रेड- III (जनरल मेडिसिन) ग्रुप 'ए' - २८ पदे (अजा - ५, अज - २, इमाव - ११, ईडब्ल्यूएस - १, खुला - ९) (१ पद दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव).

**पात्रता –**

(i) M. B. B. S.,

(ii) संबंधित विषयातील पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री किंवा डिप्लोमा.

**अनुभव** – संबंधित स्पेशालिटी/सुपर स्पेशालिटी कामाचा ३ वर्षांचा अनुभव. डॉक्टरेट ऑफ मेडिसिन ( D. M.) किंवा Magister Chirungiae ( M. Ch.) उत्तीर्ण उमेदवारांस अनुभवाची आवश्यकता नाही.


**वेतन श्रेणी** – लेव्हल-११ अंदाजे वेतन दरमहा रु. १,३०,०००/-.

**वयोमर्यादा** – दि. १३ ऑक्टोबर २०२२ रोजी ४० वर्षे. (वयोमर्यादेत सूट - इमाव - ३ वर्षे, अजा/अज - ५ वर्षे, दिव्यांग - १० वर्षे)

ऑनलाईन रिक्रूटमेंट ॲप्लिकेशन (ORA) http:// www. upsconline. nic. in या संकेतस्थळावर दि. १३ ऑक्टोबर २०२२ (२३.५९ वाजे)पर्यंत करावेत.

---

## शब्दकोडे- ८४९



**आडवी विधाने :**

(१) आदर, सन्मान
(५) युक्ती, चातुर्य
(९) हत्यारे-शस्त्रे बनवणारा कारागीर
(११) सोक्षमोक्ष, अखेर, शेवट
(१३) प्रासाद
(१४) रम्य, आल्हाददायक
(१५) व्रण, डाग
(१६) मसक; पाणी वाहून नेण्याची कातडी पिशवी
(१७) काळजी, फिकीर
(१९) कळा, यातना
(२१) चरवी; एक प्रकारचे भांडे
(२३) शंभराचा समूह, सेंच्युरी
(२४) दोन्ही बाजूंना धार असलेले
(२६) ठेवा, लकेर, आलाप
(२७) सारखा, समान
(२८) स्त्रियांचा एक दागिना
(३०) संन्याशाचे पाणी वापरण्याचे भांडे
(३२) पातळी, मुलामा
(३३) कागदाच्या वीस दस्त्यांचे माप
(३५) नाणे, पैसा (३७) नवरी मुलगी
(३९) झडती, बारीक शोध
(४०) कमान, अर्धवर्तुळ

**उभी विधाने :**

(१) फालतू बडबड
(२) मका, जोंधळा इत्यादींच्या कणसाचे भाजलेले दाणे
(३) ताठा, मस्ती, गुर्मी
(४) वाद्यांचा कारखाना; चौघडा, नगारे इत्यादी ठेवण्याचे ठिकाण
(६) मैदानी व्यायाम, कसरत
(७) चामखीळ, तीळ (८) तळे, सरोवर
(१०) फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
(१२) गवताची काडी
(१६) बिल्ला, प्रावीण्यासाठी दिलेले मेडल
(१८) एक औषधी वनस्पती
(१९) तनखा, पगार (२०) अमृत
(२२) आरसपान; एक देखणा दगड
(२३) एक औषधी वनस्पती
(२४) घडी, सुरकुती
(२५) चाल, पायंडा, पद्धत
(२७) समजून घेणारा, समजदार
(२९) स्त्रियांचा एक पारंपरिक अलंकार
(३१) लुबाडणूक (३४) अभिप्राय
(३६) कृत्य, कर्म
(३८) धुपारतीवरील सुगंधी पदार्थ

**– सरोज ताठरे**

## सुडोकू - ८४९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ८ | | | २ | | | ९ | ७ |
| २ | | | | ४ | | १ | | ८ |
| | ९ | | ५ | | | | | |
| | | | | | | ७ | | |
| ३ | ४ | | | | | | ८ | ६ |
| | | २ | | | | | | |
| | | | | | ३ | | १ | |
| ९ | | ६ | | ८ | | | | २ |
| ८ | १ | | | ५ | | | ६ | ४ |

### सुडोकू - ८४८चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९ | ४ | ८ | २ | ५ | १ | ७ | ३ |
| ८ | ३ | २ | १ | ६ | ७ | ९ | ४ | ५ |
| १ | ५ | ७ | ९ | ३ | ४ | ६ | ८ | २ |
| ३ | २ | ९ | ४ | ७ | ६ | ८ | ५ | १ |
| ५ | ६ | ८ | २ | १ | ३ | ४ | ९ | ७ |
| ४ | ७ | १ | ५ | ९ | ८ | ३ | २ | ६ |
| ७ | ४ | ६ | ३ | ५ | ९ | २ | १ | ८ |
| ९ | १ | ५ | ६ | ८ | २ | ७ | ३ | ४ |
| २ | ८ | ३ | ७ | ४ | १ | ५ | ६ | ९ |

### शब्दकोडे - ८४८चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | द | यो | न्मु | ख | ■ | आ | गं | तु | क |
| ग | र | ज | ■ | ब | ख | र | ■ | र | वी |
| म | ■ | ना | दा | र | ■ | सा | व | ट | ■ |
| ■ | भा | ■ | द | बा | व | ■ | र्त | ■ | स |
| अ | न | न | ■ | त | ■ | ज | मा | दा | र |
| मृ | ग | ■ | मो | ■ | ह | व | न | ■ | क |
| त | ड | का | फ | ड | की | ■ | प | र्व | त |
| मं | ■ | र | त | ■ | क | पु | त्र | ■ | दा |
| थ | क | वा | ■ | र | त | ल | ■ | हा | र |
| न | व | न | वी | न | ■ | क | न | क | ■ |

तुमच्या प्रतिक्रिया, मते, सूचना आम्हाला कळवा viva@expressindia.com

# आयफोन माझ्या आवडीचा



स्वप्निल घंगाळे

**एके काळी** हौस म्हणून मिरवल्या जाणाऱ्या गोष्टी आता गरज म्हणून वापरल्या जातात. अशा अनेक गोष्टींची मोठी यादीच तयार करता येईल. याचं सर्वात उत्तम उदाहरण म्हणजे मोबाइल फोन. आता उपनगरांमध्ये आणि सधन वर्गात या मोबाइलमध्येही त्यांच्या मॉडेल्सप्रमाणे विचारसरणी अपग्रेड होताना दिसते आहे. म्हणजेच एके काळी श्रीमंतांचा फोन असा सामान्य समज असणारा आयफोन आता सर्वसामान्यांनाही परवडू लागला आहे. अर्थात हे परवडणं आणि अजूनही अनेकांना 'इतका महाग फोन' वाटणारा आयफोन सालाबादप्रमाणे यंदाही नवीन व्हर्जन म्हणजेच 'आयफोन १४' लॉन्च झाल्यानंतर चर्चेत आला आहे. विशेष म्हणजे त्यांच्या या चर्चेत येण्याला बूस्टर डोस दिला आहे तो सणासुदीनिमित्त दिल्या गेलेल्या वेगवेगळ्या ऑफर्स आणि ऑनलाइन सेलने. पण हे सेल नसले तरी आयफोन हा मागील काही वर्षांपासून सातत्याने मागणी वाढत जाणाऱ्या फोन्सपैकी एक आहे.

अमेरिकेत आयफोन वापरणाऱ्यांनी अँड्रॉइड वापरकर्त्यांना संख्येच्या शर्यतीत मागे टाकल्याचं मध्यंतरी एका अहवालात प्रसिद्ध झालं होतं. असाच काहीसा प्रकार भारतात किमान महानगरांमध्ये होतो की काय, असा प्रश्न पडावा एवढ्या मोठ्या प्रमाणात खास करून तरुणाईत सध्या आयफोनला मागणी आहे. यामध्ये नव्या व्हर्जनला मागणी अधिक आहे हे साहजिक असलं तरी अजूनही 'आयफोन १२ मिनी'पासून ते सेकण्ड हॅण्ड फोन्सही लोक मोठ्या उत्साहाने विकत घेताना दिसतात. आजही या फोनकडे प्रेस्टीज सिम्बॉल म्हणून पाहिलं जातं. आयफोनने मागील एका तपात आपली क्रेझ आणि वेगळेपण जपलं आहे याचीच ही पोचपावती आहे. त्यामुळेच तर नुकत्याच संपलेल्या नवरात्री ऑनलाइन सेलमध्ये सर्वाधिक मागणी असणाऱ्या फोनच्या यादीत आयफोन हा अव्वल स्थानी राहिला आहे.

एके काळी आपल्या बजेटबाहेर वाटणारा हा फोन आता तरुणाईला भुरळ घालताना दिसतो आहे, अर्थात यामागे त्यांची आपापली कारणं आहेत. पण कारणं काहीही असली तरी आयफोन मिरवणाऱ्यांपेक्षा तो खऱ्या अर्थाने वापरणाऱ्यांची संख्या वाढल्याचं चित्र दिसतं आहे. बरं हे आयफोन विकत घेणारी मुलं स्वतः पैसे साठवून वगैरे आयफोन विकत घेताना दिसत आहेत. आतापर्यंत आपल्या आईवडिलांवर निर्भर असलेली आणि नुकतीच कामाला लागलेली अनेक मुलं ईएमआय किंवा ऑफर्समध्ये बेस्ट डील म्हणून आयफोनला प्राधान्य देत असल्याचं दिसतं. वापरून तर पाहू असं म्हणण्याऐवजी हा खरेदीचा निर्णय तरुणाईने फार विचारपूर्वक केलेला असतो. काही महिन्यांपूर्वीच स्वतःच्या साठवलेल्या पैशांमधून आयफोन १२ विकत घेणारी श्रृंखला नाईक ही अशाच फर्स्ट टाइम युजर्सपैकी एक. ''आयफोन हा श्रीमंत वापरतात असं मला पहिल्यांदा कळलं तेव्हापासून आयफोन घ्यायचं मनात होतं. मी नोकरीला लागल्यानंतर माझ्या पैशांनी हा फोन घ्यायचं ठरवलं होतं, पण काही केल्या या ना त्या कारणाने योग जुळून येत नव्हता. यापूर्वी मी अनेक १५ हजारांपर्यंतचे फोन वापरले आहेत. मला फोटो काढायला आणि व्हिडीओ शूटिंग करणं फार आवडतं. माझं यूट्यूब चॅनेलही आहे. त्यामुळेच मी आयफोनची निवड केली. साठवलेल्या पैशांमधून हा फोन घेतल्याचं समाधान आहे. हा फोन वापरायला लागल्यानंतर लोकांमध्ये याची क्रेझ का आहे हे समजलं. अगदी आयओएसपासून ते अपडेट्सपर्यंत सर्व काही उत्तम आहे. व्हॅल्यू फॉर मनी म्हणतो तसं...'' असं श्रृंखला सांगते.

बरं हा फोन वापरण्यास अधिक युजर फ्रेण्डली आहे असं केवळ वापरणाऱ्यांचं म्हणणं आहे अशातला भाग नाही. तर कंपनी मुळात हे फोन तयार करतानाच तंत्रज्ञानाऐवजी वापरकर्त्यांचा अधिक विचार करते, असं युजर इंटरफेस एक्सपर्ट असणारे सौरभ करंदीकर सांगतात. याच कारणामुळे आयफोन हे अधिक आकर्षक वाटतात आणि चर्चेचा विषय ठरतात. ''ज्याला आपण या फोनची क्रेझ म्हणतो ती टिकून राहण्यामागील सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे अगदी सुरुवातीच्या प्रॉडक्टपासून अॅपलने युजर एक्सपिरियन्सला फार महत्त्व दिलं. ते मानसिकदृष्ट्या वापरकर्त्यांचा फार अभ्यास करतात. अगदी बटणापर्यंत जाणारा युजरचा मिली सेकंदाचा काळही मोजण्याइतपत सूक्ष्म स्तरावर ते विचार कतात. डॉन नॉर्मन हे पूर्वी कंपनीच्या संशोधन विभागाचे प्रमुख होते. त्यांनीच 'युजर एक्सपिरियन्स' हा शब्द पहिल्यांदा वापरला. एखाद्या व्यक्तीला एखादं प्रॉडक्ट दिलं तर ते त्याला पाहता क्षणी समजलं पाहिजे. ते वापरावं कसं हे सहज वापरकर्त्यांना पाहताक्षणी लक्षात आलं पाहिजे, असा कंपनीचा प्रयत्न असतो,'' असं करंदीकर सांगतात.

तसेच जागतिक बाजारपेठ आणि विविध प्रांतांतील स्थानिक बाजारपेठ यात ताळमेळ बसवण्यातही अॅपल कंपनी इतर कंपन्यांपेक्षा सरस आहे. ''लोकलायझेशन आणि इंटरनॅशनलायझेशनला ही कंपनी फार महत्त्व देते. सगळ्या जगात सगळ्या व्यक्तींना काय वापरायला सोपं पडेल किंवा वापरायची सवय लागेल याची ते काळजी घेतात. ती गरज तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डिलिव्हर होईल याचीही ते काळजी घेतात. स्क्रीन टाइम त्यांनी पहिल्यांदा आणला. तसं हे मोबाइल वापराविरोधातील तंत्रज्ञान आहे असं वाटू शकतं; पण ते तंत्रज्ञान म्हणून विचार करत नाहीत तर वापरकर्त्यांच्या दृष्टिकोनातून विचार करतात,'' असं करंदीकर यांनी सांगितलं. याच वेगळेपणामुळे या फोनबद्दलची उत्सुकता दर वर्षी अधिक वाढलेली दिसते.

आता या फोनच्या वापरकर्त्यांची संख्या भारतात वाढते आहे, कारण याआधीची महागडा फोन ही आयफोनबद्दलची संकल्पना आता मागे पडत चालली आहे, असं करंदीकर म्हणतात. ''किंमत हा फॅक्टर आता अडसर राहिलेला नाही. आयफोन आता अनेकांना परवडतो, त्यामुळे यात तो किमतीवाला दृष्टिकोन अडथळा ठरत नाही. आयफोन वापरणारा अॅण्ड्रॉइडकडे जात नाही. एखादी व्यक्ती जेव्हा अॅपलचं प्रॉडक्ट घेते तेव्हा आयट्यून आणि वॉच यांसारखी संपूर्ण इको सिस्टीम दिली जाते. हा फोन एखादा वापरतो तेव्हा तो इतरांनाही तो वापरण्याचा सल्ला देतो, त्यामुळे हा रेकमेण्डेबल फोन आहे,'' असं त्यांनी सांगितलं.

वापरकर्त्यांमध्येही या आयफोनला पसंती देण्यामागची वेगवेगळी कारणं आहेत. अगदीच उदाहरण घ्यायचं झालं तर नुकताच 'आयफोन १२' विकत घेतलेल्या सिद्धी शिंदेने याच मोबाइलला प्राधान्य का दिलं, याबद्दल सांगताना कॅमेऱ्याचा उल्लेख केला. ''आयफोन घेण्याचं मुख्य कारण म्हणजे कॅमेरा. बाजारात अनेक असे फोन आहेत ज्यातून फोटो व व्हिडीओ चांगले येऊ शकतात, मात्र त्यात अनेकदा अनैसर्गिक वाटणारे फिल्टर वापरल्यासारखे वाटतात. असं आयफोनबाबत होत नाही. शिवाय व्हिडीओ एडिटिंगसाठी लागणारे सॉफ्टवेअर आयफोनच्या (आय टीव्ही) प्रणालीत उत्तम गतीने काम करतात. मला यूट्यूब व्हिडीओ शूट करायचे असल्याने उत्तम कॅमेरा व एडिटिंगची सहजता पाहता मी आयफोनमध्ये गुंतवणूक केली आहे,'' असं सिद्धी सांगते.

तसेच या फोनची ड्युरॅबिलिटी म्हणजेच एकदा घेतला की तो पाच ते सहा वर्षे सहज वापरू शकतो इतकी असल्याने अनेक जण दर दोन वर्षांनी फोन बदलत बसण्याऐवजी एकदाच छान फोन घेऊ असा विचार करताना दिसतात. थोडक्यात काय, तर कारणं काहीही असली तरी या फोनची क्रेझ वाढते आहे. गरज, तंत्रज्ञान आणि किमतीचा अडसर कमी झाला असल्याने तरुणाईत तर सध्या 'आयफोन माझ्या आवडीचा...' ठरतो आहे.

viva@expressindia.com





मन:स्पंदने
- मृण्मयी पाथरे

# परदेशातील पिल्लं



**घरात अगदी** लाडाकोडात वाढलेला कबीर काही महिन्यांपूर्वीच अमेरिकेत उच्चशिक्षणासाठी गेला. त्याच्या घरातून परदेशी जाणारा तो पहिलाच होता. त्यामुळे तिथे जाण्याआधी आणि गेल्यानंतरच्या सगळ्या औपचारिकता त्याला एकट्यालाच समजून घेऊन पूर्ण कराव्या लागल्या. अमेरिकेत पाऊल ठेवल्या- ठेवल्या त्याला नव्या संधी आणि वाटा खुणावत होत्या. आपल्या जिवाभावाच्या माणसांपासून दूर राहून स्वतःचं एक वेगळं जग निर्माण करणं त्याला उत्साहित करत होतं, पण तितकंच आव्हानात्मकही वाटत होतं. तिथल्या समवयस्क मंडळींशी जुळवून घ्यायला कबीरला साहजिकच काही महिने लागले. भारतातील घर गहाण ठेवून काढलेलं चाळीस-पंचेचाळीस लाखांचं लोन फेडण्यासाठी त्याला भविष्यात चांगली नोकरी मिळेल का, या चिंतेने ग्रासलं होतं. भारतात असताना आपण आपल्या तळ्यातील मोठा मासा होतो, पण आता मोठ्या तळ्यात वेगवेगळ्या तळ्यांतून अनेक मासे आल्याने आपल्याला आपला स्वतंत्र ठसा उमटवता येईल का, याची धाकधूकही मनात होती. त्यात घर, इंटर्नशिप सांभाळून अभ्यास करणं आणि एक्स्ट्राकरिक्युलर अॅक्टिव्हिटीजमध्ये सहभाग घेणं त्याला थोडंसं जड वाटू लागलं. सभोवताली इतर माणसं असली तरीही त्याला एकाकीपणा जाणवत होता. पण घरच्या मंडळींना टेन्शन नको म्हणून त्याने या साऱ्याचा थांगपत्ताही लागू दिला नाही.

कनिका गेल्या दोन वर्षांपासून कॅनडाला शिक्षणासाठी राहत होती; पण तिचा जोडीदार - आरुष मात्र भारतात स्वतःचं करिअर घडवत होता. या लाँग डिस्टन्स रिलेशनशिपमध्ये भारत आणि कॅनडातील वेगवेगळ्या टाइम झोनमुळे त्यांचं वरचेवर बोलणं होत होतं. घरातील मंडळींना त्यांच्या नात्याबद्दल पुसटशी कल्पना असल्याने आरुष कधी कॅनडाला जातो आहे, याकडे सगळ्यांचं लक्ष लागून राहिलं होतं. भारतात उभारत असलेल्या करिअरला अचानक कलाटणी देऊन परदेशी जाणं आरुषला थोडं अवघड वाटत होतं; पण इतरांनी त्याला अनेक गोष्टी ऐकवल्या - 'इथे राहून तू कितीसं कमावणार? तू इथेच राहिलास तर ही लाँग डिस्टन्स रिलेशनशिप आणखी किती काळ टिकेल? शेवटी तुम्हा दोघांपैकी एकाला या नात्याला रामराम करावा लागेल. त्यापेक्षा कॅनडाला जाऊन नोकरी शोध. नाही तर तुला स्पाउजल (spousal) व्हिसा काढून जावं लागेल.' इतरांचं हे खोचकपणे जेंडर रोल रिव्हर्सल (gender role reversal) बद्दल टोमणे मारणं आरुषच्या मनाला फार लागलं. भारतात त्याने त्याच्या करिअरमध्ये उत्तम प्रगती करूनसुद्धा त्याच्या यशाचा आनंद त्याला जाणवत नव्हता किंवा इतरांसोबत साजराही करता येत नव्हता.

आपल्याकडे कोणीही परदेशी गेलं, की आपण खूप गोष्टी गृहीत धरतो - परदेशात जाणारी सगळीच मंडळी स्वेच्छेने किंवा स्वखुशीने आपला देश सोडून जातात, शिक्षणासाठी गेलेली मंडळी तिथल्या संस्कृतीशी कालांतराने का होईना जुळवून घेतात, शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सगळ्यांनाच तिथे पुष्कळ पगार असलेली नोकरी मिळते, त्यांच्या लाइफस्टाइलमध्ये झालेले बदल हे कायम स्वागतार्हच असतात... पण खरंच या गोष्टी किती जणांना लागू पडतात? 'दुरून डोंगर साजरे' या म्हणीप्रमाणे भारतात बसून आपण कित्येकदा परदेशातील राहणीमान किती मोहक असेल याचं दिवास्वप्न रंगवत बसतो.

या दिवास्वप्नामागे कित्येक लाखांचं लोन, विद्यार्थिदशेत असताना अनोळख्या देशात डॉक्युमेंटेशन, घरकाम, इंटर्नशिप करण्यापासून अभ्यास करून चांगली नोकरी मिळवण्यापर्यंतची मेहनत, भरघोस टॅक्स भरून आणि महिन्याभरात आवश्यक खर्च सांभाळून हाती आलेली तुटपुंजी कमाई, आपल्या जवळच्या व्यक्तींपासून कित्येक महिने किंवा वर्ष लांब राहण्याचा विरह, इतर माणसं आजूबाजूला असली तरीही जाणवणारा एकाकीपणा, कुटुंबाच्या किंवा मित्रमंडळींच्या आयुष्यात आलेल्या सुख-दुःखाच्या क्षणांना वेळीच प्रत्यक्ष हजर न राहता येणं, अभ्यासातून आणि करिअरमधून स्वतःला 'सिद्ध' करण्याची धडपड, घरच्यांना ताण येऊ नये म्हणून आपण भावनिकदृष्ट्या भक्कम आहोत हे दाखवण्यासाठी मनात कल्लोळ निर्माण करणाऱ्या समस्या शेअर न करणं अशा कित्येक गोष्टी आपल्या नजरेतून सुटून जातात.

हे स्ट्रगल्स वरवर सगळ्यांना माहीत असले तरी काही समस्यांबद्दल आपल्याला पुसटशी कल्पनाही नसते. काही जण कुटुंबीयांना घरातील एखादी व्यक्ती तरी परदेशी शिकलेली हवी म्हणून तिथे जाण्याचा निर्णय घेतात, तर काही जण भारतात राहून जे स्वातंत्र्य उपभोगता येत नाही, अशा स्वातंत्र्याच्या शोधात इतर देशांत जातात. याचंच आतापर्यंत लाइमलाइटपासून दूर राहिलेलं उदाहरण म्हणजे क्वीअर (queer) व्यक्तींनी भारतात राहण्यापेक्षा इतर सर्वसमावेशक (inclusive) देशांत केलेलं स्थलांतर. आपल्या देशात एलजीबीटीक्यूआयए+ व्यक्तींचे काही मोजकेच हक्क कागदोपत्री जरी नमूद केलेले असले (आणि याव्यतिरिक्त अनेक हक्क कोर्टकचेरीच्या हेलपाट्यांमध्ये अडकले गेलेले असले) तरी प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी करण्यात वर्षानुवर्षं अनेक तफावती आढळून येत आहेत. पैशाचं पुरेसं पाठबळ असेल आणि कुटुंबातील मंडळी आयडेंटिटी स्वीकारत नसतील, तर काही क्वीअर व्यक्ती कुटुंबाला निर्णयात सामावून न घेता स्थलांतर करण्याचा निर्णय घेत आहेत. हा निर्णय कित्येकदा केवळ त्यांच्या करिअरलाच नव्हे, तर वैयक्तिक आयुष्याला डोळ्यासमोर ठेवून घेतला जातो.

आपला देश सोडून जाण्याच्या कारणांमध्ये कितीही वैविध्य असलं, तरीही कित्येक जण आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या बदलाला सामोरं जाताना नैराश्य, एन्गझायटी, ताणतणाव, शारीरिक आणि मानसिक थकवा अनुभवतात. कधीकधी हा ताण असह्य झाल्याने काही जण स्वतःला इजा पोहोचवण्याचा प्रयत्नही करू शकतात. त्यात या समस्या समजून घेण्यासाठी नेहमीच आपल्या संस्कृतीचे अनोखे पैलू लक्षात घेऊन आधार देणारे (culturally competent) मानसशास्त्रज्ञ किंवा मानसोपचारतज्ज्ञ इतर देशांत जवळपास असतीलच असं नाही. त्यामुळे हे सगळं सांगावं तर कोणाला सांगावं, हा प्रश्नही काही जणांसमोर उभा ठाकतो. आता ऑनलाइन थेरपीमुळे हा प्रश्न काही प्रमाणात कमी झाला असला, तरी जेव्हा ऑफलाइन मदतीची गरज भासते, तेव्हा कोणी तरी प्रत्यक्षात आपल्यासोबत आहे ही भावना सुखावणारी असते. अशा वेळेस आजूबाजूला असलेले स्थलांतरित विद्यार्थी आणि व्यावसायिक यांची कम्युनिटी कामी येते. कदाचित तेही या आव्हानांना इतरांच्या नकळत सामोरं जात असतील आणि त्यांनाही कोणाचा तरी आधार हवा असेल. त्यामुळे एका आफ्रिकन म्हणीनुसार - 'तुम्हाला त्वरित तुमचा पल्ला गाठायचा असेल, तर एकटे जा. मात्र, तुम्हाला लांबचा पल्ला गाठायचा असेल, तर एकत्र जा.' आफ्टरऑल, वुई आर ऑल इन धिस टुगेदर!

viva@expressindia.com



क्लिक पॉईंट
- वेदवती चिपळूणकर

# लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेताही...





**दैनंदिन मालिकेतून** घराघरांत पोहोचलेला मात्र त्याआधी रंगभूमीचा शिलेदार असलेला क्रिएटिव्ह अभिनेता म्हणजे विराजस कुलकर्णी. आई आणि आजोबांचा अभिनयाचा वारसा मिळूनही केवळ तेवढ्यापुरतं मर्यादित न राहता लेखन, दिग्दर्शन, प्रायोगिक रंगभूमी अशा अनेक क्षेत्रांतलं प्रशिक्षण विराजसने घेतलं. यामागे आपल्याला ज्या क्षेत्रात जायचं आहे त्याबाबत संपूर्ण माहिती असावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवला होता, असं विराजस सांगतो.

लहान असल्यापासूनच स्टोरीटेलिंगची आवड विराजसला होती. तो म्हणतो, 'माझी शाळा एकमेव अशी शाळा होती जिथे फाइन आर्ट्स हा विषय शिकवला जायचा. नाटक, तबला, स्कल्प्चर, नृत्य आणि गाणं यातून एक निवड करता यायची. त्यामुळे मी तेव्हापासूनच नाटकात असायचो. त्याशिवाय वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, नाट्यछटा अशा सगळ्यांमध्येही असायचो, मला ते आवडायचं. त्यात बक्षीसंही मिळायची म्हणजे मला ते बऱ्यापैकी जमतही होतं. त्यामुळे पुढे जाऊन तेच करावं असा विचार नैसर्गिकपणे मी केला होता. मात्र सगळ्यांना असं वाटतं की मला या क्षेत्राची पार्श्वभूमी असल्याने हे सोपं झालं असेल, तर ते उलट आहे'. आईने या क्षेत्रात येण्याआधीच मला सावध केलं होतं, असं तो सांगतो, 'माझ्या आईने सगळ्यात आधी मला हे सांगितलं की तू अॅक्टिंगच्या भानगडीत पडू नकोस. त्यात करिअर होण्यासाठी वेळ, नशीब, संधी या सगळ्याची सांगड घातली जावी लागते. तिने मला सांगितलं की नुसतं आपण आपलं काम चांगलं केलं एवढंच पुरेसं नसतं. आईने मला एकदा ऋषी कपूर यांची मुलाखत वाचायला दिली होती. त्यात त्यांनी म्हटलेलं की त्यांना अॅक्टिंगशिवाय दुसरं काहीच येत नाही त्यामुळे ते अभिनेते झाले ते खूप बरं झालं. तेव्हा मला जाणवलं की आपण इतरही गोष्टी शिकायला पाहिजेत', अशी आठवण सांगणाऱ्या विराजससाठी शाळेतली आवड आणि आईचा सल्ला हाच खरं तर क्लिक पॉइंट ठरला असं म्हणायला हरकत नाही.

विराजस केवळ अभिनेता नाही आहे तर तो कलाकार आहे. त्याच्याकडे केवळ अभिनय सोडून इतरही अनेक कला आहेत. त्याला या इतर गोष्टींची आवड कशी लागली याबद्दल तो सांगतो, 'मला लहानपणी आईच्या शूटिंगच्या सेटवर जायला आवडायचं नाही. कंटाळा यायचा, कारण ती प्रक्रिया तशी फार कंटाळवाणी असते. पण आईच्या 'सोनपरी' मालिकेच्या सेटवर मला जायला आवडायचं. तिथे लहान मुलं असायची, आणि मुख्य म्हणजे त्यात ग्रीन स्क्रीन वापरलेलं असायचं, अॅनिमेशन वापरलेलं असायचं. ते सगळं कसं करतात ते पाहायला मला तेव्हाही आवडायचं. मला यात इंटरेस्ट असल्यामुळे आणि माझ्या क्षेत्रातल्या सगळ्या गोष्टी, अगदी तांत्रिकसुद्धा मला माहिती असल्या पाहिजेत असं मला वाटत असल्यामुळे मी व्हीएफएक्स, एडिटिंग, कॉपीरायटिंग, अॅडव्हर्टायजिंग असं सगळं शिकलो. म्हणून मी माझं ग्रॅज्युएशन अॅडव्हर्टायजिंग घेऊन केलं. आणि सगळं काही शिकण्याचा फायदा असा की, आता मी एक ब्रॉडवे म्युझिकलसारखा प्रयोग घेऊन येतो आहे, डिसेंबरमध्ये मी लिहिलेला आणि दिग्दर्शन केलेला पहिला चित्रपट येतो आहे.'

रंगभूमीवरून विराजसने सुरुवात केली आहे. अकरा वर्षांपूर्वी त्याची 'थिएट्रॉन' ही संस्था सुरू झाली. नाटक लिहिणं, बसवणं, वेगवेगळी वर्कशॉप घेणं अशा गोष्टी ही संस्था करत असते. विराजस म्हणतो, 'थिएट्रॉनसाठी मी लिहिलेल्या, दिग्दर्शित केलेल्या, अभिनय करत असलेल्या पहिल्या नाटकाच्या वेळी मी स्वतः जाऊन थिएटर बुक केलं, शोज बुक केले, जाहिराती केल्या, त्यासाठी लागणारं बॅकग्राऊंड वर्क केलं आणि प्रत्यक्ष नाटकाचे प्रयोग केले. लोकांना आवडतं आहे हे कळायला लागलं, तेव्हा मला हे सगळं खरंच जमतंय याबद्दल माझी खात्री पटली. कारण माझे बॅकअप प्लॅन्स होते, नक्कीच होते. पण माझा प्लॅन ए, बी, सी, डी... सगळे प्लॅन्स याच क्षेत्रातले होते'. विराजसने त्याच्या क्षेत्राबाबतीत किती सखोल आणि चौफेर विचार केला होता, याबद्दल तो सविस्तर सांगतो. 'जेव्हा मला अभिनेता म्हणून हवं तसं काम मिळत नाही, तेव्हा जर मला निर्मिती, लेखन, दिग्दर्शन यापैकी काही येत असेल, म्हणजे संपूर्ण शास्त्रशुद्धपणे येत असेल, तर मी माझ्या स्वतःसाठी संधी नक्कीच निर्माण करू शकतो, असाही माझा विचार यामागे होता', असं त्याने सांगितलं.

विराजसने स्वतःच्या कामातून शिकत प्रगती केली आहे. प्रायोगिक रंगभूमीसाठीदेखील तो काम करतो. त्या वेळी अनेक मर्यादा असतात आणि त्या मर्यादांमध्ये राहूनच आपली कलाकृती सादर करावी लागते. त्या वेळी कोणताही सेल्फ-डाऊट येऊ द्यायचा नसतो असं विराजस म्हणतो. 'माझ्या येणाऱ्या चित्रपटात पुष्कर जोग, आशय जोग, सोनाली कुलकर्णी आहेत. त्यांनी माझ्यावर दिग्दर्शक म्हणून विश्वास टाकला, वेगळा प्रयोग करून पाहण्याची तयारी दाखवली. अशा वेळी मी स्वतःच्या कामाबद्दल ते योग्य आहे की अयोग्य, मला जमेल की नाही अशा शंका घेत बसणं बरोबर नाही. माझ्या सोबतच्या माणसांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास हाच माझ्यासाठी पुढची मोठी स्टेप घेण्यासाठीचा क्लिक पॉइंट आहे', असं तो विश्वासाने सांगतो.

ज्या क्षेत्रासाठी जिथे जाऊन काम करावं लागेल ते करण्याची मानसिक तयारी, योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता आणि संयम या त्रिसूत्रीने काम केलं तर मनोरंजन क्षेत्रही इतर कोणत्याही करिअरसारखंच आहे, असं ठाम मत त्याने व्यक्त केलं. तो म्हणतो. ज्या सीरियसली इतर कोणत्याही करिअरचा विचार केला जातो, त्यातल्या अनुभवी लोकांशी बोलून समजून घेतलं जातं, थोडा रिसर्च केला जातो, तेवढंच महत्त्व अभिनय आणि तत्सम कला क्षेत्राला द्यायला हवं. आपण आपल्या क्षेत्राचा चौफेर विचार आणि अभ्यास पक्का केला असेल तर योग्य संधी आपोआप मिळत जातात, हा विश्वास तो आपल्या अनुभवातून तरुणाईला देतो.

viva@expressindia.com

# वर्चस्वपूर्ण कामगिरीचे लक्ष्य!

## भारतीय महिला संघाचा आज पाकिस्तानशी सामना

**पीटीआय, सिल्हेट (बांगलादेश)**

**भारतीय महिला** संघाचे आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेतील वर्चस्वपूर्ण कामगिरी सुरू ठेवण्याचे लक्ष्य असून शुक्रवारी त्यांच्यापुढे पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचे आव्हान असेल.

**आशिया चषक क्रिकेट स्पर्धा**

भारतीय संघाने यंदाच्या आशिया चषकात उत्कृष्ट कामगिरी करताना सलग तीन सामन्यांत विजय नोंदवले आहेत. गेल्या दोन सामन्यांत (मलेशिया आणि संयुक्त अरब अमिरातीविरुद्ध) भारतीय संघाने युवा खेळाडूंना अधिक संधी दिली. मात्र, पाकिस्तानविरुद्ध भारतीय संघ आपल्या सर्वोत्तम खेळाडूंसह मैदानात उतरणे अपेक्षित आहे.

भारत आणि पाकिस्तान हे संघ सध्या आशिया चषकाच्या गुणतालिकेत अव्वल दोन स्थानांवर आहेत. मात्र, या सामन्यात भारताचे पारडे जड मानले जात आहे. या दोन देशांच्या महिला संघांतील गेल्या काही सामन्यांत भारताने वर्चस्व गाजवले आहे. राष्ट्रकुल स्पर्धेतील सामन्यात हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने पाकिस्तानचा आठ गडी राखून पराभव केला होता. या दोन संघांतील गेले पाचही ट्वेन्टी-२० सामने भारताने जिंकले आहेत.

भारताच्या फलंदाजीची भिस्त सलामीवीर स्मृती मानधना, कर्णधार हरमनप्रीत कौर आणि मुंबईकर जेमिमा रॉड्रिग्जवर असेल. जेमिमाने या स्पर्धेत दोन अर्धशतके झळकावली आहेत. अमिरातीविरुद्धच्या गेल्या सामन्यात दीप्ती शर्माने अर्धशतकी खेळी करत जेमिमाला उत्तम साथ दिली. या दोघींची कामगिरी भारतासाठी पुन्हा महत्त्वाची ठरेल. तसेच सलामीवीर शफाली वर्माकडून भारताला आक्रमक सलामीची अपेक्षा आहे. भारताच्या गोलंदाजीची मदार रेणुका ठाकूर, पूजा वस्त्रकार, दीप्ती शर्मा आणि स्नेह राणा यांच्यावर आहे.

- **वेळ** : दु. १ वा.
- **थेट प्रक्षेपण** : स्टार स्पोर्ट्स २

# प्रो कबड्डीचा नववा हंगाम आजपासून

**बंगळूरु** : प्रो कबड्डी लीगच्या नवव्या हंगामाला शुक्रवारपासून प्रारंभ होणार असून सलामीच्या लढतीत गतविजेत्या दबंग दिल्लीपुढे यू मुम्बाचे आव्हान असेल. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी चाहत्यांना तीन सामने पाहण्याची संधी मिळेल.

यंदा बंगळूरु, पुणे आणि हैदराबाद या तीन ठिकाणी प्रो कबड्डी लीगचे सामने होणार आहे.

**सामने**

- **दबंग दिल्ली वि. यू मुम्बा** वेळ : सायं. ७.३० वा.
- **बंगळूरु बुल्स वि. तेलुगू टायटन्स** वेळ : रात्री ८.३० वा.
- **जयपूर पिंक पँथर्स वि. यूपी योद्धाज** वेळ : रात्री ९.३० वा.
- **थेट प्रक्षेपण** : स्टार स्पोर्ट्स २, १ हिंदी









# सॅमसनच्या झुंजीनंतरही भारताचा पराभव

**लखनऊ** : संजू सॅमसनच्या (६३ चेंडूंत नाबाद ८६ धावा) झुंजार खेळीनंतरही गुरुवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारतीय संघाला पराभव पत्करावा लागला. आफ्रिकेने या सामन्यात नऊ धावांनी निसटता विजय मिळवत तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

भारताचा कर्णधार शिखर धवनने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारल्यानंतर आफ्रिकेने ४ बाद २४९ अशी धावसंख्या केली. प्रत्युत्तरात भारताला ४० षटकांत ८ बाद २४० धावांपर्यंतच पोहोचता आले. अखेरच्या षटकात ३१ धावांची आवश्यकता असताना सॅमसनने तबरेझ शम्सीच्या गोलंदाजीवर तीन चौकार आणि एका षटकार मारले. मात्र, त्यानंतरही भारताला पराभवाचा सामना करावा लागला. सॅमसनने कारकीर्दीतील सर्वोत्तम नाबाद ८६ धावांची खेळी करताना नऊ चौकार आणि तीन षटकार मारले.

तत्पूर्वी, आफ्रिकेच्या डावाची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. शार्दूल ठाकूरने यानेमन मलान (२२) आणि कर्णधार टेम्बा बव्हुमा (८) यांना, तर कुलदीप यादवने एडीन मार्करमला (०) माघारी पाठवले. क्विंटन डीकॉक ५४ चेंडूंत ४८ धावा करून रवी बिश्नोईच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यामुळे आफ्रिकेची ४ बाद ११० अशी स्थिती होती. यानंतर डेव्हिड मिलर (६३ चेंडूंत ७५) आणि हेनरिक क्लासन (६५ चेंडूंत ७४) यांनी १३९ धावांची अभेद्य भागीदारी रचत आफ्रिकेला २५० धावांसमीप नेले.









**अ र्थ स त्ता**

# सेवा क्षेत्राच्या गतीला सप्टेंबरमध्ये बाधा!

## ‘पीएमआय’ २.९ गुणांनी खुंटून सहा महिन्यांच्या नीचांकाला

**पीटीआय, नवी दिल्ली**

**देशाच्या निर्मिती** क्षेत्राबरोबरच सरलेल्या सप्टेंबर महिन्यात सेवा क्षेत्राची कामगिरी निराशाजनक राहिली. सेवा क्षेत्रातील व्यावसायिक क्रियाकलाप हे मागील सहा महिन्यांच्या नीचांकी पातळीवर रोडावल्याचे मासिक सर्वेक्षणात दिसून आले. स्पर्धात्मक दबाव, वाढलेली महागाई आणि एकंदर नवीन मागणी कमी झाल्याच्या परिणामी या क्षेत्राची गती मंदावल्याचे दिसून आले.

भारतातील सेवा व्यवसायातील खरेदी व्यवस्थापकांचा कल दर्शविणाऱ्या ‘एस अँण्ड पी ग्लोबल इंडिया सर्व्हिसेस पीएमआय’ निर्देशांक सप्टेंबर महिन्यात ५४.३ गुणांवर नोंदवला गेला. ऑगस्टमधील ५७.२ गुणांच्या तुलनेत या निर्देशांकात जवळपास २.९ गुणांची पडझड झाली आहे. मासिक तुलनेतील ही आकडेवारी वर्तमान परिस्थितीत सेवा क्षेत्रापुढे काही आव्हाने असल्याचे दर्शविणारी असली, तरी सलग चौदाव्या महिन्यात सेवा क्षेत्रातील उत्पादनाने विस्तारदर्शक कल दर्शविला आहे.

भारताच्या निर्मिती क्षेत्रासंबंधी मंगळवारी जाहीर झालेला पीएमआय निर्देशांक ५५.१ असा तीन महिन्यांच्या नीचांकी पातळीवर नोंदवला गेला आहे. ताज्या सर्वेक्षणानुसार, ऑगस्टमध्ये जास्त विक्री नोंदवणाऱ्या सेवा प्रदात्यांसाठी अनुकूल मागणीची परिस्थिती होती, मात्र तीव्र स्पर्धा आणि प्रतिकूल धोरण आणि सेवा क्षेत्रातील दरवाढ व महागाईमुळे या क्षेत्राच्या गतीला बाधा आणली आहे. पीएमआय निर्देशांकात घसरण झाली असली तरीही या क्षेत्रात वाढ कायम आहे. अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने आक्रमक व्याजदर वाढ केल्याने डॉलरच्या तुलनेत रुपयांत मोठी घसरण झाली, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेसमोर नवीन आव्हाने उभी राहिली आहेत, असे निरीक्षण ‘एस अँण्ड पी ग्लोबल इंडिया’च्या अर्थतज्ज्ञ पॉलियाना डी लिमा यांनी गुरुवारी नोंदविले.

**महागाई अपायकारक**

किमतीच्या आघाडीवर, सेवा क्षेत्रातील कंपन्यांनी सप्टेंबरमध्ये त्यांच्या सरासरी खर्चात आणखी वाढ अनुभवली. अन्न, इंधन, कार्यालयीन साहित्य, कर्मचारी वेतन खर्च, किरकोळ खर्च आणि वाहतूक हे महागाईच्या अंगाने दबाव आणणारे प्रमुख स्रोत म्हणून नमूद करण्यात आले आहेत. यामुळे सेवा क्षेत्रातील कंपन्यांच्या खर्चात तीव्र रूपात वाढ झाल्याने नफा टिकवून ठेवण्यासाठी सेवा क्षेत्रातील कंपन्यांना कसरत करावी लागते आहे. मात्र रोजगाराच्या बाबतीत ऑगस्ट महिन्याच्या तुलनेत सप्टेंबर महिन्यामध्ये वाढ नोंदवण्यात आल्याचे सर्वेक्षण सांगते.






# पितांबरीचे रवींद्र प्रभुदेसाई यांना ‘दाजीकाका गाडगीळ उदयोगरत्न’ पुरस्कार

**पुणे** : पितांबरी प्रॉडक्ट्स प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र प्रभुदेसाई यांना ब्राह्मण जागृती सेवा संघातर्फे देण्यात येणाऱ्या



‘दाजीकाका गाडगीळ उदयोगरत्न’ पुरस्कार नुकताच समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

राज्यसभेचे खासदार व भारतीय सांस्कृतिक परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रभुदेसाई यांनी स्वीकारला. ज्येष्ठ विधिज्ज्ञ अॅड. उज्ज्वल निकम, ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले आणि युवा अभिनेत्री मृण्मयी देशपांडे यांनाही या कार्यक्रमांत पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

हे पत्र वैदेही ठकार यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, ‘एक्स्प्रेस हाऊस’, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी- ६७२४१०००. फॅक्स - ६७२४११४७. लोकसत्ता मुंबई कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३१९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. नागपूर कार्यालय : प्लॉट. न. ३८, अॅडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, अहमदनगर ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. कोल्हापूर ०२३१- २६४४९९४.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ सहायक संपादक : मुकुंद संगोराम * (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92
© द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.
epaper.loksatta.com